नोव्हेंबर–डिसेंबर २०२३/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार

## महामानव

आपला आदर्श : आपली प्रेरणा

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय**;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य**;
दर्जाची व संधीची **समानता**;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# अंतरंग

## ६ सामाजिक न्यायाची दिशा

'महाबोधीवृक्ष' हा केवळ एक महोत्सव नव्हता, तर तथागतांनी जगाला दिलेल्या शांतीच्या शिकवणीची उजळणी करणारा कार्यक्रम होता. भगवान बुद्धांचा शांतीचा आणि ज्ञानमार्गाचा संदेश घेऊनच भारताचे महान सुपुत्र महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाची दिशा आपल्याला दाखवली आहे. महाराष्ट्राचा सामाजिक ऐक्याचा, सामाजिक न्यायाचा लौकीक पुन्हा एकदा जगभर पोहोचेल, अशी वाटचाल आपल्याला करायची आहे.

## १२ बाबासाहेबांचे पहिले भाषण


'अस्पृश्यता निवारणाच्या एका मागोमाग एक अशा पाच परिषदेच्या जत्रा भरल्या जात होत्या, अशा १९२० च्या उगवत्या महिन्यात अस्पृश्यतेच्या तेजोभंगाला कारणीभूत ठरणाऱ्या तत्कालीन स्वातंत्र्याच्या चळवळींना बाबासाहेबांचा हा बहिष्कृत्यांच्या बंडखोरीचा एल्गार मुंबईसारख्या शहरात प्रथमच ऐकायला मिळत होता.

## १६ अमृतमहोत्सवी द अनटचेबल्स्

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथांपैकी 'द अनटचेबल्स्' हा एक ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक महान विचारवंत रूसो आणि वॉल्टेअर यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. या ग्रंथाने यावर्षी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे.

## २० कायदा व सामाजिक न्याय

शासन व लोकशाहीबाबतच्या वरील मतांवरून डॉ. आंबेडकर यांची ही भूमिका स्पष्ट होते की, त्यांचा लोकसंमतीवर आधारित शासनावर विश्वास होता. जनता ही स्वतंत्र असावी व अभिव्यक्ती करावयास सक्षम असावी. सामाजिक बंधनापासून ती मुक्त असावी. बाबासाहेबांचे लोकशाहीवरील विचार हे अत्यंत सुस्पष्ट होते.




## २८ राष्ट्रोद्धारक बाबासाहेब...

वंचितांच्या उद्धाराचा पाठपुरावा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राची प्रगती आणि उत्थान याकडे कधीही दुर्लक्ष केलेले नाही. मानवीय मूल्ये, लोकतंत्रात्मक मार्ग आणि संवैधानिक उपाय यावर त्यांनी सतत भर दिलेला आहे. ते प्रखर राष्ट्रभक्त, देशाभिमानी आणि राष्ट्रोद्धारक आहेत.

## ३३ सत्यशोधकी साहित्यिक

साहित्य आणि समाज, साहित्यिक आणि सामाजिक बांधिलकी, साहित्यिकांची नैतिकता, प्रत्यक्षातले वास्तव आणि कलात्मक वास्तव या प्रश्नांची चर्चा सत्यशोधकांनी केली नाही. सत्यशोधकी लेखक हे जीवनाच्या आणि समाजाच्या जीवन-मरणाच्या युद्धभूमीवर लढणारे शूर शिपाई होते.

## ३८ लोककलेचा मानबिंदू

पद्मश्री शाहीर साबळे यांचे जन्मशताब्दी वर्ष ३ सप्टेंबर २०२३ रोजी संपले. शाहीर साबळे आणि महाराष्ट्राच्या लोककला यांचे नाते दुधातील खडीसाखरेसारखे आहे.

## ५२ कल्याणकारी निर्णय

राज्य मंत्रिमंडळाच्या १०, १९, ३१ ऑक्टोबर आणि ८, १७ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या बैठकीत महिला व बालविकास, जलसंपदा, विधि व न्याय, परिवहन, महसूल, उच्च व तंत्रशिक्षण, वित्त, ऊर्जा, सामाजिक न्याय, वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, कामगार, सामान्य प्रशासन विभाग (साविस), मदत व पुनर्वसन, कौशल्य विकास, इतर मागास बहुजन कल्याण, उद्योग, जलसंपदा, वैद्यकीय शिक्षण, सहकार, पर्यटन, गृह, सार्वजनिक बांधकाम, नियोजन, कृषी, ग्रामविकास आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...


| | |
|---|---|
| सामाजिक न्यायाची दिशा | ६ |
| सर्वांगीण विकासाचे सूत्र | ८ |
| दूरदृष्टीचे प्रशासक | १० |
| बाबासाहेबांचे पहिले भाषण | १२ |
| राज्यघटनेचा सरनामा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | १५ |
| अमृतमहोत्सवी द अनटचेबल्स् | १६ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट | १८ |
| कायदा व सामाजिक न्याय | २० |
| राष्ट्रोद्धारक बाबासाहेब... | २८ |
| सत्यशोधकी साहित्यिक | ३३ |
| बालदिन | ३५ |
| लोककलेचा मानबिंदू | ३८ |
| लोकरंजनातून लोकशिक्षण | ४१ |
| प्रेरणादायी जीवनप्रवास... | ४४ |
| कल्याणकारी निर्णय | ५२-५८ |

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

वर्ष ७५ वे | अंक १ | नोव्हेंबर-डिसेंबर २०२३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — दयानंद कांबळे
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# विधानपरिषद शतकमहोत्सवी वर्षानिमित्त स्नेहमेळावा

विधान परिषदेतील सदस्यांनी भाषणांद्वारे व्यक्त केलेली व्यापक लोकहिताची भूमिका आजही सर्वांना मार्गदर्शन करणारी आहे. सदस्यांनी लोकहितासाठी वेळोवेळी सभागृहात आपली मते अभिव्यक्त केली आणि त्यातूनच लोकहिताचे अनेक क्रांतिकारी कायदे तयार झाले. त्यामुळे विधान परिषदेतील कामकाजात आजी व माजी सदस्यांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यमान आणि माजी विधानपरिषद सदस्यांसाठी परिसंवाद आणि स्नेहमेळावा मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे बोलत होत्या.

याप्रसंगी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे आजी - माजी सदस्य, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे, विधिमंडळाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, विधान परिषदेतील सदस्य हे चळवळीतून वेगवेगळ्या क्षेत्रातून आलेले असतात. समाजमनाचा अचूक मागोवा घेऊन सभागृहात बोलत असतात. रोजगार हमी कायदा, स्त्री भ्रूणहत्या कायदा, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कायदा, डान्सबार बंदी कायदा, माहितीचा अधिकार यांसारखे समाजाचे जीवनमान उंचावणारे कायदे करण्यात विधान परिषदेने मोठे योगदान राहिले आहे. लोकशाहीमधील उणिवा भरून काढणे आणि समाजातील सर्व घटकांना न्याय देण्यासाठी लोकशाहीतील या सार्वभौम सभागृहाचे आतापर्यंतचे कामकाज प्रेरणादायी राहिले आहे. माँटेग्यू-चेम्सफर्ड शिफारशीनुसार भारत सरकार अधिनियम १९१९ अन्वये बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची प्रारंभिक बैठक १९ फेब्रुवारी १९२१ रोजी टाऊन हॉल मुंबई येथे झाली. सन १८६२ ते सन १९२० पर्यंत गव्हर्नर ऑफ बॉम्बे यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचे कामकाज चालत होते. सन १९२१ मध्ये नारायण चंदावरकर यांच्या रूपाने पहिल्यांदाच भारतीय व्यक्तीची सभापती म्हणून झालेली नियुक्ती ही एक ऐतिहासिक घटना आहे. देशातील संसदीय लोकशाहीच्या संदर्भात द्विसभागृह व्यवस्थेत महाराष्ट्र विधानपरिषदेने उल्लेखनीय योगदान देत आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवला आहे.



दरम्यान ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये, अजय वैद्य, विजय वैद्य, राही भिडे, योगेश त्रिवेदी, विलास मुकादम, शीतल करदेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विधान परिषद सभागृहाची आवश्यकता व महत्त्व आणि आमच्या आठवणीतील विधानपरिषद या दोन परिसंवादात सविस्तर चर्चा करण्यात आली.

# महामानवास अभिवादन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकोत्तर पुरुष होते. त्यांनी समाजातील उपेक्षितांसाठी केलेले कार्य हे अजोड स्वरूपाचे आहे. ते प्रकांडपंडित होते. त्यांचे विविध विषयांवर प्रभुत्त्व होते. समाजकारण, अर्थकारण, राजकारण, कृषी, कामगार, धर्म, संस्कृती आदी विषयांवरील त्यांचा व्यासंग दांडगा होता. त्यांनी आपल्या प्रज्ञेने देशातीलच नव्हे, तर जगातील विद्वानांना प्रभावित केले होते. त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेले विचारही काळाच्या पुढे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला सर्वात मौल्यवान देणगी दिली ती म्हणजे आपली राज्यघटना. त्यांना यथार्थरीत्या 'घटनेचे शिल्पकार' असे संबोधले जाते. त्यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण झाले. त्यांच्या ६७व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'लोकराज्य'चा हा विशेष अंक आपणास देताना अतिशय आनंद होत आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रामुख्याने 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांच्या पायावरच यशस्वी लोकशाहीचा डोलारा उभा राहू शकेल, यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ठाम विश्वास होता आणि त्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वाहून घेतले होते. सामाजिक समतेवर आधारित समाजव्यवस्थेची निर्मिती व्हावी, यासाठी ते अखंड कार्यरत होते. उपेक्षितांना न्याय आणि सन्मान मिळावा, यासाठी त्यांनी आपले सर्वस्व वेचले. मनुष्याला घडवण्यात आणि सक्षम करण्यास शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व त्यांनी जाणले होते. त्यामुळेच 'शिका, संघर्ष करा, संघटित व्हा' अशी शिकवण त्यांनी सर्व उपेक्षित समाजघटकांना देऊन ज्ञानप्राप्तीची प्रेरणा दिली. 'लोकराज्य'च्या अंकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविधांगी पैलूंवर आधारित अशा अभ्यासपूर्ण लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध विषयांवर लेख लिहिले. याबरोबरच त्यांनी अनेक ग्रंथही लिहिले. यापैकीच ऑक्टोबर १९४८ मध्ये 'द अनटचेबल्स्' हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक महान विचारवंत रुसो आणि वॉल्टेअर यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. 'द अनटचेबल्स्' या ग्रंथात त्यांनी अस्पृश्यता उत्पत्तीच्या सिद्धान्ताबद्दल मार्मिक विवेचन लिहून ठेवले आहे. या ग्रंथाने यावर्षी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्ताने विशेष लेखाचा समावेश या अंकात करण्यात आला आहे. याबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य, विशेषतः त्यांच्या जीवनातील विविध क्षणांचे दर्शन घडवणाऱ्या काही दुर्मिळ छायाचित्रांचा; तसेच महात्मा जोतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष लेखही या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे.

'लोकराज्य'च्या या अंकात पद्मश्री शाहीर कृष्णराव गणपतराव साबळे यांचे ३ सप्टेंबर २०२३ रोजी जन्मशताब्दी वर्ष संपले. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनकार्यावर आधारित विशेष लेखांचा समावेशही करण्यात आला आहे. किमान तीन पिढ्यांचे सांस्कृतिक संचित हे पद्मश्री शाहीर साबळे यांच्या लोकगीते, प्रहसने आणि मुक्तनाट्यांमधून घडले आहे. पद्मश्री शाहीर साबळे यांच्या गात्या गळ्याने महाराष्ट्राच्या लोककलेचा मळा फुलवला आहे. लोककला म्हटले की, पद्मश्री शाहीर साबळे यांचे नाव डोळ्यांपुढे येते. मराठी भाषेच्या आणि मराठी लोकपरंपरेच्या लोकसंस्कृतीला महाराष्ट्र शाहिरांनी लोककलेच्या सादरीकरणातून नवसंजीवनी दिली आहे. पद्मश्री शाहीर साबळे यांच्या कार्याची माहिती अंकात समाविष्ट करण्यात आलेल्या लेखांतून आपणास होईल. याबरोबरच मंत्रिमंडळात ठरले या सदराचाही समावेश करण्यात आला आहे. हा अंक आपणास उपयुक्त ठरेल, असा विश्वास आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

गेल्या महिन्यातच नाशिकला बुद्ध स्मारक परिसरात महाबोधिवृक्षाच्या रोपणाचा कार्यक्रम पूजनीय भिक्खुंच्या उपस्थितीत पार पडला. 'महाबोधिवृक्ष' हा केवळ एक महोत्सव नव्हता, तर तथागतांनी जगाला दिलेल्या शांतीच्या शिकवणीची उजळणी करणारा कार्यक्रम होता. भगवान बुद्धांचा शांतीचा आणि ज्ञानमार्गाचा संदेश घेऊनच भारताचे महान सुपुत्र महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाची दिशा आपल्याला दाखवली आहे. महाराष्ट्राचा सामाजिक ऐक्याचा, सामाजिक न्यायाचा लौकिक पुन्हा एकदा जगभर पोहोचेल, अशी वाटचाल आपल्याला करायची आहे.

# सामाजिक न्यायाची दिशा

**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

नागपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो अनुयायांना बुद्ध धर्माची दीक्षा दिली तो माझ्या दृष्टीने भारतासाठीच नव्हे, तर जगासाठी सामाजिक न्यायाचा, सामाजिक क्रांतीचा दिवस होता. महाराष्ट्र ही पुरोगामी आणि समता, बंधुता आणि एकता या मूल्यांना आदर्श मानणारी भूमी आहे. संत-महंतांची भूमी आहे. या संतांनीही आम्हाला समतेचा वसा दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी या भूमीला स्वाभिमानाचा मंत्र दिला. जाज्वल्य असा देशाभिमान, देव-धर्म आणि देवळांच्या रक्षणांचा धडा घालून दिला. महात्मा जोतिराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर महाराष्ट्र सुपुत्रांनी महाराष्ट्राची जडण-घडण केली. ही इतकी महान परंपरा असल्यानेच सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात महाराष्ट्र आज अग्रेसर आणि अन्य राज्यांसाठी आदर्श म्हणून काम करतो आहे.



सामाजिक न्याय म्हणजे काय? समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, आर्थिक, राजकीय, सामाजिक हक्क, स्त्री-पुरुष समानता, समाजातील सर्व व्यक्तींना शिक्षणाची, विकासाची संधी ही तत्त्वे म्हणजे सामाजिक न्यायाची उद्दिष्टे आहेत आणि हीच उद्दिष्टे आमच्या राज्यकारभाराचा पाया आहेत. एक उदाहरण द्यायचे झाल्यास दिव्यांग कल्याण विभागाचे देता येईल. दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग असावा असा विचार कुणी केला नव्हता, तो आम्ही केला आणि स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग सुरू झाला. नुकतेच मी राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांमध्ये दिव्यांगांसाठी १० टक्के स्टॉल्स आरक्षित ठेवायला सांगितले आहेत. एवढेच नाही, तर शासकीय नोकऱ्यांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणीची प्रणाली सुरू करण्याचे आणि दिव्यांगांचे अर्थसाहाय्य डीबीटी आणि पोस्टल बँकेद्वारे देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. हे केवळ एक उदाहरण आहे. सफाई कामगारांना लाड समितीच्या शिफारशी लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही काही महिन्यांपूर्वीच घेतला आहे. यामुळे डोक्यावरून मैला वाहणाऱ्या सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीत प्राधान्य दिले जाईल. हजारो सफाई कामगारांच्या कुटुंबीयांची अनेक वर्षांची मागणी मान्य झाली आहे.

## दुर्बल घटकांचे जीवनमान सुधारेल

महात्मा फुले नवीनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी म्हणजेच महाप्रित या उपकंपनीमार्फत विविध प्रकल्पांची कामे करून घेत आहोत, यामुळे ही कंपनी सक्षम होईल. अक्षय ऊर्जा आणि इलेक्ट्रिक चार्जिंग केंद्र, कृषी प्रक्रिया मूल्यसाखळी आणि जैव इंधन आणि पायाभूत सुविधा प्रकल्प, डेटा सेंटर, परवडणारी घरे, ऊर्जा कार्यक्षमता, महिला उद्योजकता, पर्यावरण आणि हवामान बदल, आरोग्य व जैवविज्ञान, कार्पोरेट समुदाय विकास असे प्रकल्प महाप्रितमार्फत राबवण्यात येतील. यामुळे




रोजगार व महसूल निर्मितीबरोबरच दुर्बल घटकांचे जीवनमान सुधारेल. महाप्रितकडून आम्ही ठाणे शहरातील टेकडी बंगला, हजुरी व किसननगर येथे समूह विकास प्रकल्पात सर्वसामान्यांना परवडणारी घरे बांधून घेणार आहोत.

## विविध योजनांना अर्थसाहाय्य

संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेत अर्थसाहाय्य फार कमी होते. ते आता १,५०० रुपये केले आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रत्येक महापालिका क्षेत्रात विरंगुळा केंद्र स्थापन करणार आहोत. दरवर्षी ७५ मराठा, कुणबी विद्यार्थ्यांना परदेशी उच्च शिक्षणासाठी सयाजीराव गायकवाड-सारथी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेत जून २०२२ पासून ९६१ कोटींच्या विविध विकास कामांना मंजुरी दिली आहे. गेल्या वर्षीच आम्ही ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. प्रवास मोफत करण्याचा निर्णय घेतला. आज लाखो प्रवाशांनी याचा लाभ घेतला आहे.

## लाखो विद्यार्थ्यांना लाभ

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात 'नमो ११ कलमी' कार्यक्रम सुरू केला आहे. यात नमो अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांची वस्ती सन्मान अभियानात राज्यातील ७३ अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगीण विकास करून त्यांना नवे रूप देण्यात येणार आहे. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ ही महामंडळे म्हणजे गरीब, मागास, दुर्बलांना मुख्य प्रवाहात आणणाऱ्या संस्था आहेत. मागास तरुणांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था बार्टी म्हणजे खऱ्या अर्थाने त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल करणारी संस्था आहे. मध्यंतरी बार्टीच्या ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर केली. आज संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणून बार्टी मोठे काम करते आहे. स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षणाचा लाभ लाखो विद्यार्थ्यांनी घेतला आहे.

### आर्थिक तरतूद

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत या संस्थांच्या अधिछात्रवृत्ती, प्रशिक्षण, कौशल्य विकास व अन्य कार्यक्रमांमध्ये समानता नव्हती, ती आणण्यासाठी सर्वंकष धोरण आखले आहे. केंद्राच्या मागासवर्गीयांसाठी असलेल्या सर्व योजना उदा. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास, राष्ट्रीय आयुष अभियान, राष्ट्रीय कृषी विकासातील कॅफेटेरिया योजना, अन्न आणि पोषण सुरक्षा, प्रधानमंत्री आवास आदी योजनांमध्ये मागास समाजाला सगळे लाभ मिळतील, हे पाहिले जात आहे आणि त्यासाठी राज्याच्या आर्थिक हिश्शाची तातडीने तरतूद केली जाते.

## योजनांची अंमलबजावणी समाधानकारक

राज्य शासन करत असलेल्या प्रयत्नांमुळे केंद्राची प्रशंसेची थाप मिळाली आहे. नुकतेच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ए. नारायणस्वामी यांनी राज्यात अनुसूचित जातींसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजना विशेषतः केंद्राच्या योजनांची अंमलबजावणी समाधानकारक आहे, असे सांगितले आहे. स्वाधार योजना, शिष्यवृत्ती योजना, निवासी शाळा, वसतिगृहे, सफाई कर्मचारी इ. योजना चांगल्या राबवत असल्याची शाबासकी त्यांनी दिल्याने निश्चितच आमचाही उत्साह वाढला आहे.

हे सरकार दुर्बल, मागास, कष्टकरी, कामगार, गरिबांचे आहे. आम्ही एकीकडे राज्यातल्या पायाभूत सुविधा, रस्ते पूल बांधण्याचा धडाका लावला आहे; पण दुसरीकडे आम्ही सामाजिक भावनेतूनदेखील अतिशय महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. कारण विकास म्हणजे काही फक्त काँक्रिटचे जंगल वाढविणे नाही. संवेदनशीलता दाखवून दुर्बलांना मदत करणे, त्यांचे जीवन आनंदी कसे होईल, हे पाहणे ही आमची मुख्य जबाबदारी आहे.

सामाजिक न्यायाच्या दिशेने आमची वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्राने नेहमीच शाहू, फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाचा आणि महान विचारांचा गौरवशाली वारसा पुढे चालवला आहे. मला खात्री आहे, देशात महाराष्ट्र यामध्ये एक आदर्श उदाहरण निर्माण करेल.

**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,**
मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांवर आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानानुसार समतेचा विचार राज्यकारभारातून समाजात उतरविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सामाजिक सुधारणा आणि अर्थचक्र हे एकाच वेळी हातात हात घालून पुढे जात असल्याचा सध्याचा काळ आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचल्या पाहिजेत.**

# सर्वांगीण विकासाचे सूत्र

**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित समाजाला शिक्षणाच्या मार्गावरून पुढे घेऊन जात असताना त्यांच्यातील आत्मभान जागृत केले. ते केवळ उपेक्षित समाजाचे नेते नव्हते, तर आधुनिक भारताच्या सामाजिक संरचनेचे द्रष्टे शिल्पकार होते. त्यांच्या लेखणीतून, वाणीतून आणि आचरणातून समाजात समता प्रस्थापित झाली पाहिजे, त्यातूनच देश विकासाच्या शिखरांवर पोहोचेल, असा विश्वास आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शासन बाबासाहेबांच्या याच विचारांना पुढे घेऊन जात आहे. राज्याचा तत्कालीन अर्थसंकल्प सादर करताना समाजातील सर्वच वंचित घटकांच्या आर्थिक विकासाला गती दिली पाहिजे, हाच दृष्टिकोन समोर ठेवून अर्थसंकल्प सादर केला होता. त्यामुळेच विविध समाजासाठी महामंडळांची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. प्रत्येक महामंडळासाठी ५० कोटी भागभांडवलाची तरतूद केली आहे. यामध्ये लिंगायत समाजातील तरुणांसाठी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, गुरव समाजासाठी संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, रामोशी समाजातील युवकांसाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, वडार समाजातील युवकांसाठी पैलवान मारुती चव्हाण आर्थिक विकास महामंडळ, अशी नवी मंडळे स्थापन करण्यात आली. त्यातून अगोदर असलेली महामंडळे आणि नव्या महामंडळांच्या माध्यमातून सामाजिक समरसता निर्माण करण्याचा हेतू आहे. कोणताही समाज विकासाच्या वाटेवर मागे पडता कामा नये, हा या मागचा उद्देश आहे.



देश आता एका वळणावर उभा आहे. आज जगातील पाचवी अर्थव्यवस्था म्हणून भारत पुढे आला असून, आगामी काळात तिसऱ्या स्थानी झेप घेईल, यात शंका नाही. देशाच्या आर्थिक विकासात महाराष्ट्राचा सर्वात महत्त्वाचा वाटा आजपर्यंत राहिला असून, यापुढेही महाराष्ट्रच विकासाचे इंजिन असणार आहे. वंचित उपेक्षित घटकांच्या आर्थिक विकासाशिवाय आपली ही उद्दिष्टे पूर्ण होणार नाहीत. त्यासाठी उद्योग वाढीकडे विशेषत्त्वाने लक्ष दिले जात आहे. वंचित घटकांतून नवे उद्योजक तयार व्हावेत, त्यांनी इतरांसाठी रोजगार निर्माण करावेत, यासाठी अनेक प्रोत्साहन योजना सुरू करण्यात आल्या आहेत. विशेषतः स्टार्टअप उद्योगांसाठी भागभांडवल उभारणीपासून कौशल्य देण्यापर्यंत सर्व स्तरावर राज्य शासन मदत करत आहे. त्याचा तरुणांनी जास्तीत जास्त लाभ घेतला, तर २०४७ चे आपण सर्वांनी मिळून बघितलेले विकासाचे स्वप्न त्याअगोदरच पूर्ण होईल, अशी खात्री आहे.

याबरोबरच पारंपरिक कारागीर आणि शिल्पकारांसाठी १३ हजार कोटी रुपयांची प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेत १८ पारंपरिक व्यवसायांचा समावेश करण्यात आला असून, कोणत्याही हमी वा तारणविना कारागीर व श्रमिकांना दोन हप्त्यांत एकूण तीन लाख रुपयांचे कर्ज मिळू शकेल. पारंपरिक कारागीर व शिल्पकारांना सुलभ अर्थसाहाय्य करणे व त्यांच्या दर्जेदार उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच आपल्या देशातील पारंपरिक कुशल व्यवसायांचा वारसा पुढे नेणे, हेही यातून साधले जाणार

आहे. बाबासाहेबांना अपेक्षित असलेला देश घडवण्यासाठी एक इकोसिस्टिम तयार करण्यात येत आहे. पायाभूत सुविधांच्या माध्यातून उद्योगांना पूरक स्थिती निर्माण करतानाच त्यांना आवश्यक मनुष्यबळ निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माणूस घडवण्याचा प्रयत्न केला. सामाजिक सुधारणा आणि अर्थचक्र हे एकाच वेळी हातात हात घालून पुढे जात असल्याचा सध्याचा काळ आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचल्या पाहिजेत, तळागाळातील सर्वसामान्य माणसाच्या खात्यावर शासनाचा एक रुपया पोहोचला पाहिजे, या उद्देशाने आम्ही कार्यरत असून त्याद्वारे डीबीटीच्या माध्यमातून हा रुपया थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर पोहोचत आहे.

डॉ. बाबासाहेबांचे लोकोत्तर विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचले पाहिजेत, त्याचबरोबर त्यांचे स्मारक जागतिक स्तरावरचे व्हावे, यासाठी आम्ही विशेषत्वाने प्रयत्न करत आहोत. इंदू मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी प्राप्त व्हावी, यासाठी आम्ही केलेल्या प्रयत्नांना यश आले आणि आज तिथे एक जागतिक स्तरावरचे स्मारक होत आहे. हे स्मारक लवकर पूर्ण होईल, असा मला विश्वास आहे. लंडनमध्ये जेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर राहिले होते, ते ठिकाणही स्मारकासाठी राज्य शासनाने खरेदी केल्याचा अतिशय आनंद झाला. डॉ. बाबासाहेबांचे स्मारक लंडन येथे गेलेल्या प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाने छाती फुलून येणारा क्षण ठरत आहे. दादर येथील इंदू मिलच्या १२ एकर जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची उभारणी केली जात आहे. सद्य:स्थितीत स्मारकाच्या इमारतीचे जवळपास ८० फुटांपर्यंतचे काम पूर्ण झाले आहे. हे स्मारक मुंबईला, महाराष्ट्राला नवी ओळख देणारेही ठरेल, यात शंका नाही.



काही महिन्यांपूर्वी रशियामध्ये साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. हा एक भावविभोर क्षण होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारमार्गावर चालणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याच्या प्रेमात रशियन जनता आहे. तिथे त्यांच्या साहित्याचा अभ्यास केला जात आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून वंचित समाजाचा हुंकार मांडला आहे. आणि त्या हुंकाराला प्रतिसाद कसा द्यायचा हे डॉ. बाबासाहेबांच्या साहित्यातून जगाला समजले आहे.

जपानच्या कोयासन विद्यापीठात उभा असलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा तेथील विद्यार्थ्यांना शिक्षणाबद्दल नक्कीच प्रेरणा देत राहील, असा विश्वास आहे. २०१५ मध्ये या पुतळ्याचे अनावरण करताना अतिशय आनंद झाला होता. यावर्षी जेव्हा जपानच्या या विद्यापीठाला भेट देण्याचा योग आला, त्यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या राजकीय, सामाजिक संघर्षाबद्दल तेथील विद्यार्थ्यांमध्ये असलेले कुतूहल जाणवले. त्यांच्या साहित्याचा अभ्यास करण्याची ओढ जाणवली. विशेष म्हणजे या विद्यापीठात २०१५ पासून भारतरत्न डॉ. बाबासाहे आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.

नागपूर येथील दीक्षाभूमीच्या विकासाचा प्रश्नही मार्गी लावला. कित्येक वर्षांपासून मागणी असलेल्या दीक्षाभूमीच्या विकासाला २०१४ नंतर गती मिळाली. आता शासन दीक्षाभूमी जागतिक पातळीवरील धार्मिक स्थळ बनवण्याच्या तयारीत आहे. २०२४ पर्यंत म्हणजेच धम्मचक्र प्रवर्तन दिनापर्यंत तेथील स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. दीक्षाभूमीच्या विकासाच्या कामाला सर्वस्वी मदत करताना अतिशय समाधान मिळाले. नागपुरात ड्रॅगन पॅलेस टेंपललासुद्धा सर्वतोपरी मदत राज्य शासनाकडून दिली जात आहे.

डॉ.बाबासाहेबांचे विचार समाजातील सर्व घटकांच्या विकासातून मूर्त रूप घेतील, असा विश्वास आहे. त्यामुळे राज्य शासन महिला, वंचित, उपेक्षित घटकांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत असून त्याचे सकारात्मक परिणाम आता दिसू लागले आहेत. समाजातील वंचित घटकांचे समाधान हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी आदरांजली ठरेल आणि त्या दिशेनेच राज्य शासनाचे कार्य सुरू राहील.

**शब्दांकन : प्रवीण कुलकर्णी,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे
सहायक जनसंपर्क अधिकारी

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने त्यांना अभिवादन. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला, विचारांना, स्मृतींना कृतज्ञतापूर्वक वंदन. देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्न करतानाच समाजात समता आणि बंधुता रुजवण्यासाठी त्यांनी उभारलेला लढा संस्मरणीय, दिशादर्शक आणि प्रेरक आहे. त्यांनी सामाजिक, मानवी मूल्यांवर आधारित जगातील सर्वोत्कृष्ट राज्यघटनेची निर्मिती केली.**

# दूरदृष्टीचे प्रशासक

**अजित पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ राजकारणी, समाजकारणी नव्हते, तर ते ज्ञानवंत, गुणवंत, प्रज्ञावंत तत्त्वचिंतक-विचारवंत होते. शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, जलतज्ज्ञ, शेतीतज्ज्ञ आणि संरक्षणतज्ज्ञ म्हणूनही त्यांचे कार्य अलौकिक होते. लेखक, चित्रकार, पत्रकार, समाजव्यवस्थेचे अभ्यासक आणि दूरदृष्टीचे प्रशासक म्हणून डॉ. बाबासाहेबांनी केलेले कार्य अद्वितीय असेच होते.

## महापुरुषांचा वारसा आणि विचार

उद्योग, सेवा, पायाभूत सुविधा, कृषी, पर्यटन यांसारख्या क्षेत्रात देशात अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्राच्या विकासप्रक्रियेचा पाया तथा प्रमुख आधार हा सामाजिक न्याय हाच राहिला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या राज्याची स्थापना केली आणि आपल्या आदर्श कारभारातून सामाजिक न्यायाचे तत्त्व जनमानसात खोलवर रुजवले. क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपल्या सुधारणावादी कार्यातून सामाजिक न्यायाचे रक्षण केले. अनेक क्रांतिकारी, परिवर्तनवादी निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीतून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात समता आणि सामाजिक न्यायाचा आदर्श प्रस्थापित केला. सामाजिक न्यायाच्या याच परंपरेला व्यापक स्वरूप प्राप्त करून देण्याचे महान कार्य महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. राज्य शासनाच्या माध्यमातून या महापुरुषांचा वारसा आणि विचार सक्षमपणे पुढे नेण्यात येत आहेत. या महामानवांच्या विचारांवरच शासन मार्गक्रमण करत आहे.

## विकासाची समान संधी

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील सामान्य माणसाला मतदानाचा, सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. एकता, समता, बंधुतेची शिकवण दिली. समाजातल्या सर्व घटकांना समान न्याय, विकासाची समान संधी मिळाली पाहिजे. सर्व जाती, धर्म, पंथांच्या, प्रांतांच्या, विचारांच्या व्यक्तींना, बोलण्याचे, वागण्याचे, रितीरिवाज, प्रथा-परंपरा पाळण्याचे स्वातंत्र्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आणि राज्यघटनेने दिले आहे. या देशात कोणी छोटा नाही, कोणी मोठा नाही. एक लहान तर दुसरा महान नाही. गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार आहे. या देशात प्रत्येक जण समान आहे. हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिला.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचे, विचारांचे, व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. ते त्यांच्या लेखनात, भाषणात विखुरलेल्या स्वरूपात आढळतात. लेखन, भाषणात विखुरलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मराठीत एकत्रितरीत्या उपलब्ध झाले, तर सामान्य मराठी माणसाला, ग्रामीण भागातील युवकांना, विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समजणे सोपे होणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तरुण पिढीचा थेट संवाद होऊ शकणार आहे. त्यातून भारतीय राज्यघटना, भारतातील लोकशाही आणि आनुषंगिक व्यवस्थेवरचा लोकांचा विश्वास वाढणार आहे. त्यादृष्टीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती'च्या माध्यमातून शासनाचे काम सुरू आहे. या समितीने नुकतेच प्रकाशित केलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग ॲण्ड स्पिचेस व्हॉल्युम २३'; 'डॉ. आंबेडकर लेखन आणि भाषणे', इंग्रजी खंड क्र. २ चा मराठी अनुवाद (भाग १ आणि २); जनता खंड क्रमांक ३ (१० डिसेंबर १९३२ ते २ डिसेंबर १९३३); जनता खास अंक, १९३३ या साहित्यांचा वाचक-अभ्यासकांना निश्चित लाभ होईल. तसेच लवकरच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोअर्स मटेरियल जनता' खंड क्रमांक ३ ते ५ आणि मराठीत अनुवादित 'डॉ. आंबेडकर लेखन आणि भाषणे' खंड ४ व ९ या ग्रंथांचे प्रकाशन करण्याचे नियोजन केले आहे.

## निधीची उपलब्धता

राज्यातील महापुरुषांचा, त्यांच्या विचारांचा उचित सन्मान करण्यासाठी, ठिकठिकाणी त्यांची स्मारके उभारण्यात येत आहेत. इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मुंबईच्या दादर येथील चैत्यभूमी आणि नागपूर येथील दीक्षाभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी निधीची उपलब्धता करण्यात आली आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सामाजिक न्यायाचा, समतेचा, बंधुतेचा विचार रुजवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. राज्य शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांच्या माध्यमातून त्याची प्रचिती येईल. शासनाने बार्टी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टार्टी), सारथी, महाज्योती, अमृत या संस्थांच्या कार्यक्रम-योजनांमध्ये एकसमानता आणण्यासाठी कायमस्वरूपी समिती गठित केली आहे. तसेच या संदर्भात एक सर्वंकष धोरण आखण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. 'सारथी' संस्थेच्या पुण्यातील मुख्यालयासह औंध, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, अमरावतीतील विभागीय उपकेंद्रांचे बांधकाम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे आदिवासींच्या विकासासाठीच्या योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी आदिवासी विकास विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रलंबित निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

## राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समितीची पुनर्रचना

सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून स्टँड अप इंडियाअंतर्गत अनुसूचित जाती/ जमाती या वर्गातील उद्योजकांना १० लाख ते १ कोटी रुपयांच्या कर्जाची सुविधा उपलब्ध केली आहे. राष्ट्रीय वयोश्री योजनेत वयोवृद्धांना वैद्यकीय उपकरणे व अन्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीवर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ मध्ये केंद्र शासनाने केलेल्या सुधारणा राज्यात लागू करण्यात आल्या आहेत. यानुसार मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समिती'ची पुनर्रचना केली आहे.

## सर्वांगीण प्रगतीसाठी विविध योजना

महाराष्ट्र ही पुरोगामी विचारांची, समता-बंधुता-एकता या मूल्यांना आदर्श मानणारी भूमी आहे. या आदर्शांना प्रमाण मानूनच राज्यातील गरीब, वंचित, उपेक्षित समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. या योजना, अभियाने आणि उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यात येत आहे. 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेची नुकतीच सुरुवात करण्यात आली असून, त्या माध्यमातून ८६ लाख शेतकऱ्यांना १,७१२ कोटी रुपयांच्या पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे. शून्य टक्के व्याजाने पीक कर्ज व एक रुपयात पीक विमा असे अनेक कल्याणकारी निर्णय शासनाने घेतले आहेत. राज्यात ७०० ठिकाणी 'बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू केला असून त्यात वाढ करण्यात येत आहे. आपला दवाखान्यासह सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व रुग्णालयांमध्ये गोरगरिबांना विनामूल्य औषधोपचार केले जात आहेत. नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंत विविध आरोग्य विषयक सुविधांचा कॅशलेस स्वरूपात लाभ दिला जात आहे. 'नमो ११ सूत्री कार्यक्रमा'ची अंमलबजावणी देखील सुरू झाली आहे.

राज्यातील महिला, कामगार, तरुणांच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. महिलांना एसटी बसच्या भाड्यात ५० टक्के सवलत दिली जात आहे. मुलींना लखपती करणाऱ्या 'लेक लाडकी' योजनेला मंजुरी दिली आहे. बांधकाम कामगारांचे हित लक्षात घेऊन 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळा'मार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. या योजनांच्या माध्यमातून त्यांना सामाजिक सुरक्षा, आर्थिक साहाय्य आणि उत्तम आरोग्य सुविधा दिल्या जात आहेत. तरुणांच्या कौशल्य विकासासाठी राज्यात ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरू असून यात मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात येत आहे.

सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर असून अन्य राज्यांसाठी मार्गदर्शक काम करत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेला सामाजिक न्यायाचा मार्ग आमच्यासाठी आदर्श, दिशादर्शक आहे. त्याच आदर्शांवर आमच्या सरकारची वाटचाल सुरू राहील.

**शब्दांकन : संतोष तोडकर,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

### शक्तिप्रदत्त समिती स्थापन

इतर मागास, वंचित, उपेक्षित घटकांच्या विकासासाठीही महत्त्वाच्या योजना-निर्णय घेण्यात येत आहेत. धनगर समाजाच्या उन्नतीकरिताच्या योजना प्रभावीरीत्या राबवण्यात येणार असून योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी शक्तिप्रदत्त समिती स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षणासाठी असलेली प्रवेश संख्या वाढवण्यात येणार आहे. नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षणासाठी असलेली ही योजना इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाही लागू करण्याबाबतचा प्रस्ताव तयार केला आहे. इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवास, भोजन; तसेच इतर शैक्षणिक सवलती देणारी आधार योजना लागू करणे, ओबीसी विद्यार्थ्यांच्या राज्यातील ७२ वसतिगृहांसाठी साहित्य खरेदी आणि वित्त व विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजनेच्या अटी व शर्ती शिथिल करण्याबाबतही निर्णय घेत आहोत.

‘अस्पृश्यता निवारणाच्या एका मागोमाग एक अशा पाच परिषदेच्या जत्रा भरल्या जात होत्या, अशा १९२० च्या उगवत्या महिन्यात अस्पृश्यतेच्या तेजोभंगाला कारणीभूत ठरणाऱ्या तत्कालीन स्वातंत्र्याच्या चळवळींना बाबासाहेबांचा हा बहिष्कृतांच्या बंडखोरीचा एल्गार मुंबईसारख्या शहरात प्रथमच ऐकायला मिळत होता. हाच एल्गार पुढे ‘आरक्षण’ नीतीत रुपांतरित झाला. पण ‘आरक्षण’ हे ‘संधीसाठी’ असतं, ते गुणवत्तेशी तडजोडी करत नसतं, हाही संदेश बाबासाहेबांनी याच पहिल्या वाहिल्या भाषणात आपल्या अनुयायांना दिला.

# बाबासाहेबांचे पहिले भाषण

दत्ता भगत

क्रीडा क्षेत्रातल्या एका जातीयवादी प्रकरणाची बातमी वृत्तपत्रात आली आणि मुंबई प्रांतात एकच खळबळ उडाली. बातमी होती उपकप्तानपदी नियुक्त झालेल्या व्यक्तीची. त्या व्यक्तीचे नाव होते पी. बाळू आणि खेळ होता क्रिकेट. हे घडले तेव्हा इ.स.चे साल होते १९११. भीमराव त्यावेळी महाविद्यालयीन शिक्षण घेत होते. त्यांनाही क्रिकेट हा खेळ खूप आवडायचा. पी. बाळू म्हणजे एलफिस्टन हायस्कूलचा माजी विद्यार्थी. बाबासाहेब (भीमराव) हे ही याच शाळेचे विद्यार्थी, पी. बाळू त्यांच्यापेक्षा खूप सीनियर होते. शाळेत शिकत असल्यापासून त्यांना पी. बाळू यांची गोलंदाजी खूप आवडत असे. पी. बाळूची इ. स.१९११ साली उपकप्तानपदी नियुक्ती झाल्यानंतर एवढी खळबळ का उडली? क्रिकेट जगतातला एक डावखुरा फलंदाज म्हणून १९०७ पासून पी. बाळूने या खेळातली आपली चमक दाखवली होती. मग त्याच्या नियुक्तीने खळबळ का उडावी? कारण इतकी वर्ष सर्व प्रेक्षक पी. बाळूचा खेळ पाहून प्रभावित झाले होते; पण तो जन्मजातीने चर्मकार आहे हे क्रिकेट शौकिनांना पहिल्यांदाच कळत होते. त्यामुळे त्यांच्या मनातला जन्मजातीचा द्वेष उफाळून वर आला होता.



खरे तर क्रिकेट हा ब्रिटिशांचा राष्ट्रीय खेळ. त्यामुळे त्याला खूप प्रतिष्ठा होती. नोकरी करण्यासाठी आणि अन्य व्यवसायासाठी जे ब्रिटिश भारतात आले त्यांनी क्रिकेटची मैदानी निर्माण केली, क्रिकेटचे संघ निर्माण केले आणि या देशातल्या मागास जनतेपासून त्यांनी स्वत:चे वेगळेपण राखले.

पुढे भारतातल्या संस्थानिकांचे राजपुत्र, नवाबांची मुले आधुनिक शिक्षणासाठी लंडनला जाऊ लागले. त्यामुळे त्यांनाही या खेळाची गोडी लागली. भारतात परत आल्यानंतर लष्करात ते अधिकारपद स्वीकारून इंग्लंडच्या अधिकाऱ्यांशी बरोबरीच्या नात्याने वागता वागता तेही ब्रिटिश अधिकाऱ्यांबरोबर खेळातले नैपुण्य दाखवू लागले. त्यावेळी पासून आजतागायत क्रिकेट हा खेळ अत्यंत उच्चभ्रू जाती आणि श्रीमंतांच्या खेळाडूंनी प्रभावित झालेला आहे. राष्ट्रीय खेळाची प्रतिष्ठा असल्यामुळे भारतातल्या उच्च मध्यमवर्गीयांना या खेळात रस घेणे यात एक प्रकारची सुप्त स्वरूपातली त्यांची प्रतिष्ठा सुखावत असे. मग अशा या खेळात पी. बाळू कुठून आला, आणि कसा? आणि अशा या पी. बाळूचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खूप मोठा सत्कार समारंभ केव्हा आणि कसा घडवून आणला? याची अनेकांना माहिती नसणार. कारण या घटनेला आता १०० वर्षे उलटून गेली आहेत.

फलंदाजीचा सराव करताना गोरे खेळाडू मैदानात दूर-दूर पोहोचणाऱ्या चेंडूला आपल्याकडे फेकण्यासाठी एखाद्या चुणचुणीत मुलाची निवड करत. त्यासाठी त्या मुलाला तीन रुपये महिना देत असत. मि. ट्रान्स नावाच्या एका गोऱ्या अधिकाऱ्याने या पी. बाळूला त्या कामी नोकरीला लावले. हा मुलगा त्यावेळी शालेय शिक्षण घेत होता. त्या शाळेचे प्राचार्य होते सुभेदार रामजी आंबेडकर. पुढे पी. बाळूचा भाऊ पी. विठ्ठल हाही क्रिकेटर म्हणून चमकला. इंग्रजांनी आपल्या लष्करात स्थानिकांना भरती करताना त्यांचे प्राथमिक पातळीवर शिक्षण व्हावे म्हणून शाळा काढलेल्या असत. त्या शाळेला नॉर्मल स्कूल म्हणत. अशा शाळेवर एखाद्या कर्तबगार सुभेदाराची

प्राचार्यपदी नियुक्ती केली जात असे. एवढेच नाही, तर सैन्यात भरती होणाऱ्या शिपायांच्या मुलामुलींनाही या शाळेत शिक्षण मिळत असे. इंग्रजांच्या या धोरणामुळे लष्करातही अस्पृश्य खूप प्रगत झाले. पी. बाळू धारवाडच्या छावणीत नोकरीस असलेल्या शिपायाचे चिरंजीव होते. धारवाड हा जिल्हा त्यावेळी मुंबई प्रांतात होता. त्यांचे घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातल्या पालवणी गावचे. आपल्या मुलाला चांगले शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी पुण्याच्या नॉर्मल स्कूलमध्ये बाळूला दाखल केले. त्याने शाळा शिकत शिकत, आपल्या गोऱ्या साहेबांना चेंडू पोहोचवता पोहोचवता गोलंदाजी आत्मसात केली. एका परीने हा महाभारतातल्या एकलव्याचा आधुनिक अवतार होता. पी. बाळू 'पुना यंग क्रिकेटर संघाचा' खेळाडू झाला. पुढे हा पी. बाळू शिक्षणासाठी मुंबईला आला. एलफिस्टन हायस्कूलमध्ये दाखल झाला आणि त्याची खेळातली चमक पाहून त्याला 'मुंबईच्या यंग मेन्स क्रिकेट क्लब'मध्ये खेळायची संधी मिळाली. युरोपीय क्लब आणि पुना यंग क्रिकेटर संघ यांचे सामने होताना कळत नकळत सामन्यांना देशभक्तीचा रंग चढत असे. त्याचाच अवशेष म्हणजे आजही पाकिस्तानविरुद्ध भारत असा सामना सुरू झाला की, भारतीयांच्या मनातले स्वदेश प्रेम उसळ्या मारून वर येते. तो काळ तर या दृष्टीने अधिकच संवेदनशील होता. कारण पुणे शहरातल्या दैनंदिन जीवनात लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी प्रेमाचे जबरदस्त वारे वाहत होते. हळूहळू भारतातील इंग्रजांचा एक वेगळा क्रिकेट संघ अस्तित्वात आला. आता या संघाला स्वतःचे नैपुण्य दाखवावे असे वाटू लागले.

या ईर्षेतून लंडनचा 'युरोपीय क्लब' विरुद्ध भारताचा 'यंग मेन्स क्लब' असा एक सामना ८ फेब्रुवारी १९०६ रोजी रंगला. या सामन्यात पी. बाळूने आपल्या खेळाची चमक दाखवली. इ.स १९११ च्या सामन्यात भारतीय संघ जिंकला. आता या संघात भारतीय खेळाडू वाढले होते; पण दोन्ही संघांनी पी. बाळूची गोलंदाजी पाहून तोंडात बोटे घातली. यानंतर पी. बाळू सतत एक दशक क्रिकेट संघात आपले कर्तृत्व दाखवत होता; पण त्याला कधीही कप्तानपद मिळाले नव्हते.

या काळात पी. बाळू पॅव्हेलियनमध्ये बसून लंच घेऊ शकत नव्हता. त्याला डिस्पोजेबल कपातून चहा मिळत असे. चहा पॅव्हेलियनमध्ये बसून पिता येत नसे. लंचसाठी त्याची वेगळ्या टेबलवर व्यवस्था असे. इतकेच नाही तर मुंबईच्या इराण्यांच्या हॉटेलमध्ये अस्पृश्यांसाठी वेगळे कप ठेवले जात. इ.स १९१८ साली बाबासाहेब सिडनेहम कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले, तेव्हा पी. बाळूला अशी वागणूक सहन झाले नाही.

१९११चा सामना एवढा चुरशीचा झाला की, पी. बाळू हा जन्मजातीने चर्मकार आहे हे विसरून क्रिकेट विश्वात त्याच्या खेळाचा खूपच गौरव केला. क्रिकेटच्या जगात पी. बाळू यांचा दरारा वाढतच गेला. अशा या पी. बाळूचा जाहीर सत्कार केला पाहिजे, हे बाबासाहेबांनी सीताराम नामदेव शिवतरकरांना सांगितले. शिवतरकर हे जन्माने चर्मकार होते आणि मुंबईत बाबासाहेबांनी सार्वजनिक कामात गुंतून घेतल्यानंतरचे तेच त्यांचे पहिले जीवश्चकंठश्च



दिली जाते हे त्यांना कळले. युरोपच्या दौऱ्यावर इ.स १९०६ साली भारतीय संघ जेव्हा निघाला, तेव्हा संघातल्या काही खेळाडूंनी आणि व्यवस्थापकामधील तेलुगू ब्राह्मणांनी पी. बाळूच्या समावेशास विरोध केला. त्यामुळे क्रिकेटच्या अंतर वर्तुळात पी. बाळूच्या जन्मजातीवरून त्यांना तिरस्काराची वागणूक दिली जाऊ लागली. इ.स. १९११ साली कप्तान देवधरांच्याऐवजी कप्तानपद पै यांच्याकडे आले. पै यांनी पी. बाळूची उपकप्तानपदी नियुक्ती केली. खरे तर कप्तानपदाची पात्रता असूनही जन्माने अस्पृश्य असल्यामुळे पी. बाळूला कप्तानपद मिळाले नव्हते. त्यांना उपकप्तानपदावर समाधान मानावे लागले; पण उच्चभ्रू क्रिकेट शौकिनांना पी. बाळूचे उपकप्तानपदही मित्र होते. परळच्या म्युनिसिपाल्टी शाळेत ते शिक्षक होते. २५ जानेवारी १९२० रोजी मुंबई येथे करीमभाई इब्राहीम कामगार समाजाच्या लायब्ररीत पी. बाळूचा जाहीर सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. रोहिदास समाजातील अनेक कार्यकर्ते या समारंभास उपस्थित होते. कोल्हापूरहून दत्तोबा पवार मुद्दाम या कार्यक्रमासाठी मुंबईत आले होते. दत्तोबांचे कोल्हापुरात 'लोकमान्य वाहनांचे' दुकान होते. स्वतः राजर्षी शाहू महाराज दत्तोबांना अत्यंत सन्मानाने वागवत असत. लायब्ररी हॉलमध्ये बसायला जागा मिळणार नाही म्हणून पी. बाळूचे अनेक चाहते हॉलबाहेर उभे राहून कार्यक्रम ऐकत होते. रोहिदास विद्यावर्धक समाजाच्या वतीने हा सत्कार समारंभ



आयोजित केला होता. या कार्यक्रमात बाबासाहेबांचे अतिशय चेतना देणारे भाषण तर झाले, पण त्यांनी स्वतःच पी. बाळूचे मानपत्र लिहिले होते, तेही अत्यंत आदरपूर्वक पद्धतीने वाचून दाखवले. आज हे मानपत्र 'मूकनायक'च्या फेब्रुवारी १९२० च्या अंकात वाचकांना वाचायला मिळू शकते.

## बाबासाहेबांनी लिहिलेले मानपत्र

**त्या मानपत्रावर मजकूर खालीलप्रमाणे होता;**

श्री. बाळू बाबाजी पालवणकर आणि त्यांचे बंधू पी. विठ्ठल यास, या अधोगतीप्रत पोहोचलेल्या भारतखंडात जी काही थोडीशी नवरत्ने निर्माण झाली आहेत, त्यात आपली व आपल्या बंधूंची प्रामुख्याने गणना होते, याचा आपल्या जातिबांधवास मोठा अभिमान वाटतो. या भारतखंडाने आपल्या अन्याय्य जातिबंधनाने रोहिदास समाजाचे इतके नुकसान केले आहे, त्या भारतखंडाची लाज आज अनेक वर्षे होत असलेल्या क्रिकेटच्या चौरंगी सामन्यात हिंदूंचा झालेला अपूर्व विजय सर्वस्वी आपल्या व आपल्या बंधूच्या अप्रतिम खेळामुळेच झाला हे निर्विकार आहे... आपणास हिंदू टीमच्या कॅप्टनचा दर्जाही 'गुणकर्म विभागशः' या न्यायाने मिळावयास पाहिजे होता; हे घडले नाही ही खरोखर खेदाची गोष्ट आहे; पण आश्चर्याची खास नव्हे! निदान आपली नीती सुधारणाऱ्या सुधारल्याखेरीज आपली उन्नती होणे नाही, असा उपदेश करणाऱ्या नीतिमान हिंदूंना लाजवणारी तरी ही गोष्ट आहे!

क्रिकेटसारख्या परकीय खेळात आपले मन पूर्णपणे घालून, अनुपम ग्राहकतेने त्यातील मर्म समजून घेऊन तो खेळ आपण आपल्या आपलासा केलात... क्रिकेटचे माहेरघर जो इंग्लंड देश तेथेही लोकांनी आपल्या क्रिकेट पुरत्वाची वाखाणणी केली आहे!

## बाबासाहेबांचा संदेश

मानपत्र वाचून झाल्यानंतर बाबासाहेबांनी पी.बाळूंना ते चांदीच्या करंड्यातून प्रदान केले; पण त्यानंतर त्यांनी जे भाषण केले ते अतिशय महत्त्वाचे होते, ते म्हणाले, 'आम्ही लायक नाही म्हणून आमची स्वराज्याची मागणी लांबवत नेणाऱ्या आमच्या सरकारने पी. बाळूचे उदाहरण लक्षात घ्यायला पाहिजे; आम्ही पुरते लायकच नाही तर पुरेसे सोशिकही आहोत! म्हणून तर या पी. बाळूंना कप्तानपद मिळावे याची आम्ही कधी मागणी केली नाही किंवा त्यांना डावलले; याची साधी तक्रारही केली नाही.'

'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे', असे इंग्रजांना गर्जून सांगणारे लोकमान्य टिळक अजून ह्यात होते; रोलेट ॲक्ट हा व्यक्तीस्वातंत्र्यावर घाला घालणारा कायदा आहे, असे सांगून असहकाराच्या आंदोलनाद्वारे महात्मा गांधींचा स्वातंत्र्य चळवळीत उदय होत होता आणि गेल्या वर्षभरात 'अस्पृश्यता निवारणा'च्या एका मागोमाग एक अशा पाच परिषदेच्या जत्रा भरल्या जात होत्या, अशा १९२० च्या उगवत्या महिन्यात अस्पृश्यतेच्या तेजोभंगाला कारणीभूत ठरणाऱ्या तत्कालीन स्वातंत्र्याच्या चळवळींना बाबासाहेबांचा हा बहिष्कृतांच्या बंडखोरीचा एल्गार मुंबईसारख्या शहरात प्रथमच ऐकायला मिळत होता. हाच एल्गार पुढे 'आरक्षण' नीतीत रुपांतरित झाला. पण 'आरक्षण' हे 'संधीसाठी' असतं, ते गुणवत्तेशी तडजोडी करत नसतं, हाही संदेश बाबासाहेबांनी याच पहिल्या वहिल्या भाषणात आपल्या अनुयायांना दिला.

**(लेखक हे ज्येष्ठ नाटककार, साहित्यिक व व्याख्याते आहेत.)**

**सर्व मूलभूत गोष्टी घटना साकार करू इच्छित व ज्या साकार करण्याकरिता घटनेत तरतुदी केलेल्या आहेत, त्याचे दिग्दर्शन सरनाम्यात यथोचित संकल्पनांच्याद्वारे करण्यात आले आहे. म्हणूनच घटनेतील मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे याप्रमाणेच सरनामा हा घटनेचा पायाभूत भाग मानण्यात आला आहे व घटनेत दुरुस्ती करून तो बदलण्यात येणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.**

# राज्यघटनेचा सरनामा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**न्या. पी. बी. सावंत**

आमच्या राज्यघटनेचा जन्म डिसेंबर १९४६ ते डिसेंबर १९४९ या तीन वर्षांच्या दीर्घ प्रसूतिवेदनांनंतर झाला. या काळाने दुसऱ्या महायुद्धाचा अंत नुकताच पाहिला होता व त्याबरोबरच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेचे स्वागतही केले होते. प्रसूतिवेदनांच्या काळातच संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केलेली मानवी हक्कांची सनद त्याने वाचली होती व युद्धाने लोकशाहीला 'फासी'वादावर मिळवून दिलेल्या विजयावर या सनदेने केलेले शिक्कामोर्तब पाहून समाधानाचा निःश्वास टाकला होता. आमच्या घटनेला आणखी दोन महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय घटितांची पार्श्वभूमी होती. १९१७ साली सोव्हिएत युनियनमध्ये व १९४९ साली चीनमध्ये झालेली साम्यवादी क्रांती.

परंतु घटनेची जडणघडण होत असतानाच देशावर, धर्माच्या पायावर झालेल्या फाळणीचा आघात व त्यापूर्वी व त्यानंतर झालेले अभूतपूर्व मानवी हत्याकांड याचे भीषण दृश्य तर घटनाकारांना रात्रंदिवस भेडसावीत होते. आमच्या घटनेवर या सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटितांचा परिणाम प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या झाला आहे, हे लक्षात ठेवून घटनेच्या सरनाम्याचा अभ्यास होणे अत्यावश्यक आहे. घटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी व तत्कालिक परिस्थिती नीट समजून घेतल्याशिवाय घटनेचा यथार्थ बोध होणे कठीण असते. घटनेचा सरनामा हा तर घटनेचे ध्येय-धोरण, स्वरूप व गाभा यांचा आरसा असतो. संक्षिप्त भाषेत; पण अर्थपूर्ण शब्दांत संकीर्णपणे केलेले ते घटनेवरील भाष्यच असते. ते नीट न्याहाळणे अभ्यासकांचे कर्तव्य असते.



१९५० साली जेव्हा घटना अमलात आली तेव्हा सरनाम्याच्या उपोद्घातात 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' हे शब्द व त्याच्या चौथ्या परिच्छेदात 'एकात्मता' हा शब्द नव्हता. याचा अर्थ घटनेला आरंभी या शब्दांचे वावडे होते असा नाही. उलट या संकल्पना घटनेच्या इतर तरतुदीत अविभाज्यपणे पूर्वीपासूनच गुंफलेल्या आहेत; परंतु अस्थिर राजकीय परिस्थिती व या संकल्पनांच्या स्पष्ट उल्लेखाचा अभाव यांचा फायदा घेऊन काही प्रतिगामी शक्ती जेव्हा घटनेला अभिप्रेत असलेल्या समाजपरिवर्तनाविरुद्ध हालचाली करू लागल्या, तेव्हा १९७६ साली घटनेत दुरुस्ती करून जाणीवपूर्वक व घटनेच्या मूळ हेतूचा पुनरुच्चार करण्याकरिता या संकल्पना अलगपणे स्पष्ट शब्दात मांडण्यात आल्या. कुठल्याही बाह्य बंधनाशिवाय जो देश आपला अंतर्गत कारभार व परदेशी व्यवहार आपल्या इच्छेप्रमाणे करू शकतो, तोच देश सार्वभौम असतो. ज्या देशातील जनता आपल्या देशाचा कारभार स्वतःच्या इच्छेप्रमाणे चालवते, तिथेच गणराज्य वा लोकसत्ताक राज्य असते. जिथे सर्व जनता, सर्व जनतेच्या इच्छेप्रमाणे व सर्व जनतेच्या हिताकरिता राजवट चालवते, तिथे लोकशाही नांदत असते. जिथे कुठल्याही एका धर्माचे, पंथाचे वा समाजसमूहाचे राज्य नसते, तिथे धर्मनिरपेक्ष राजवट असते. जिथे सर्व स्त्री-पुरुष 'नागरिक' म्हणून सर्व दृष्टीने समर्थ असतात, जिथे कमीत कमी आर्थिक व सामाजिक विषमता असते, जिथे कुणालाही इतरांना आर्थिक वा मानसिक 'दास' करण्याची संधी नसते व उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची असतात, तिथे समाजवादी समाज अस्तित्वात असतो.

अशाच समाजात सर्वांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळतो आणि आचार-विचाराचे, उक्तीचे व भक्तीचे स्वातंत्र्य असते. अशाच समाजात सर्वांना समान स्थान व संधी मिळते आणि बंधुता व व्यक्तीची प्रतिष्ठा जोपासली जाते. तसेच देशाच्या ऐक्याची व एकात्मतेची रक्षा होते.

वरील ज्या सर्व मूलभूत गोष्टी घटना साकार करू इच्छितात व ज्या साकार करण्याकरिता घटनेत तरतुदी केलेल्या आहेत, त्याचे दिग्दर्शन सरनाम्यात यथोचित संकल्पनांच्याद्वारे करण्यात आले आहे. म्हणूनच घटनेतील मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे याप्रमाणेच सरनामा हा घटनेचा पायाभूत भाग मानण्यात आला आहे व घटनेत दुरुस्ती करून तो बदलण्यात येणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

ज्या डॉ. आंबेडकरांनी घटना साकार करण्यात प्रमुख योगदान दिले, त्यांच्याच लेखणीतून घटनेचा मतितार्थ सरनाम्याच्या स्वरूपात व्यक्त होणे हे स्वाभाविक, योग्य व औचित्यपूर्ण होते. त्यांनी ही जबाबदारी किती समर्थपणे व निर्णायकरीत्या पार पाडली आहे, हे सरनाम्याच्या छोटेखानी; परंतु निनादणाऱ्या प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट होते. सरनाम्याच्या रूपात घटनेचा आत्माच आपल्याशी बोलत आहे असा भास होतो. तो प्रत्येक नागरिकाने मुखोद्गत करून त्याचे नेहमी स्मरण करणे आवश्यक आहे. देशाला ज्या नवसमाजाची आवश्यकता आहे, ज्या समाजनिर्मितीचे आव्हान घटनेने आम्हाला दिले आहे व जे समाजपरिवर्तन घडवून आणण्याची प्रतिज्ञा आम्ही सर्व भारतीयांनी केली आहे, ती जबाबदारी आम्हाला पूर्ण करायची आहे, याची आठवण त्यामुळे सर्वांना सदोदित होत राहील.

(लोकराज्य ऑक्टोबर-२००६ मधून पुनर्मुद्रित)

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथांपैकी 'द अनटचेबल्स्' हा एक ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक महान विचारवंत रूसो आणि वॉल्टेअर यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. या ग्रंथाने यावर्षी अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्त जागतिक विचारवंतांच्या जीवनकार्याची ओळख..**

# अमृतमहोत्सवी 'द अनटचेबल्स्'


**मिलिंद मानकर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऑक्टोबर १९४८ साली प्रकाशित केलेल्या 'द अनटचेबल्स्' या ग्रंथात अस्पृश्यता उत्पत्तीच्या सिद्धान्ताबद्दल मार्मिक विवेचन लिहून ठेवले आहे. त्यांनी संदर्भांसह या ग्रंथात सिद्ध केले की, 'अस्पृश्य पूर्वी पराभूत लोक होते आणि बौद्ध धर्म तसेच गोमांस खाणे न सोडल्याने त्यांना अस्पृश्य मानले गेले.' ते पुढे लिहितात, 'अस्पृश्यतेचा उगम इ.स. ४०० च्या दरम्यान झाला असावा. बौद्ध धर्म आणि ब्राह्मण धर्म यात श्रेष्ठत्वासाठी जो संघर्ष झाला, त्यापासून अस्पृश्यतेचा जन्म झाला'. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील दोन महान बंडखोर म्हणून रूसो आणि वॉल्टेअर या विचारवंतांचा खास उल्लेख केला आणि म्हटले, 'ब्राह्मणी वाङ्मयाने वॉल्टेअरसारखा बुद्धिवादी नेता निर्माण केला नाही. मागासवर्गीय समाजातून रूसो, वॉल्टेअर सारखे क्रांतिकारक साहित्यिक निर्माण व्हावेत' अशी त्यांची इच्छा होती. रूसो आणि वॉल्टेअर या विचारवंतांसोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर जॉन स्टुअर्ट मिल, एडमंड बर्क, थॉमस पेन, थॉमस जेफर्सन यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव पडला होता.

'फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक' म्हणून वॉल्टेअर आणि रूसो यांना सर्व जग ओळखते. फ्रेंच राज्यक्रांतीचे समता, स्वातंत्र्य आणि बंधूप्रेम या त्रिरत्नाचे तत्त्वज्ञान सर्व जगभर पसरले. मानवी प्रगतीच्या जागतिक इतिहासात फ्रेंच राज्यक्रांतीची घटना सुवर्णाक्षराने लिहिली गेली. रूसो यांचा 'सामाजिक करार' हा राज्यशास्त्रावर आधारलेला ग्रंथ जगप्रसिद्ध आहे. शिक्षणशास्त्रावर 'एमिल' नावाचा ग्रंथ लिहून त्याने आपले विद्रोही विचार मांडले. या ग्रंथामुळे सर्व फ्रान्स देशात खळबळ माजली होती. रूसोचे तत्त्वज्ञान भावनात्मक आणि अद्भुतरम्य होते असे त्याचे टीकाकार म्हणतात. 'ज्याला आपण उत्तम कला, नीती नियम, चांगल्या रूढी, उत्तम संस्कृती असे समजतो तो समाज आणि उच्च लोकांची संस्कृती खरोखरच उच्च आहे काय? याचा पुनर्विचार व्हावा' असे रूसोचे म्हणणे होते. रूसो, वॉल्टेअर हे समकालीन युगप्रवर्तक विचारवंत होते. बुद्धिवंतांना त्यांनी नवा जीवनादर्श दिला.

वॉल्टेअर बुद्धिवादी तत्त्वज्ञान मांडण्यात अतिशय हुशार होता. समाजातील दुष्ट रूढी, अंधश्रद्धा, बुवाबाजी, ढोंगबाजी, दुर्बलांवरील अन्याय यावर तो उपहासात्मक लेखन करत असे. प्रत्येक कार्याला काही तरी कारण असते आणि या कार्यकारण भावाच्या साखळीने सर्व जग बांधलेले आहे. हा कार्यकारणभावाचा वैज्ञानिक सिद्धान्त त्याने आपल्या लेखणीतून जगासमोर ठेवला. त्याला रंगभूमीची भावनात्मक आवड होती. फ्रान्सच्या इतिहासातून प्रेरणा घेऊन त्याने अनेक नाटके लिहिली. 'धार्मिक स्वातंत्र्य माणसाला असावयास पाहिजे' हा विचार त्याने इंग्लंड देशाकडून घेतला. मानवतावादी आणि बुद्धिवादी








दृष्टिकोन समोर ठेवून जनप्रबोधनासाठी ‘कॉंदीद’ आणि ‘झॉडीग’ या जगप्रसिद्ध कादंबऱ्यांची रचना केली. ज्या रूसो आणि वॉल्टेअरने फ्रान्सची राज्यक्रांती घडवली, त्यांच्या लेखनशैलीचा आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे होता. रूसोची तळमळ आणि वॉल्टेअरचा बुद्धिवाद त्यांच्या लेखणीत होता. वॉल्टेअरची विचारपद्धती, प्रतिपक्षावर कठोर आसूड ओढण्याची पद्धती त्यांनी जोपासली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडला समतावादी चवदार तळे सत्याग्रह केला. त्या सत्याग्रहाची तुलना त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीसाठी बोलावलेल्या सभेशी केली होती. (महाड सत्याग्रहाप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण, २५ डिसेंबर १९२७)



शोषित, मजूर, दीनदुबळे, उपेक्षित स्त्री, शूद्र यांना उचलून धरण्यासाठी जॉन स्टुअर्ट मिल यांनी आपले विचार मांडले. स्त्री दास्य मुक्ती आंदोलन, मत प्रदर्शनाच्या स्वातंत्र्यावर मिलने जोर दिला. भारतीय स्त्रियांच्या उद्धार आणि अधोगती याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले सविस्तर विचार मांडले. हिंदू अबलांचा सामाजिक दर्जा सुधारावा म्हणून ‘हिंदू कोडबिल’ मांडले. अशाप्रकारे मिल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांत बरेच साम्य दिसून येते. ‘राज्यशास्त्राचा जनक’ म्हणून एडमंड बर्क ओळखले जातात. ते न्यायप्रिय होते. बर्क म्हणायचे, ‘सामाजिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य. समान निर्बंध घालूनच खरे स्वातंत्र्य प्राप्त होते. सामाजिक, आर्थिक न्यायाची हमी हेच खरे स्वातंत्र्य. ज्यावेळी स्वातंत्र्याची आणि न्यायाची फारकत होते, त्यावेळी गुलामगिरी आणि अन्याय सुरू होतात’, असे त्यांना वाटे. त्यांनी पार्लमेंटमध्ये दिलेली सर्वच भाषणे हा ज्ञानाचा अमोल ठेवा आहे. त्यांचे प्रत्येक वाक्य हे सुभाषितच होय.

अस्पृश्यता, जातीयता, वर्णाश्रमधर्माची पद्धत कशी अशास्त्रीय, अनैसर्गिक आणि कालबाह्य आहे हे भारतीय जनतेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी थॉमस पेनसारख्या प्रभावी भाषेत समजावून सांगितले, ‘एक माणूस हा दुसऱ्या माणसाची किंवा एक पिढी ही दुसऱ्या पिढीची मालमत्ता होऊ शकत नाही.’ जगातील थोर माणसे लोकशाही समाजातून निर्माण झाली. विकास आणि मानवी कल्याणाच्या बाबतीत लोकशाहीची बरोबरी दुसरी राज्यव्यवस्था करू शकत नाही’ असे पेन यांचे ठाम मत होते. ते लोकशाहीचे परम उपासक होते. त्यांनी आपला ‘राईटस् ऑफ मॅन’ हा ग्रंथ जॉर्ज वॉशिंग्टन यांना अर्पण केला होता. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही मतप्रणालीवर नितांत श्रद्धा होती. म्हणूनच त्यांना पेनचे तत्त्वज्ञान आवडले असणार!

एका मानवाचे नैसर्गिक हक्क दुसऱ्या मानवास विकण्याचा अधिकार ज्यांनी नाकारला. सामाजिक, धार्मिक पिळवणुकीविरुद्ध आसूड ज्यांनी उचलला अशा महान क्रांतिकारकांपैकी थॉमस जेफर्सन हे एक आहेत. ‘ब्रिटिश अमेरिकेच्या हक्काचे संक्षिप्त दर्शन’, ‘नोटस् ऑन व्हर्जिनिया’ नावाचे ग्रंथ त्यांनी लिहिले. स्वातंत्र्याचा जाहीरनामा, धार्मिक स्वातंत्र्याचा कायदा आणि व्हर्जिनिया विद्यापीठाची स्थापना या तीन बाबी त्यांनी केल्या. आपल्या थडग्यावरील स्मृतिलेखात या बाबींचा उल्लेख करावा अशी त्यांची स्वतःची इच्छा होती. ‘जन्मतःच माणसाला स्वातंत्र्याचा आणि जगण्याचा नैसर्गिक हक्क प्राप्त झाला आहे. तो कोणालाच हिरावून घेता येणार नाही’ असे तो ठासून सांगत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणेच जेफर्सनला ग्रंथवाचन आणि ग्रंथसंग्रह करण्याची आवड होती. सुसज्ज ग्रंथालय त्यांनी स्वतःच्या मार्गदर्शनाखाली बांधून घेतले होते. लोकशाहीची जोपासना करण्यासाठी सुसंस्कृत माणसांची, उत्तम शिक्षणाची आणि संस्काराची आवश्यकता असते म्हणून जेफर्सनने आपल्या २५० एकर जमिनीवर राहत्या घराजवळ व्हर्जिनिया विद्यापीठाची स्थापना केली. राहत्या खोलीमध्ये बसून दुर्बीण लावून तो विद्यापीठाच्या कारभारावर देखरेख करत असे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जेफर्सनचा कॉलेज काढण्याचा आणि चालवण्याचा आदर्श अनुसरला. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून मुंबई, छत्रपती संभाजीनगरला (औरंगाबाद) महाविद्यालये सुरू केली. उत्तम पोशाख वापरण्याची भारी हौस जेफर्सनला होती, तशीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होती. मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजात एका प्रसंगी भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ‘भारतातील नीटनेटका पोशाख करणाऱ्या बॅरिस्टरांपैकी मी एक आहे.’ संविधान व कायदे या विषयावर जेफर्सनचा सखोल अभ्यास होता. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कायद्याचे सखोल ज्ञान असल्यामुळे ते भारतीय संविधानाचे शिल्पकार ठरले.

**(लेखक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आठवणींचे संग्राहक आहेत.)**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १४ एप्रिल १८९१ | महू, मध्य प्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म. |
| १९०७ | डॉ. आंबेडकरांनी मॅट्रिकची परीक्षा पास केली. |
| १९०७ | रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह. |
| १९१० | इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण. |
| १९१२ | बी.ए. परीक्षा उत्तीर्ण. |
| २ फेब्रुवारी १९१३ | वडील सुभेदार रामजी यांचे निधन. |
| १ जून १९१३ | सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती बहाल केली. |
| १९१३ | उच्च शिक्षणाकरिता न्यूयॉर्क (अमेरिका) येथे रवाना. |
| १९१५ | 'ॲन्शंट इंडियन कॉमर्स' या प्रबंधावर एम.ए.ची उपाधी बहाल. |
| जून १९१६ | 'नॅशनल डिविडंड ऑफ इंडिया : ए हिस्टारिक ॲंड अनालिटिकल स्टडी' प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत. |
| १९१६ | 'कास्ट इन इंडिया, देअर मेकॅनिझम जेनिसिस ॲंड डेव्हलपमेंट' या निबंधाचे वाचन. |
| १९१६ | पीएच.डी.ची पदवी बहाल. |
| ११ नोव्हेंबर १९१८ | सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नियुक्ती. |
| ३१ जानेवारी १९२० | राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या साहाय्याने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित. |
| १ मार्च १९२० | माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद. |
| १ मे १९२० | अखिल भारतीय बहिष्कृत परिषद, नागपूर. |
| १९२२ | बॅरिस्टरची परीक्षा पास |
| १९२३ | डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी बहाल. |
| २० जुलै १९२४ | 'बहिष्कृत हितकारिणी सभा'ची स्थापना, मुंबई |
| १९ मार्च १९२७ | कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड. |
| ३ एप्रिल १९२७ | 'बहिष्कृत भारत' पाक्षिकाचे प्रकाशन. |
| १९२७ | मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड. |
| ४ सप्टेंबर १९२७ | 'समाज समता संघा'ची स्थापना. |
| १३ नोव्हेंबर १९२७ | अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह. |
| २५ डिसेंबर १९२७ | महाडचा सत्याग्रह आणि 'मनुस्मृती' दहन. |
| जून १९२८ | मुंबई येथे सरकारी विधि महाविद्यालयात प्राध्यापक. |
| २९ जून १९२८ | समता पाक्षिकाचा आरंभ. |

| | |
|---|---|
| २३ ऑक्टोबर १९२८ | सायमन कमिशनपुढे साक्ष. |
| १९२९ | अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण. |
| ३ मार्च १९३० | काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ. |
| २ ऑक्टोबर १९३० | लंडन येथे गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना. |
| नोव्हेंबर १९३० | गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली. |
| २४ नोव्हेंबर १९३० | 'जनता' साप्ताहिकाचा आरंभ. |
| १४ ऑगस्ट १९३१ | मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट. |
| ८ ऑक्टोबर १९३१ | अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध. |
| २६ नोव्हेंबर १९३१ | गांधी-आंबेडकर-पंचम जार्ज यांची भेट. |
| २५ सप्टेंबर १९३२ | पुणे करारावर स्वाक्षरी. |
| २७ मे १९३५ | पत्नी रमाबाई यांचे निधन. |
| २ जून १९३५ | मुंबई, विधि महाविद्यालयाच्या प्राचार्यपदावर नियुक्ती. |
| १३ ऑक्टोबर १९३५ | येवला, 'हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही.' डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा. |
| मे १९३६ | 'जातिप्रथेचे उन्मूलन' भाषण प्रकाशित. |
| ३१ मे १९३६ | 'मुक्ती कोन पथे' विख्यात भाषण, मुंबई |
| १५ ऑगस्ट १९३६ | स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना. |
| १७ फेब्रुवारी १९३७ | मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ. आंबेडकर विजयी. |
| १७ सप्टेंबर १९३७ | कोकणातील 'खोती' नष्ट करण्याकरिता मुंबई विधिमंडळात बिल मांडले. |
| ४ जानेवारी १९३८ | पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण. |
| १२-१३ फेब्रुवारी १९३८ | मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद. |
| मे १९३८ | मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावरून राजीनामा. |
| सप्टेंबर १९३८ | औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. |
| ७ नोव्हेंबर १९३८ | स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह. |
| जानेवारी १९३९ | महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद- कॉंग्रेसच्या शेतकरी-विरोधी-धोरणावर टीका. |
| २२ जून १९४० | मुंबई, सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट. |

| | |
|---|---|
| १९४० | 'थॉट्स ऑन पाकिस्तान' ग्रंथाचे प्रकाशन. |
| एप्रिल १९४२ | अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना. |
| १९ जुलै १९४२ | भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर. |
| १९४२ | मजूर मंत्री म्हणून निवड. |
| १९ जाने.१९४३ | पुणे येथे विख्यात भाषण. रानडे, गांधी आणि जिन्ना. |
| जून १९४५ | 'काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रति काय केले?' ग्रंथ प्रकाशित. |
| २० जून १९४६ | मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना |
| १९४६ | 'शूद्र पूर्वी कोण होते?' हा ग्रंथ प्रकाशित. |
| १७ डिसेंबर १९४६ | भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करू शकत नाही. संविधान सभेत भाषण. |
| ऑगस्ट १९४७ | भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश. |
| २९ ऑगस्ट १९४७ | संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर निवड. |
| १५ एप्रिल १९४८ | डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह. |
| ऑक्टोबर १९४८ | 'दि अनटचेबल्स्' ग्रंथ प्रकाशित. |
| सप्टेंबर १९४८ | सरसंघचालक माधवराव गोळवलकर यांच्या सोबत भेट. |
| ४ नोव्हेंबर १९४८ | घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला. |
| २५ नोव्हेंबर १९४९ | घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण. |
| २६ नोव्हेंबर १९४९ | घटना समितीने घटना स्वीकार केली. |
| मे १९५० | 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध. |
| २५ मे १९५० | कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित. |
| १९ जून १९५० | छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन. |
| मे १९५१ | लोकप्रतिनिधित्व विधेयक लोकसभेपुढे मांडले. |
| सप्टेंबर १९५१ | 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित. |
| २७ सप्टेंबर १९५१ | हिंदू कोडबिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा. |

| | |
|---|---|
| जानेवारी १९५२ | प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव. |
| मार्च १९५२ | राज्यसभेसाठी निवड. |
| ५ जून १९५२ | कोलंबिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी अर्पण. |
| १२ जानेवारी १९५३ | हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी अर्पण. |
| ३० जानेवारी १९५४ | 'महात्मा फुले' बोलपट चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित. |
| मे १९५४ | भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव. |
| ३ ऑक्टोबर १९५४ | आकाशवाणीवर 'माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान' भाषण. |
| २८ ऑक्टोबर १९५४ | माझे आयुष्य तीन गुरूंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले. |
| डिसेंबर १९५४ | रंगून, तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित. |
| ४ मे १९५५ | भारतीय बौद्ध महासभा स्थापित. |
| ४ फेब्रुवारी १९५६ | मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली. |
| २४ मे १९५६ | नरेपार्क येथे ऑक्टोबर महिन्यात 'मी बौद्धधर्माची दीक्षा घेईन' अशी घोषणा केली. |
| १४ ऑक्टोबर १९५६ | नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसोबत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बंधूंना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. |
| १५ ऑक्टोबर १९५६ | बौद्ध धम्म का स्वीकारला या विषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपाल्टीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण. |
| १६ ऑक्टोबर १९५६ | चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बंधूंना धम्मदीक्षा दिली. |
| २० नोव्हेंबर १९५६ | काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत 'बुद्ध आणि कार्लमार्क्स' हे अभूतपूर्व भाषण दिले. |
| ६ डिसेंबर १९५६ | दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण. |
| ७ डिसेंबर १९५६ | मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार. |

(लोकराज्य ऑक्टोबर २००६ मधून पुनर्मुद्रित)

**शासन व लोकशाहीबाबतच्या वरील मतांवरून डॉ. आंबेडकर यांची ही भूमिका स्पष्ट होते की, त्यांचा लोकसंमतीवर आधारित शासनावर विश्वास होता. जनता ही स्वतंत्र असावी व अभिव्यक्ती करावयास सक्षम असावी. सामाजिक बंधनापासून ती मुक्त असावी. बाबासाहेबांचे लोकशाहीवरील विचार हे अत्यंत सुस्पष्ट होते. जर मी कायदे बनवण्याच्या प्रक्रियेतील घटक नसेल तर मी त्यांचे पालन का करावे? असा त्यांचा सवाल होता. त्यांच्या मते समाज हा माणसांचा नव्हे, तर वर्गांचा बनलेला असतो आणि म्हणूनच शासनात साऱ्या वर्गांना प्रतिनिधित्व असावे, जेणेकरून स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रत्यक्षात आणता येईल असा त्यांचा आग्रह होता.**

# कायदा व सामाजिक न्याय

**डॉ. मुंशीलाल गौतम**

सॉक्रेटीसने म्हटल्याप्रमाणे 'न्याय म्हणजे शक्तिशाली लोकांचे हित' जे भारतीय समाजात तंतोतंत लागू होते. कारण या समाजात कायद्यानुसार जरी सामाजिक समानता, समान सुरक्षा आणि कायद्यासमोर समानता या गोष्टी अस्तित्वात असल्या तरी 'नाही रे' आणि गरीब वर्गासाठी न्याय हा शब्दच त्यांच्या आवाक्याबाहेर आहे.

रोसलो पाऊंडने म्हटले आहे की, 'कायद्याचे अंतिम ध्येय हे सामाजिक गरजांची पूर्तता करणे होय.' 'ज्या कायद्याचे पालन जनतेने करावे असे वाटते, त्याची उपयुक्तता सिद्ध झाली पाहिजे. त्याचा फायदा हा चांगल्या दृष्टिकोनातून झाला पाहिजे', असे प्रख्यात कायदेविषयक सुधारक जेर्मी वेधनने म्हटले आहे. एच. लास्कीच्या म्हणण्यामागे लोक केवळ पाळायचा म्हणून कायद्याचे पालन करत नाहीत, तर त्यामुळे निर्माण होणाऱ्या सुरक्षिततेच्या भावनेतून करतात.

राजकीय चिंतकांनी सांगितलेच आहे की, लोक त्याच शासनाच्या आदेशांचे पालन करतात की, जे कायद्याद्वारे लोकांच्या गरजा पूर्ण करतात आणि स्वतःचे अस्तित्वही जपतात.

ॲरिस्टॉटल म्हणतो की, 'शासन हे चांगले जीवन घडवते. चांगले जीवन म्हणजे लोकांचा सामाजिक, नैतिक विकास जो की शासनाद्वारे आणि कायद्याचे पालन करून होतो.'

हॉब्स मात्र सरंजामशाहीचा पुरस्कार करतो. त्याच्या मते लोक एखाद्या व्यक्ती किंवा व्यक्तींच्या संघटनेला / समूहाला शरण जातात. कारण त्यातून त्यांना वैयक्तिक व सर्वंकष सुरक्षितता हवी असते. हॉब्स म्हणतो की, अशी कोणतीही मानवी संस्कृती असू शकत नाही की, ज्यात जन्म व मृत्यूबाबत सुरक्षितता प्रदान केलेली नसेल.

लॉक अशा नागरी समाजाची कल्पना करतो की, जो लोकांच्या संमतीने बनवला गेला आहे. मात्र या अटीवर की जर शासन त्यांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करण्यास अपयशी ठरले तर ते सुद्धा शासनाचे आदेश पाळायला बांधील राहणार नाहीत.

'शासन हे सर्वसामान्यांच्या इच्छांचे मूर्तस्वरूप आहे' असे रोशे याचे मत आहे.



माणूस हा स्वातंत्र्याचा उपभोग शासनांच्या कायद्यांचे पालन करून अधिक चांगल्या प्रकारे घेऊ शकतो. याप्रकारे जनता आपल्या इच्छांच्या मूर्तरूपाचा अनुभव कायद्याद्वारे घेऊ शकते आणि स्वतःच्याच इच्छांचे पालन करून उत्तम जीवन जगू शकते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शासनाची व्याख्या केली नाही, तरीही त्यांची शासनाबाबतची मते इतर ठिकाणी आढळतात. उदाहरणार्थ, संविधानातील कलम-३४ चा पुरस्कार करताना भाषणात त्यांनी म्हटले होते की, 'मूलभूत अधिकारांचा तेव्हा काहीही कायदा नसतो, जेव्हा राज्यच / शासनच गर्तेत सापडले असते. राज्याची सुरक्षितता ही कधीही जनतेच्या सुरक्षिततेच्यावर असते.' त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर यांचा लोकशाही प्रणालीतील विश्वासही दिसून येतो. 'माझ्या मते स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित समान आदर्श आहे. आदर्श समाजात एका भागात होणारा बदल दुसऱ्या भागात माहिती होण्याकरिता संसाधने उपलब्ध असतात. यामुळे दोन घटकांतील संवाद वाढण्यास मदत होऊन बंधुतेचा विकास होतो आणि यालाच लोकशाही म्हणतात. लोकशाही म्हणजे केवळ सरकारचे स्वरूप नव्हे, तर ती म्हणजे समूहजीवन, सुसंवादाची अनुभूती होय. लोकशाही म्हणजे इतरांबद्दल आदर व सन्मान राखणे होय.'

शासन व लोकशाहीबाबतच्या वरील मतांवरून डॉ. आंबेडकर यांची ही भूमिका स्पष्ट होते की, त्यांचा लोकसंमतीवर आधारित शासनावर विश्वास होता. जनता ही स्वतंत्र असावी व अभिव्यक्ती करावयास सक्षम असावी. सामाजिक बंधनांपासून ती मुक्त असावी. बाबासाहेबांचे लोकशाहीवरील विचार हे अत्यंत सुस्पष्ट होते. जर मी कायदे बनवण्याच्या प्रक्रियेतील घटक नसेल तर मी त्यांचे पालन का करावे? असा त्यांचा सवाल होता. त्यांच्या मते समाज हा माणसांचा नव्हे, तर वर्गांचा बनलेला असतो आणि म्हणूनच शासनात साऱ्या वर्गांना प्रतिनिधित्व असावे जेणेकरून स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रत्यक्षात आणता येईल, असा त्यांचा आग्रह होता.

न्यायाचे दोन प्रकार आहेत. कायद्याद्वारे मिळणारा आणि सामाजिक. कायदेशीर न्याय म्हणजे राष्ट्रीयत्व आणि सद्सद्विवेक यावर आधारित कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होय. तर सामाजिक न्याय आधारित असतो, सामाजिक गरजा ध्यानात ठेवून बनवलेल्या कायद्यांच्या अंमलबजावणीवर समाजातील साऱ्या वर्गाच्या / घटकांच्या सामाजिक गरजा समान नसतात. जसे की, दिव्यांगाच्या अथवा सामाजिक दमनाचे शतकानुशतके बळी ठरलेल्यांच्या सामाजिक गरजा वेगवेगळ्या असतील. त्यामुळे त्यांना वेगवेगळे कायदे लागतील किंवा कायद्याच्या चौकटीतच निदान वेगळी वागणूक देणे गरजेचे राहील. त्यांना इतर प्रगत वर्गाच्या रांगेत नेऊन बसवायला, वरीलप्रमाणे परिणामकारक वागणूक देण्यासाठी एक सकारात्मक हस्तक्षेप आवश्यक आहे. त्यालाच 'संरक्षक भेद' म्हणतात.

२०व्या शतकातील प्रख्यात विधिज्ञ रोसलो पाऊंडने या संदर्भात कायद्याचे अंतिम उद्दिष्ट काय असावे हे स्पष्ट केले आहे. त्याच्या मते कायदा हा समाजात विविध घटनाक्रमातही शांतता अबाधित राखण्याकरिता अस्तित्वात असतो. त्यालाच कायद्याची प्राथमिक संकल्पना म्हणतात. सर्वसामान्य सुरक्षिततेच्या सामाजिक गरजेची पूर्तता कायदेशीररीत्या करून समाधान मिळवून देणे हे त्यातून अभिप्रेत आहे.

ग्रीक विचारवंतांनी सर्वसामान्य सुरक्षिततेचा व्यापक दृष्टिकोनातून विचार केला आणि सामाजिक परिस्थितीत आरक्षणाला कायद्याच्या ध्येयाशी निगडित केले. सामाजिक संस्थांच्या सुरक्षिततेशी त्यांनी सर्वसामान्यांच्या सुरक्षिततेला जोडले. समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या नैसर्गिक गुणांसहित आणि इतरांशी होणारा वाद टाळण्याकरिता सुरक्षित ठेवण्याचे एक साधन म्हणून कायद्याचा विचार केला. सामाजिक संस्थेची सुरक्षितता ही प्रमुख सामाजिक गरज आहे. प्लेटो या मताचा होता की, प्रत्येकाने त्यांच्या नैसर्गिक गुणानुसार आपली जबाबदारी पार पाडली, तर सामाजिक सौहार्द निर्माण होते. प्रत्येक व्यक्ती ही विशिष्ट गुण, धैर्य, ज्ञान आणि भूक घेऊन जन्माला येते. हेच गुण तीन वेगळे सामाजिक गट निर्माण करतात जसे की, लष्कर, राज्यकर्ते आणि शेतकरी व कामगार. एकाच मानवजातीचे असे कृत्रिम वर्गीकरण करणे ही एक संकल्पना होती.

'चांभाराने चांभारच असावे, त्याने सोबतच वैमानिक असू नये. शेतकऱ्याने शेतकरीच असावे, त्याने सोबतच न्यायाधीश होऊ नये. सैनिकाने सैनिकासोबतच उद्योगपती होऊ नये. आणि वैश्विक विद्वान जो ज्ञानाद्वारे सर्व काही होऊ शकतो आणि करू शकतो, तो जर अशा आदर्श राज्यात आला तर त्याला तेथे थांबायला जागा राहू नये,' अशी प्लेटोची आदर्श राज्याची संकल्पना होती. ॲरिस्टॉटलनेही याच संकल्पनेला पुढे नेत म्हटले की, प्रत्येकाला त्यांच्या ठरलेल्या वर्तुळात ठेवण्याची अवस्था म्हणजे न्याय.

भारतीय परिस्थितीचा विचार केला तर बौद्ध काळापूर्वी प्राचीन भारतातील कायद्यांचे अंतिम उद्दिष्ट काय होते, याचा विचार करू. या ब्राह्मणी विचारसरणीच्या मनूने समाजाला चार वर्णात विभागले, ज्यामुळे एकाच मानवजातीचे कृत्रिम वर्गीकरण झाले. मनूचा उद्देश सामाजिक सौहार्द टिकवणे होता, असे म्हणतात. प्रत्येकाची पात्रता तो कोणत्या वर्णात जन्माला येतो यावर ठरायची. डॉ. आंबेडकरांनी या प्रकारच्या विचारसरणी विरोधात बंड पुकारले. त्यांच्या मते चातुर्वण्य हे समाजाला घातक असून ती अपयशी ठरणारी व्यवस्था आहे.

चातुर्वर्ण्यांचा विरोध असताना डॉ. आंबेडकरांनी प्लेटोच्या संकल्पनेलाही मान्य केले नाही. दोहोंमध्ये कायदा, सामाजिक गरजांची नीट पूर्तता होऊ शकत नाही. एखाद्याच्या सामाजिक गरजेची पूर्तता त्याच्या पात्रतेनुसार ठरावी, ती गोष्ट त्याचा कोणत्या वर्गात जन्म झाला यावर ठरू नये. बाबासाहेबांच्याच शब्दांत सांगावयाचे तर प्लेटोच्या संकल्पनेवर ज्या गोष्टीसाठी टीका करायला पाहिजे, त्याच गोष्टीसाठी चातुर्वण्यावरही टीका व्हायला हवी. लोकांना अतिशय काटेकोरपणे काही वर्गात बांधून ठेवायची प्लेटोची संकल्पना म्हणजे माणूस आणि त्याच्या समतेबाबतचे

उथळ आकलन होय. प्लेटोला याचा विचारच करता आला नाही की, प्रत्येक व्यक्तीची क्षमता वेगळी, त्याच्यात इतरांपेक्षा वेगळे गुण असतात, आणि त्याद्वारे प्रत्येकाचे स्वतंत्र अस्तित्व असते, प्रत्येकाचा वेगळा वर्ग असतो. प्लेटोने प्रत्येकातील प्रचंड वैविध्य आणि सक्रियवृत्तीचा विचारच केला नाही. आधुनिक विचाराने हे सिद्ध केले आहे, व्यक्तीबाबत काटेकोर वर्गीकरण करणे योग्य नव्हे. जर विविध व्यक्तींना वेगवेगळ्या वर्गात विभाजित करण्यात आले, तर त्यांच्या विविध गुणांचा उपयोग योग्य प्रकारे करता येत नाही. ज्या कारणासाठी प्लेटोची गणराज्याची संकल्पना अपयशी ठरते, त्याच कारणाने चातुर्वर्ण्यही अपयशी ठरते, कारण वेगवेगळ्या वर्गातील व्यक्तींना पक्ष्यांप्रमाणे खुराड्यात टाकण्याची कल्पना करणे शक्य नाही. (ॲनिहिलेशन ऑफ कास्ट)

वेगवेगळ्या वर्णांत व्यक्तीचे वर्गीकरण करून सामाजिक सौहार्द मिळवण्याची मनूची संकल्पना किंवा ग्रीकांची कायद्याच्या अंतिम उद्दिष्टांबद्दलची कल्पना सामाजिक समतेवर आधारित नसल्याने अपयशी ठरल्या आहेत. फक्त मूर्खच या प्रकारच्या वर्गीकरणाला मान्य करतील. येथे हा प्रश्न उपस्थित होतो की, चातुर्वर्ण्याची भारतात अंमलबजावणी करण्याकरिता काय बंधने घालण्यात आली होती? मनुस्मृतीत विविध प्रकारच्या शिक्षा सांगण्यात आल्या आहेत. उदाहरणार्थ - रामाने तपश्चर्येला बसलेल्या शंभूक ऋषींना मारले ती घटना. तपस्या हे वर्णव्यवस्थेप्रमाणे ब्राह्मणांचे कार्य होते, आणि मनुस्मृतीप्रमाणे जो शूद्र वेदपठण करतो अथवा ऐकतो त्याची जिव्हा कापावी किंवा त्याच्या कानात तप्त शिसे ओतण्याची शिक्षा द्यावी. ही अवस्था येथेच संपत नाही.

डॉ. आंबेडकर यांनी महाभारत आणि पुराणांतील काही मजेदार उदाहरणे दिली आहेत. जसे की, ब्राह्मणांनी किती वेळा क्षत्रियांच्या वंशाचा नाश केला आहे? आणि क्षत्रियांनी किती वेळा ब्राह्मणांचा नाश केला आहे, या प्रश्नांची उत्तरे क्लेशदायक आहेत. येथे हा प्रश्न निर्माण होतो की, मनुस्मृती किंवा महाकाव्यात सांगितल्याप्रमाणे त्या तत्त्वांवर आजच्या समाजव्यवस्थेची उभारणी होऊ शकेल का? आधुनिक काळात अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेला जतन करणे हे कायद्याचे अंतिम उद्दिष्ट होऊ शकते काय? जर या प्रश्नांची उत्तरे नकारात्मक आहेत, तर हिंदू समाज अशा गोष्टींना नाकारत का नाही? ज्या गोष्टींचा चुकीच्या पद्धतीने निवाडा करण्यात आला आहे, तिचा निवाडा कधीच झाला नसतो आणि म्हणून फेरनिवाडा करणे, हाच सामाजिक क्लेशांवरील उत्तम उपाय आहे.

## संविधानातील कायदा व सामाजिक न्याय

आपण येथे संविधानातील सामाजिक न्यायाबाबतच्या कलमांत काय अभिप्रेत आहे हे बघू या. प्रस्तावनेत या गोष्टी संक्षिप्तरीत्या मांडण्यात आल्या आहेत. संविधानाची प्रस्तावना म्हणते की, आम्ही भारताचे नागरिक सन्मानाने स्वीकारतो की, भारत हे सार्वभौम, सामाजिक,



धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्य आहे. आणि याद्वारे साऱ्या नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची हमी देतो. त्यात संधी आणि प्रतिष्ठेची समानता, धर्म आणि पूजाविधीचे स्वातंत्र्य आणि बंधुत्व यांचा समावेश होतो.

येथे हे उल्लेखनीय आहे की, न्यायाबाबत लक्ष वेधताना सामाजिक न्याय हा आर्थिक न्यायाच्या आधी येतो आणि आर्थिक न्याय राजकीय न्यायाच्या आधी. या क्रमावरून हे लक्षात येते की, राजकीय स्वातंत्र्यापूर्वी सामाजिक सुधारणा आवश्यक आहेत. स्वातंत्र्यापूर्वी अस्पृश्यता सामाजिक विषमता, जाति-वर्ण व्यवस्था, हुंडा पद्धती, सतिप्रथा, स्त्रियांना नाकरलेले संपत्तीवरील अधिकार इत्यादी गोष्टींचा नाश करणे, या सामाजिक सुधारणांचा या सामाजिक अनिष्टांचा नाश हीच सामाजिक न्यायाची मूळ संकल्पना होय. सामाजिक न्यायाशिवाय आर्थिक न्याय शक्य नाही. मात्र लोकांना जर त्यांचे आर्थिक क्षेत्र मिळाले नाही, तर आर्थिक न्यायाची गोष्ट करणे योग्य ठरणार नाही. माणसाच्या जन्मावरून त्याचा उद्योग/क्षेत्र ठरवणे माणसाच्या स्वभावगुणाच्या विरोधात आहे आणि म्हणून कोणताही जाणता समाज या प्रकाराला सामाजिक सौहार्दाचा पाया मानणार नाही, तशी समानरचना खोटी ठरेल.

आपल्या संविधानात प्रस्तावनेतील सामाजिक न्यायाचे ध्येय गाठण्यासाठी विविध प्रावधाने करण्यात आली आहेत. जसे: कलम-१७ अस्पृश्यता निवारणासाठी आहे, कलम-१८ किताबा संबंधात आहे. कलम - १५, १६, ३३ हे राज्याला शैक्षणिक संस्थांमध्ये आणि शासन सेवेत एस.सी./ एस.टी. आणि इतर मागासवर्गांना आरक्षण देण्यासंदर्भात आहेत. ज्यांना शैक्षणिक आणि आर्थिक अधिकारांपासून शतकानुशतके वंचित ठेवण्यात आले होते, त्यांना शासनाच्या सकारात्मक हस्तक्षेपाद्वारे संरक्षक करून त्यांची उन्नती साधण्याचे उद्दिष्ट्च त्यातून अधोरेखित केलेले आहे. डॉ. आंबेडकर यांनी म्हटलेच आहे, शिक्षण किंवा ज्ञान हीच शक्ती आहे. शासन सेवेत आरक्षणामुळे वंचित वर्गाला आर्थिक बळ मिळाले आहे. आरक्षणामुळे त्यांच्या मुलांना उत्तम शिक्षण आणि माणूस म्हणून सन्मानाने जगण्याची सामाजिक संधी मिळाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नवीनच प्रमेय मांडले आहे की, आरक्षण जरी संविधानाच्या भाग तीनचा घटक असला, तरी ते सक्षमीकरणाचे साधन होय. आणि हे त्या त्या राज्यावर / शासनावर अवलंबून आहे

की, आरक्षण द्यावे अथवा देऊ नये. आरक्षण हे सूचक आहे किंवा बंधनकारक हा भाग, हा वेगळा मुद्दा आहे. मात्र त्याची अंमलबजावणी शासनावर सोपविलेली आहे, हे निश्चित.

संविधान आणि त्या अंतर्गत केलेल्या कायद्यान्वये सामाजिक न्यायाची जी संकल्पना आहे, त्याचे मूळ कायद्याच्या अंतिम उद्दिष्टाच्या विविध प्रमेयांत आहे. ग्रीक आणि रोमनांच्या मते कायद्याचे अंतिम उद्दिष्ट फार काळापुरते राहू शकत नैसर्गिक समानता हीच समानतेचा निकष ठरते. आदर्शवादाच्या सिद्धांताचा पुरस्कर्ता 'कांट' नावाचा राजकीय अभ्यासक कायद्याबाबत म्हणतो की, कायदा म्हणजे अशा वैश्विक नियमांची किंवा तत्त्वांची व्यवस्था होय, की ज्यात कर्त्याची इच्छा ही इतरांच्या इच्छेत समाविष्ट असते. येथे असे नियम किंवा तत्त्व मानवी कृत्याला लागू होतात. जेर्मी बेंथनच्या म्हणण्यानुसार शासनाद्वारे अंमलात आणलेल्या नियमांचे संकलन म्हणजे कायदा होय, की



नाही, कारण मानवी गरजा आणि नैसर्गिक अधिकाराचे कधीही समाधान होऊ शकत नाही. मानवाचा स्वभाव हा त्याच्या गुणावर अवलंबून असतो. यात प्रत्येकाच्या विवेकाला महत्त्व दिले आहे. मात्र विधिज्ञांनुसार प्रत्येक माणूस सारखा असतो. ही नैसर्गिक समानता इच्छेच्या स्वातंत्र्यातील समानतेचे रूप घेते. कोणतीही सामाजिक बंधने या इच्छेच्या स्वातंत्र्यावर बंधने घालू शकत नाहीत. येथे हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो की, स्वतंत्र अस्तित्वाच्या व्यक्तीच्या इच्छा ओळखून त्यांच्यात समानता कशी आणायची? अशा वेळी ज्याद्वारे प्रत्येक व्यक्तीला अधिकाधिक सुख, स्वातंत्र्याच्या स्वरूपात उपभोगता येईल. इंग्रज विचारवंत या विचारसरणीचा पुरस्कार करतात की, इतरांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यापलीकडे प्रत्येकाच्या स्वतंत्र वागण्यावर / कृत्यावर बंधने घालू नयेत. त्यांच्या मते हीच कायद्याची परिणती होय.

या शतकात, विधिज्ञांनी या दिशेने विचार करायला सुरुवात केली आहे की, मानवी इच्छेपेक्षा आणि आकांक्षांना जास्त महत्त्व द्यावे. आता केवळ इच्छांचे समग्रीकरण करण्याऐवजी गरजांच्या समाधानाचे समग्रीकरण करण्याला महत्त्व देण्यात येत आहे. मी कायद्याचा विचार सामाजिक संस्था म्हणून करतो की, ज्याद्वारे लोकांच्या सामाजिक गरजांची पूर्तता करता येईल. राजकीयदृष्ट्या संघटित समाजाद्वारे मानववागणुकीचे नियंत्रण अशा पद्धतीने करणे की, ज्यामुळे सुसंस्कृत समाजातील घटकांच्या इच्छांची पूर्तता कमीत कमी त्याग करून होईल, असे रोसलो पाऊंडने योग्यच म्हटले आहे. त्याचे म्हणणे हेच आहे की, कायद्याची परिणती ही सामाजिक रचना होय.

डॉ. आंबेडकरांचेही मत होते की, समाजातील विविध घटकांच्या सामाजिक गरजांची पूर्तता करणे हेच कायद्याचे कार्य असावे. हे करताना 'जैसे थे' परिस्थिती ठेवणाऱ्या चालीरीतींना तिलांजली देणे आवश्यक आहे. त्यांनी 'हिंदू कोडबिल' केवळ वंचित महिलांना त्यांचे अधिकार मिळवून देण्याकरिता बनवले. मात्र त्यांच्या या प्रयत्नाला संसदेतील उच्चवर्णीयांनी उद्ध्वस्त केले आणि पंडित नेहरू मूक प्रेक्षक बनून राहिले.

संविधानातील कलम-४४ मधील 'समान नागरी संहिता' हे त्यांचेच योगदान होय. त्यांना समाजाची अशी पुनर्रचना हवी होती की, ज्यात महिला व पुरुषांना सारखे मूलभूत अधिकार मिळतील, जे की त्यांच्या श्रद्धेवर अवलंबून राहणार नाहीत. एखाद्या मुस्लीम स्त्रीला कालबाह्य झालेल्या वैयक्तिक कायद्यांचा त्रास का व्हावा? हिंदू कायद्यांत मुलींना प्रथमश्रेणी वारसा हक्क मिळू नये? विविध धर्मांच्या साऱ्या स्त्रियांना लग्नाशी संबंधित असलेले वारसा हक्क, दत्तक विधान इत्यादी हक्क समान का नसावे? राजकीय नेतृत्वाच्या व इच्छाशक्तीच्या अभावामुळे समान नागरी संहितेची मूळ संकल्पनाच कधी संसदेसमोर येऊ शकली नाही.

संसदेच्या विषयतालिकेवर अनुसूचित जाती/जमाती अन्याय प्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, बालमजूर प्रतिबंधक कायदा आणि इत्तर कायदे आहेत.

(लोकराज्य ऑक्टोबर-२००६ मधून पुनर्मुद्रित)




ऑगस्ट १९४७, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद कायदे मंत्रिपदाची शपथ देत आहेत. सोबत प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू.



२६ नोव्हेंबर १९४९ रोजी विधिमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना राज्यघटना सादर केली. त्याप्रसंगी राष्ट्रपतींनी बाबासाहेबांचे अभिनंदन केले.




राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद तसेच त्यावेळच्या केंद्रीय मंत्र्यांसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



नेहरू मंत्रिमंडळात विधिमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर. (उजवीकडून चौथ्या आसनावर)




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १५ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर महानगरपालिकेतर्फे मानपत्र प्रदान करून नागरी सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमवेत नानकचंद रत्तू, महापौर रा. पै. समर्थ व अन्य.



नागपूर महापालिकेच्या अभिप्राय नोंदवहीत आपल्या सत्काराप्रीत्यर्थ अभिप्राय नोंदवताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या बाजूला महापौर रा. पै. समर्थ व माईसाहेब आंबेडकर.



दिल्ली येथे १९५० मध्ये विरोधी पक्षाकडून हिंदू कोडबिलावर चर्चा ऐकताना
डॉ. बाबासाहेब आंबेडकर.




संसद भवनाच्या परिसरात के. एम. मुंशी, बलदेव सिंग आणि
विधिमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



लंडन येथे दुसऱ्या गोलमेज परिषदेत सहभागी झालेले महात्मा गांधी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी. (सप्टेंबर १९३१)



१७ ऑक्टोबर १९४९ रोजी नवी दिल्ली येथे मौलाना हसरत मोहानी यांच्यासोबत
डॉ. बाबासाहेब आंबेडकर.




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील मिलिंद महाविद्यालयाच्या जागेची पाहणी करताना
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माईसाहेब आंबेडकर व इतर.



मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत
उजवीकडे प्रा. व्हि. जी. राव, डावीकडे रावबहादूर सी.के. बोले,
मुंबई प्रांताचे राज्यपाल राजा महाराजा सिंग व माईसाहेब आंबेडकर.




अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या जुलै १९४२ मध्ये नागपूर येथे झालेल्या अधिवेशनाप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अन्य कार्यकर्त्यांसमवेत.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिलिंद महाविद्यालयाच्या जागेसंबंधी नकाशे पाहताना सोबत माईसाहेब आंबेडकर, डी.जी. जाधव व इतर.



आपल्या जन्मदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत माईसाहेब आंबेडकर आणि त्यांचा आवडता श्वान पीटर (१४ एप्रिल १९४८)




धम्मदीक्षाप्रसंगी पाच लाखांपेक्षा जास्त अनुयायांना मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सोबत माईसाहेब आंबेडकर.



१४ ऑक्टोबर १९५६ रोजी महास्थवीर पूज्य चंद्रमणी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर यांना दीक्षा देताना.



महास्थवीर पूज्य चंद्रमणींकडून बौद्ध धम्माची दीक्षा घेताना
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत माईसाहेब आंबेडकर.



महास्थवीर पूज्य चंद्रमणी यांच्या पाठीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व
माईसाहेब आंबेडकर उभे आहेत.



सन १९३२ मध्ये लंडन येथे आयोजित तिसऱ्या गोलमेज परिषदेत
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत जाफरूल्ला खान.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी चर्चा करताना. (१९५०)

(सर्व छायाचित्रे लोकराज्य ऑक्टोबर २००६ मधून पुनर्मुद्रित)


**वंचितांच्या उद्धाराचा पाठपुरावा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राची प्रगती आणि उत्थान याकडे कधीही दुर्लक्ष केलेले नाही. मानवीय मूल्ये, लोकतंत्रात्मक मार्ग आणि संवैधानिक उपाय यावर त्यांनी सतत भर दिलेला आहे. ते प्रखर राष्ट्रभक्त, देशाभिमानी आणि राष्ट्रोद्धारक आहेत. सामाजिक लोकशाही राजकीय लोकशाहीचा मूलाधार आहे. व्यक्तिपूजा लोकशाहीला मारक आहे. व्यक्तीपेक्षा देश मोठा आहे. समतेशिवाय स्वातंत्र्य अपूर्ण आहे, हे त्यांचे तत्त्वज्ञान आम्हा भारतीयांना सदैव प्रेरणादायी राहील.**

# राष्ट्रोद्धारक बाबासाहेब...

**नानक रामटेके**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही केवळ व्यक्ती नसून तो विचार आहे. हा विचार प्रेरणादायी आणि प्रवाही आहे. त्यांचे जीवन आणि कार्य तळागाळातील हजारो वर्षांच्या सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषणामुळे भरडलेल्या लोकांकरिता प्रेरणा आहे. ही प्रेरणा केवळ वैचारिक पातळीपुरती मर्यादित नाही, तर झोपलेल्या समाजाला जागृत करून त्यांच्यात स्वाभिमान, अस्मिता आणि आर्थिक सबळता निर्माण करण्याचा कृती कार्यक्रम आहे. जाज्वल्य-राष्ट्रनिष्ठा आणि देशप्रेम हे बाबासाहेबांच्या जीवन आणि कार्याचे अतूट अंग आहे. त्यांनी निर्माण केलेल्या आणि मूलभूत सिद्धान्त मांडणाऱ्या प्रचंड ग्रंथरचनेत, पत्रकारितेत, लिखाणात, भाषणात या देशाची भौगोलिक अखंडता, राष्ट्रीय एकता आणि अस्मिता याला छेद पडेल अथवा ती भंग पावेल असे कोणतेही वाक्य व वक्तव्य दिसून येत नाही. 'भारत' या शब्दाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विशेष आकर्षण होते. त्यांनी स्थापन केलेल्या एका पाक्षिकाचे नाव 'बहिष्कृत भारत' आणि मुद्रणालयाचे नाव 'भारत भूषण प्रिंटिंग प्रेस' असे होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला नाही अथवा गांधीजींच्या राजकीय चळवळीत सहभागी झाले नाहीत. याचा अर्थ असा होत नाही की, त्यांना भारताचे स्वातंत्र्य नको होते. त्यांना भारताचे नुसते स्वातंत्र्य नको होते, त्याचबरोबर बहुजनांच्या सामाजिक आणि आर्थिक उत्थानाचा संबंध स्वातंत्र्याशी जोडणे आवश्यक वाटत होते. देश स्वतंत्र झाला, पण लोक स्वतंत्र झाले का? हा प्रश्न ते सदैव विचारत असत. डॉ. बाबासाहेबांबद्दल सर्वसामान्य जनतेची अजूनही समजूत ब्रिटिशधार्जिणा, काँग्रेस-गांधी विरोधक, हिंदूद्वेष्टा आणि विशिष्ट वर्गाच्या हिताकरिता चळवळ करणारा इत्यादींवर आधारित आहे; पण ही पूर्णतः गैरसमजूत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची साहित्य चळवळ, जीवन आणि कार्य यांचा अभ्यास केल्यास हे स्पष्ट दिसून येते की, त्यांनी स्वराज्याला कधीही विरोध केलेला नाही, या उलट स्वतंत्र भारत हे मजबूत सबळ आणि प्रगत राष्ट्र झाले पाहिजे असे त्यांचे स्वप्न होते. बाबासाहेबांचा दृष्टिकोन, स्वराज्य हे केवळ मूठभर लोकांचे आणि सत्ताधीशांचे आहे, असा नव्हता, तर पीडित आणि उपेक्षितांसह सर्वांचे स्वातंत्र्य ही कल्पना बाबासाहेबांच्या मनात सतत होती. पण तसे स्वराज्य निर्माण होण्यास या देशातील समाजव्यवस्था अनुकूल नाही, अशी शंका त्यांच्या मनात होती. गेली ७०० वर्ष राजकीय जमात म्हणून विशेषाधिकार भोगलेल्या बॅरिस्टर जिन्ना यांनी धर्माच्या नावाने भारताचे तुकडे पाडून पाकिस्तानची निर्मिती केली; पण व्यक्तिगत जीवनात अनेक अन्याय आणि अत्याचार भोगून हजारो वर्षांच्या सामाजिक गुलामगिरीची पूर्वपीठिका असतानासुद्धा त्यांनी या देशाची एकता आणि एकात्मतेकरिता सदोदित प्रयत्न केले. बाबासाहेबांचे कार्य हे केवळ बहुजनांच्या उद्धारापुरते मर्यादित नव्हते, तर ते राष्ट्र उद्धाराचे कार्य होते. राष्ट्रीय एकात्मतेच्या संदर्भात डॉ. बाबासाहेबांचे राष्ट्रप्रेम आणि निष्ठा ही वादातीत आहे. ब्रिटिश राजवटीच्या अनेक गोष्टींचे बाबासाहेबांनी गुणगान व





समर्थन केले असले तरी त्यांनी त्यांच्या दोषांचा, अन्याय आणि अत्याचाराचाही प्रामुख्याने उल्लेख केलेला आहे. मुंबई विधान परिषदेत ते ब्रिटिश सरकारचे नामनिर्देशित सदस्य (१९२७-१९३९) होते. तरीपण त्यांनी ब्रिटिशांचे कायदे आणि धोरण यावर एक खरा राष्ट्रभक्त आणि देशप्रेमी या नात्याने प्रखर टीका केलेला आहे.

## राष्ट्र

'आम्ही सर्व एक आहोत', ही भावना म्हणजेच राष्ट्र भारतातील फार मोठा जनसमूह हा जातीच्या आणि अस्पृश्यतेच्या नावाखाली जर वेगळा पडलेला असेल तर तो समूह देशाच्या प्रमुख प्रवाहात कसा येईल? म्हणजेच खऱ्या अर्थाने राष्ट्र म्हणता येणार नाही आणि राष्ट्रीय भावना निर्माण होणार नाही. आमची 'विविधतेतील एकता' केवळ घोषणा होईल. या वंचित जनसमूहाला, बाबासाहेबांनी आपल्या कार्याने आणि चळवळीने, प्रमुख प्रवाहात सहभागी करून घेण्याचे मोठे कार्य केले. राष्ट्रवाद ही खऱ्या अर्थाने लोकांची सांस्कृतिक आणि एकात्मिकतेची भावना आहे. ती मनुष्याच्या विचारांची उपज आहे. म्हणून त्याचा जीवन व कृती यांच्याशी सरळ संबंध आहे. वंचित वर्ग हा बहुधा आपल्या हक्काकरिता सशस्त्र क्रांतीकडे वळत असतो; परंतु बाबासाहेबांनी या वंचित वर्गाला कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन करण्याचे बाळकडू पाजले आहे. बाबासाहेब म्हणतात, 'राष्ट्रवाद ही अशी सत्य स्थिती आहे की, त्याला विसरता येत नाही किंवा नाकारता येत नाही.' इतर संस्कृती आणि देशांचे उदाहरण देऊन बाबासाहेबांनी आक्रमक राष्ट्रवादाला नाकारले आहे. राष्ट्रीय सन्मान आणि सामाजिक एकता हे त्यांच्या राष्ट्रवादाचे मूलाधार होते. शोषित आणि वंचित वर्गाच्या हिताकरिता चळवळ करणे हा त्यांच्या राष्ट्रीय कार्याचाच भाग होय. त्यांच्या राष्ट्रीय भावनेत दोन गोष्टी प्रामुख्याने दिसून येतात- १) ब्रिटिश सत्तेचा अंत, स्वकीयांचे राज्य २) जातिविहिन आणि समताधिष्ठित समाजाची निर्मिती. त्यांची विचारधारा ही मानवतावादी आणि लोकशाहीवादी असली तरी ती प्रखर राष्ट्रभक्तीने ओतप्रोत होती. कारण वर्ण, जात, वंश आणि सांप्रदायिकता यांना बाबासाहेबांनी आपल्या राष्ट्रवादाचा आधार कधीही मानलेला नाही. सर्व भारतीय लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण व्हावी आणि आम्ही सर्व भारतीय आहोत म्हणून जगावे हे त्यांचे स्वप्न होते. वंचित वर्गाचे स्वार्थ आणि देशाप्रति कर्तव्य, यात त्यांनी देशाला प्रथम स्थान दिलेले आहे. आपल्या अनुयायांना उपदेश करताना ते सतत म्हणत असत की, भारतीयत्वाच्या चौकटीत राहूनच आपण आपल्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक मागण्या पुढे ठेवावयास पाहिजेत. राष्ट्राच्या स्वातंत्र्याला मूर्तस्वरूप द्यावयाचे झाल्यास त्यात राहणाऱ्या वंचित, निर्धन आणि अस्पृश्य मानलेल्या लोकांच्या राजकीय, सामाजिक आणि नागरी हक्कांचे स्वातंत्र्य असले पाहिजे, सामाजिक एकात्मतेशिवाय राजकीय एकता प्राप्त करणे कठीण आहे. ती प्राप्त जरी झाली तरी दीर्घकाळ टिकू शकत नाही. बाबासाहेबांनी नेहमी पृथकतावाद, क्षेत्रीयवाद, भाषावाद, जातिवाद आणि सांप्रदायिकता या विरुद्ध आवाज उठवलेला आहे. सांप्रदायिकता हा

गंभीर आजार असून तो बंधुभावाच्या मार्गातील मोठा अडसर आहे आणि त्यामुळे देशाचे अहित होते, असे त्यांचे स्पष्ट प्रतिपादन होते. त्यांच्या राष्ट्रीय भावनांचा आधार बौद्धिक आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरा याबद्दल त्यांना अभिमान असला, तरी सनातन वृत्ती आणि भूतकाळाकडे चला, यावर त्यांनी प्रखर टीका केली आहे. वर्णाश्रम व्यवस्था हे केवळ श्रमविभाजन नव्हे, तर श्रमिकांचे विभाजन आहे. जातिप्रथा श्रमिकांचे गट



निर्माण करते. या देशाच्या राष्ट्रीय एकतेला जात ही अत्यंत घातक आहे. म्हणून तिचे निर्मूलन करण्यास बाबासाहेबांनी आपली सारी शक्ती पणाला लावली.

धनंजय कीर म्हणतात, 'नवभारताच्या घटनेचे प्रमुख शिल्पकार, लोकशाहीचे त्राते नि मानवी स्वातंत्र्याचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र हे आधुनिक भारताच्या इतिहासाचे महान पर्व आहे. मानव स्वातंत्र्याच्या इतिहासाचे ते सोनेरी पान आहे. याबरोबरच असेही म्हणता येईल की, बाबासाहेब हे भारताच्या आधुनिक इतिहासातील एक महान आश्चर्य आहे.' सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, कामगार इत्यादी विविध क्षेत्रांत त्यांनी अत्यंत भरीव आणि विधायक कामगिरी केलेली आहे. एवढेच नव्हे तर आपली प्रकृती ढासळलेली असतानासुद्धा नवीन सिद्धान्त मांडणारी ग्रंथनिर्मिती केलेली आहे. या ग्रंथातील संदर्भ आधारभूत ग्रंथ आणि सिद्धान्त याचा विचार केल्यास; तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अत्यंत धावपळीचे जीवन जगणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेळ कसा काढला असेल, हे पाहून आश्चर्य वाटते. कारण एखादा महापुरुष एक किंवा दोन क्षेत्रात कार्यरत राहून महान होतो; पण बाबासाहेबांनी एकाच वेळी विविध क्षेत्रांत उत्तुंग भरारी मारलेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रीय कार्याबद्दल विशेष लिहिण्यात येत नाही आणि उल्लेखही करण्यात येत नाही. त्यांच्याकडे वंचितांचा मसीहा आणि आरक्षणवादी अशा संकुचित दृष्टिकोनातून पाहण्यात येते. इतर राष्ट्रीय नेत्यांच्या मालिकेत बसण्याची भव्यता आणि योग्यता बाबासाहेबाच्या अंगी होती. त्यांचे भारतवासीयांना आवाहन होत की, त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी अंगात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढले पाहिजे. त्यांच्या अंगी लढवय्या पुरुषांची वीरता, नेत्याचे गुण आणि मुत्सद्यांची विवेकशीलता होती. त्यांनी मोठमोठी स्थाने आपल्या स्वयंकर्तृत्वाने, ज्ञानाने आणि मनावतेच्या प्रेमाने भूषवली आणि गाजवली. ते म्हणाले होते, 'तिरस्करणीय गुलामगिरी नि अमानुष अन्याय यांच्या गर्तेत पिचत पडलेल्या ज्या समाजात मी जन्मास आलो, त्या समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यात मी अपयशी ठरलो, तर स्वत:ला गोळी घालीन', या तिरस्कृत सामाजिक गुलामगिरीचे निर्मूलन करणे हे एक मोठे राष्ट्रीय कार्य होते. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १७ नुसार अस्पृश्यता नष्ट केली गेली आणि ती पाळणे फौजदारी गुन्हा ठरवला आहे. त्यांच्या राष्ट्रीय कार्याबद्दल बरेच लिहिता येईल, परंतु काही प्रमुख मुद्यांचा त्यांच्या राष्ट्रीय कार्याच्या संदर्भात उल्लेख करता येईल.

## पीएच.डी. प्रबंध

बाबासाहेबांनी १९१६ साली कोलंबिया विद्यापीठाला भारताच्या राष्ट्रीय नफ्यातील वाटपाविषयी ऐतिहासिक दृष्टीने चिकित्सक प्रबंध सादर केला. या प्रबंधामुळे त्यांना ही पदवी मिळाली. या प्रबंधाचा विषय होता 'दि इव्हॉल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' या प्रबंधात त्यांनी ब्रिटिश सत्तेने या देशाचे केलेले आर्थिक शोषण, दडपशाही वृत्ती आणि बेजबाबदारपणा यावर विदारक टीका केलेली आहे. त्यांची ही टीका एका प्रखर देशाभिमानी व्यक्तीला साजेशी आहे. ब्रिटिश राजवटीत राहून ब्रिटिशांच्या आर्थिक व्यवहाराचे विदारक चित्र आणि भारतीय जनतेची पिळवणूक हे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

## गोलमेज परिषद

भारतातील ब्रिटिश सरकारचे नामनिर्देशित प्रतिनिधी म्हणून त्यांनी लंडन येथे तीन गोलमेज परिषदांत भाग घेतला. त्यांनी डिप्रेस्ड वर्गाचे प्रतिनिधित्व केले. गांधीजी हे पहिल्या आणि तिसऱ्या परिषदेत हजर नव्हते. दुसऱ्या परिषदेत ते काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा म्हणून हजर होते. पहिल्या

गोलमेज परिषद (१९३०-३१) बोलताना बाबासाहेबांनी स्पष्ट गर्जना केली की, गेल्या १५० वर्षांत ब्रिटिशांनी अस्पृश्यांकरिता काहीही केलेले नाही. आमचे प्रश्न आहेत तसेच कायम आहेत. अन्याय, अत्याचार तसाच सुरू आहे. अस्पृश्य आणि ब्रिटिश यांच्यात कोणतेही सौख्य नाही. आम्हाला त्वरित राजकीय स्वातंत्र्य द्यावे आणि ब्रिटिशांनी या देशातून ताबडतोब निघून जावे. बाबासाहेबांची ही प्रखर वाणी ऐकल्यावर तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड आणि ब्रिटिश मंत्रिमंडळातील सभासद आश्चर्यचकित झाले. गांधीजींनी १९४२ ला 'भारत छोडो' आंदोलन सुरू केले, तर बाबासाहेबांनी १९३०-३१ लाच स्वातंत्र्याची मागणी केली. ब्रिटिशांचा नामनिर्देशित प्रतिनिधी असताना सुद्धा जेव्हा राष्ट्राचा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा ब्रिटिशांनी भारत सोडावा ही जाज्वल्य राष्ट्राभिमानाने प्रेरित मागणी केली.

## मजबूत केंद्र सरकार

संविधानात संघराज्य शासन पद्धती स्वीकारण्यात आली आहे. साधारणतः संघराज्य पद्धतीत केंद्राला कमी आणि घटकराज्यांना जास्त अधिकार असतात. पण भारतीय राज्यघटनेत केंद्राला जास्त आणि राज्याला कमी अधिकार देण्यात आले आहेत. यावर घटनासभेत बाबासाहेबांवर टीका झाली असता त्यांनी केलेले मजबूत केंद्र सरकारचे समर्थन हे प्रखर राष्ट्रवादाचे द्योतक आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी, देशाची फाळणी, निर्वासितांचा प्रश्न, भिन्न धर्म-संप्रदाय आणि भाषा यांच्या संदर्भात भारताला मजबूत सरकारची का आवश्यकता आहे, हे त्यांनी पटवून दिले. अलेक्झांडर, डॅरियस, सॅरिअस, मोहम्मद बिन कासिम, मोहम्मद घोरी, चंगेजखान, तैमूरलंग, बाबर, अहमदशाह अब्दाली, नादीरशाह, रॉबर्ट क्लाईव्ह इत्यादींच्या आक्रमणासमोर भारताला पराभव पत्करावा लागला. याचे मूळ कारण भारतात भारताकरिता लढणारी आणि एकसंघ नेतृत्व देणारी केंद्रीय सत्ता नव्हती. केंद्र सरकार मजबूत करून बाबासाहेबांनी आम्हा भारतीयांवर फार मोठे उपकार केले, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

### हिंदू कोडबिल



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नेहरूजींच्या मंत्रिमंडळातून बाहेर पडले. त्यामागे जी अनेक कारणे होती, त्यापैकी महत्त्वाचे कारण म्हणजे काँग्रेस पक्ष व सनातनी प्रवृत्तीच्या लोकांनी हिंदू कोडबिलास केलेला विरोध हे होय. स्त्रियांचे अधिकार आणि त्याबाबत हिंदूंची विधी प्रथा इत्यादीबाबत संहिता करणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटत होते. नेहरूजींचा हिंदू कोडबिलास पाठिंबा होता; पण इतर सनातनी गट याचा प्रखर विरोध करत होते. हिंदूंच्या धार्मिक बाबीत डॉ. बाबासाहेबांनी हस्तक्षेप करू नये, अशी त्यांची भूमिका होती. मात्र बाबासाहेबांना वाटत होते की, परिवर्तनासाठी टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. हिंदू कोडबिलामुळे स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा, संपत्तीत वाटा, घटस्फोट इत्यादी बाबतीत स्वातंत्र्य मिळाले असते. विद्यमान हिंदू कायद्यातील त्रुटी आणि अनिश्चितपणा नाहीसा करण्याच्या दृष्टीने बाबासाहेब हे बिल आणू इच्छित होते. व्यक्तीपेक्षा देश मोठा आहे, म्हणून त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवता येणार नाही, ही त्यांची स्पष्ट भूमिका होती. हिंदू कोडबिल जरी नाकारण्यात आले, तरी १९५५-५६ ला नेहरूजींनी या बिलावर आधारित स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने विवाह, घटस्फोट, दत्तक वारसा इत्यादी महत्त्वाचे कायदे पारित केले. हिंदू कोडबिल हे बाबासाहेबांचे स्त्रियांच्या उत्थानाच्या दृष्टीने टाकलेले एक महत्त्वाचे राष्ट्रीय पाऊल होते.

कारण भारत स्वतंत्र झाल्यानंतर पाकिस्तानची आक्रमणे, चीनचे आक्रमण याला हा देश तोंड देऊ शकला. अंतर्गत प्रश्नांत निर्वासितांचा प्रश्न, नागा, बोडो, तेलंगणातील दंगली, पंजाबचा प्रश्न, काश्मीरचा प्रश्न, दहशतवाद, १९५६-५७ चे भाषिक द्वंद्व या साऱ्या प्रश्नांना भारत समर्थपणे तोंड देऊ शकला. एवढेच नव्हे तर १६ डिसेंबर १९७१ ला बंगला देशाच्या निर्मितीत भारताने मोलाची कामगिरी बजावली. मतपेट्यांनी सरकारे बदलली. राजकीय स्थैर्य प्राप्त झाले. नियोजन पद्धतीने भारत आर्थिक क्षेत्रात प्रगती करू लागला. विविधतेने भरून असलेल्या या देशात जर मजबूत केंद्र सरकार नसते, तर या देशाच्या भौगोलिक अखंडतेचा प्रश्न नक्कीच उभा राहिला असता.

## पुणे करार

विभक्त मतदारसंघाच्या बाबतीत डॉ.

बाबासाहेब आंबेडकर आणि गांधीजी यांच्यात तीव्र मतभेद होते. बाबासाहेबांची स्पष्ट भूमिका होती की, राजकीय सत्ता हातात आल्याशिवाय वंचितांचे प्रश्न सुटणार नाहीत, म्हणून त्यांना विभक्त मतदारसंघ मिळाले पाहिजेत. कारण अस्पृश्य हे हिंदू समाजाचा भाग नाहीत, ते अल्पसंख्याक आहेत. या उलट गांधीजींचे म्हणणे होते की, वंचितांना विभक्त मतदारसंघ देण्यात येणार नाहीत, कारण ते हिंदू धर्माचा भाग आहेत. गोलमेज परिषद संपल्यानंतर ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी २० ऑगस्ट १९३२ ला आपला जाती-निवाडा जाहीर केला. या निवाड्यानुसार प्रांतीय विधान मंडळात अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ इतर घटकांसोबतच देण्यात आला. या निवाडाविरुद्ध गांधीजींनी पुण्याच्या येरवडा तुरुंगात २० सप्टेंबरला आमरण उपोषण सुरू केले. या प्रश्नावर आणि गांधीजींच्या उपोषणावर देशात अत्यंत तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गांधीजी यांच्यात समझोता होऊन पुणे करार करण्यात आला. त्यात विभक्त मतदारसंघाची मागणी सोडून देण्यात आली. या करारात ब्रिटिश प्रतिनिधित्वाची मागणी मान्य करण्यात येऊन वंचितांकरिता जागा वाढवण्यात आल्या.

## बौद्ध धर्म

बौद्ध धर्माचा गाभा नैतिक आचरण हा आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही मानवी मूल्ये या धर्माने स्वीकारली आहेत. कर्मकांड, जातिभेद याला बुद्धाने नकार दिलेला आहे. दुःखापासून मुक्ती आणि दुःखाचे कारण यावर बुद्धाने भर दिलेला आहे. या महान धर्माचा स्वीकार करण्यात बाबासाहेबांची राष्ट्रीय भावना आणि देशप्रेम दिसून येते. अनिष्ट नसलेल्या परंपरा आणि भारतीय संस्कृती याबद्दल त्यांना नितांत आदर होता. ते म्हणाले होते, 'या देशाची संस्कृती व भारतीय संस्कृती आणि परंपरा यांना धोका निर्माण होईल आणि या राष्ट्राचे भवितव्य धोक्यात येईल, असा कोणताही धर्म मी स्वीकारणार नाही. कारण भारताच्या इतिहासात विध्वंसक म्हणून नाव नोंदवण्याची माझी तयारी नाही.' बौद्ध धर्माशिवाय इतर धर्म बाबासाहेबांनी स्वीकारला असता, तर अनेक सांस्कृतिक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रश्न निर्माण झाले असते. ते त्यांनी होऊ दिले नाही. त्यांनी भारतीय संस्कृतीची जोपासना होईल, असाच धर्म राष्ट्रीय दृष्टिकोनातून स्वीकारला आहे.

## नोकऱ्या

भारतीय राज्यघटनेच्या भाग १४ मध्ये केंद्र आणि राज्य शासनांतर्गत असलेल्या नोकऱ्यांचा अंतर्भाव, अनुच्छेद ३०८ ते ३२३ पर्यंत करण्यात आलेला आहे. नोकऱ्यांचा उल्लेख जगातील इतर राज्यघटनांत दिसून येत नाही. भारत मात्र याला अपवाद आहे. बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते की, सरकारी आणि निमसरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यांना संवैधानिक हमी मिळाली पाहिजे. कारण प्रशासन हा शासनाचा कणा आहे आणि हा कणा मजबूत असला पाहिजे. त्याकरिता त्यांनी सरकारी / निम-सरकारी कर्मचाऱ्यांना पगार / कालावधी इत्यादीबाबत संविधानात हमी दिलेली आहे. अनुच्छेद ३०९ नुसार भारतीय राज्यघटनेला अनुसरूनच शासकीय कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीचे आणि सेवाशर्तीचे नियम तयार केले जातात. अनुच्छेद ३११ नुसार कोणत्याही कर्मचाऱ्याला विभागीय चौकशी करून सुनावणीची योग्य संधी देऊन त्यातील आरोप सिद्ध झाल्याशिवाय शिक्षा करता येत नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे. संविधान सभेत याबाबत बाबासाहेबांवर टीका करण्यात आली; पण त्यांनी कर्मचाऱ्यांना संवैधानिक हमी दिलेली आहे.

संवैधानिक दृष्टिकोनातून आणि देशाच्या आर्थिक आणि नियोजनबद्ध प्रगतीचा विचार केल्यास भारतीय संविधानात केलेल्या या तरतुदी योग्य आहेत, हे कोणीही नाकारणार नाही. वंचितांच्या हक्कांचे संरक्षण करण्याकरिता संविधान सभेत गेलेले बाबासाहेब देशाचा विचार करताना कर्मचाऱ्यांनाही संवैधानिक हमी देतात. हे एक राष्ट्रीय कार्य होय.

या विवेचनावरून हे स्पष्ट आहे की, बाबासाहेबांचे नाव या देशाच्या इतिहासाशी सदैव निगडित राहील. वंचितांच्या उद्धाराचा पाठपुरावा करताना त्यांनी राष्ट्राची प्रगती आणि उत्थान याकडे कधीही दुर्लक्ष केलेले नाही. मानवीय मूल्ये, लोकतंत्रात्मक मार्ग आणि संवैधानिक उपाय यावर त्यांनी सतत भर दिलेला आहे. ते प्रखर राष्ट्रभक्त, देशाभिमानी आणि राष्ट्रोद्धारक आहेत. सामाजिक लोकशाही राजकीय लोकशाहीचा मूलाधार आहे. व्यक्तिपूजा लोकशाहीला मारक आहे. व्यक्तीपेक्षा देश मोठा आहे. समतेशिवाय स्वातंत्र्य अपूर्ण आहे, हे त्यांचे तत्त्वज्ञान आम्हा भारतीयांना सदैव प्रेरणादायी राहील.

(लोकराज्य ऑक्टोबर-२००६ मधून पुनर्मुद्रित)

### प्रौढ मतदानाचा अधिकार

साऊथ बॉरो कॉमशन, सायमन कमिशन, गोलमेज परिषदा, घटना सभेतील वादविवाद, इत्यादींमध्ये बाबासाहेबांनी प्रौढ मतदानाच्या अधिकाराचा प्रकर्षाने उद्घोष केला. लोकशाही आणि लोकशाहीची मुल्ये राबवायची असल्यास 'सीमित मतदानाचा अधिकार' हा जनताविरोधी आहे, हे स्पष्टपणे प्रतिपादित केले.

देशातील सर्वच वर्गांना मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे. तेच लोकशाहीचे खरे मूल्य आहे आणि म्हणून 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य' हे तत्त्व स्वीकारण्यात आले. पुरुषांबरोबरच स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे. इतर पाश्चिमात्य देशात आणि अमेरिकेत सुद्धा स्त्रियांना मतदानाचा अधिकार हा खूप उशीरा देण्यात आला; पण भारतीय राज्यघटनेने प्रौढमतदानाच्या अधिकाराचे तत्त्व स्वीकारून फार मोठी कामगिरी कला आहे. वंचितांच्या, अस्पृश्याच्या हितसंरक्षणाकरिता संविधान सभेत गेलेल्या बाबासाहेबांनी महिलांसकट सर्वांना मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे, याकरिता आवाज उठवला आणि तो हक्क मिळवला. हे त्यांचे खरोखरच मोठे राष्ट्रीय कार्य होय.

**साहित्य आणि समाज, साहित्यिक आणि सामाजिक बांधिलकी, साहित्यिकांची नैतिकता, प्रत्यक्षातले वास्तव आणि कलात्मक वास्तव या प्रश्नांची चर्चा सत्यशोधकांनी केली नाही. सत्यशोधकी लेखक हे जीवनाच्या आणि समाजाच्या जीवन-मरणाच्या युद्धभूमीवर लढणारे शूर शिपाई होते. म्हणून त्यांच्या लेखणीत धग आणि आग होती. जोतिराव फुले यांच्याबरोबर सावित्रीबाई फुले यांनीही साहित्यलेखन केले. सत्यशोधकी लेखक-लेखिकांची यादी खूप मोठी आहे.**

# सत्यशोधकी साहित्यिक

मानवी भावभावना आणि बौद्धिक प्रस्फुरणांचा सांस्कृतिक सहजाविष्कार साहित्यातून होत असतो. मानवी मन-बुद्धीचा भाषिक आविष्कार साहित्यातून होतो. म्हणून साहित्यातून समूहमन समजून घेता येते. महाकाव्यातील व्यक्तिचित्रांच्या आधारे युगधर्म, तत्कालीन सामाजिक जीवनप्रणाली, व्यक्ती आणि समष्टीजीवनाचे सर्वांगीण दर्शन घडते. या देशात ब्राह्मणी-अब्राह्मणी या दोन मुख्य परंपरा नेहमीच अस्तित्वात आहेत. त्यांचा संघर्षही सुरू आहे. साहित्यातून या परंपरा, त्यातील तत्त्वज्ञानात्मक, सौंदर्यशास्त्रीय संघर्ष व्यक्त झाला आहे. लोकायत, बौद्धादी परंपरा या सत्यशोधकी साहित्यपरंपरा आहेत. मध्ययुगात वारकरी, महानुभाव, लिंगायत, कबीरपंथ यांनी ब्राह्मणी व्यवस्थेशी संघर्ष केला. लोकसाहित्यातूनही ब्राह्मणी देव देवता, रूढी, प्रथा, संकेत यांविषयी उपरोध, उपहास प्रकट होतो.



आधुनिक काळात जोतिराव फुले यांनी हेतूतः सत्यशोधकी साहित्य निर्माण केले. मनुस्मृतीपुरस्कृत उच्च-नीच भेदभावांना आव्हान देणारे साहित्य त्यांनी निर्माण केले. इ.स. १८५१ मध्ये ‘भटाभिक्षुकांना सवाल’ हे आठ पानी पुस्तक प्रसिद्ध केले. त्याच वर्षी ‘पुरोहित भटांनो उत्तरे द्या’ हे लहानसेच गद्यपुस्तक लिहून स्त्रिया आणि शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाचे समर्थन केले. यातून ब्राह्मणांचा सुधारणाविरोध आणि शूद्रातिशूद्रांची शिक्षणविषयक जागृती, या बाबी ठोसपणे निदर्शनाला आणून दिल्या. इ.स. १८५३ मध्ये ‘निर्मिकाचा शोध’ या चार पानी पद्यमय पुस्तकात. विश्वाचा निर्माता आकाश असून त्यास ‘निर्मिक’ म्हटल्यास वावगे होणार नाही. आकाश हे अनेक गुणधर्मांच्या मूलतत्त्वाने भरले असून, त्यापासून अनेक प्रकारचे अणुरेणू उत्पन्न होऊन, त्यांच्या संयोगाने खस्थ (आकाशातील) पदार्थ निर्माण झाले. कित्येक खस्थ पदार्थांवर स्थळकाळक्रमास धरून जीवसृष्टी तयार होऊन, तीत बुद्धीचे व मनाचे अणु अधिक असलेला मानवप्राणी जन्मास आला. डार्विनने जीवसृष्टीच्या उत्पत्ती विकासक्रमाचा सिद्धान्त मांडल्यावर ख्रिस्ती धर्मगुरूंमध्ये खळबळ उडाली होती. जोतिराव फुले यांच्या या सिद्धान्तामध्ये इतिहास, भूगोल, खगोल, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र यातील संकल्पना आल्या आहेत.

*साऱ्या निर्मितीला । पोकळी कारण ।।*
*असे तिचे गुण। स्वाभाविक ।।*
*विषाणुचा मेंदू । धर्माची प्रकृती ।।*
*देवाची उत्पत्ती । तोच करी ।।*
*शिका शिका तुम्ही । घ्या सत्याचा शोध ।।*
*उत्पत्तीचा बोध । ध्यानी आणा ।।*
*जोति सांगे प्रेमे । विद्या तुझ्या दारी ।।*
*आली संधी खरी । शिकण्यास ।।*

सत्याचा शोध घेण्यासाठी शिकावे, अशी सम्यक भूमिका त्यांनी मांडली आहे. देवाची उत्पत्ती मानवी मेंदूच्या कल्पनेतून झाली आहे. सृष्टीचे नियम हाच धर्म आहे. विकृत अणुरेणूतून विकृत कल्पना जन्माला येतात. त्या कल्पनांचे जन्मदाते मानव समाजाशी, त्यांच्या जीवनाशी क्रूर खेळ खेळतात. या पुस्तकातील १४व्या अखंडात ते म्हणतात,

*विकृत अणुने। देवास कल्पिले ।।*
*विश्वाचे वाटोळे । त्याने केले ।।*
*चोराने म्हणावे। देवा मला पाव ।।*
*भिक्षुकांचा भाव । असा असे ।।*
*आंग्लाईची विद्या । प्रयत्ने शिकावी ।।*
*न चुकता घ्यावी । गरिबांनी ।।*
*मग अवकाश । हिंदुनिया शोध ।।*
*जोतीचा हा बोध । ठेवा ध्यानी ।।’*

निर्मिकाचा शोध म्हणजे सार्वजनिक सत्याचा शोध होय. भिक्षुकांचा धर्म हा पोटार्थी धर्म आहे. तो सार्वजनिक सत्यधर्म नाही. इ.स. १८५४ मध्ये ‘मनुस्मृतीचा धिक्कार’ हे १५ पृष्ठांचे गद्य पुस्तक त्यांनी लिहिले. ब्राह्मणांना पूजनीय असलेला मनूचा आणि त्याच्या स्मृतिग्रंथाचा जाहीर धिक्कार त्यांनी केला. मनुमत, मनूचा ग्रंथ

जाळावा, असे आवाहन त्यांनी त्यांच्या अखंडांमधून केले आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, ‘हल्ली हिंदुस्थान देशावर इंग्रज बहादुरांचे राज्य चालू असून शूद्रादि अतिशूद्रांना व स्त्रियांना लिहिता-वाचता यावे, म्हणून विद्या शिकणेची पूर्ण मोकळीक आहे. तरी त्यांना भट-भिक्षुक दोन हजार वर्षांपूर्वी लिहिलेल्या मनुस्मृतीतील कायद्याच्या आधारे शिकू देत नाहीत. त्यांनी शिकू नये म्हणून शिकणाऱ्यांची निंदा-टवाळी करून, शिकवणाऱ्या मास्तरांची व मास्तरणींची त्यांचेवर पोरसोरे पाठवून, त्यांचेकडून खडे, शेण वगैरेंचा मारा करून, फटफजिती करतात आणि पोरांची माकडचेष्टा पाहून रेड्यासारखे माजलेले भट फिदीफिदी हसतात... जे भट स्वतःस हिंदू म्हणवून घेऊन शूद्रादि अतिशूद्रासही हिंदू समजतात, मग ते भट हिंदूंना कमी का लेखतात, याचा शोध लावला पाहिजे.’ निरनिराळ्या पुराणग्रंथांत हिंदू शब्द न आढळता आर्य व दस्यू याच शब्दांचा भरणा असून आर्य हे ब्राह्मण व दस्यू हे शूद्र असा अर्थ लावता येतो. म्हणून हे दोन्ही लोक एक असल्याचे म्हणवत नाही. जोतिराव फुले यांचे शिक्षण प्रसाराचे कार्य आणि हे लेखन एकाच वेळचे आहे. वयाच्या २३व्या वर्षापासून ते किती मूलभूत चिंतन करत होते, त्याचा पुरावा या लेखनातून मिळतो. आर्य म्हणजे ब्राह्मण आणि दस्यू म्हणजे क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे तिन्ही वर्ण आहेत. एका वर्णाचे अल्पसंख्य परके आक्रमक विरुद्ध मूळ क्षेत्रज बहुसंख्य असा हा संघर्ष आहे. म्हणून ब्राह्मण मंडळी येथील सुधारणांना विरोध करत असते, असे ते ठामपणाने आणि साधार मांडतात. इतिहासात आणि वर्तमानकाळात याविषयीचे पुरावे असंख्य मिळतात.

## समाज प्रबोधनासाठी नाट्यलेखन

इ.स. १८५५ मध्ये त्यांनी ‘तृतीयरत्न’ हे नाटक लिहिले. त्या काळातील स्वतंत्र सामाजिक नाटक लिहिणारे महात्मा जोतिराव फुले हे मराठीतील पहिले नाटककार ठरतात. त्या काळात विष्णुदास भावे पठडीतील भागवत पुराणकथांवर आधारलेली किंवा इतिहासातील लोकप्रिय प्रसंगांवर आधारलेली नाटके सादर होत होती. त्यांच्या लिखित संहिता नसायच्या. उस्फूर्त संवादांना महत्त्व होते. या नाटकांवर गोंधळी, तमाशा, रायरंद, भारुड, सोंगी भजन या लोककला प्रकारांचा प्रभाव होता. कीर्तन आणि प्रवचनाची शैली,

संवादांना होती. आख्यानावर नाटक बेतलेले होते. जोतिराव फुले यांनी स्वतंत्र शैलीने हे नाटक लिहिले. भटजोशी, शेतकरी-स्त्री-पुरुषांना ग्रह, दशा यांची भीती घालून जप, अनुष्ठान, अभिषेक या निमित्ताने दान, दक्षिणा, शिधा, भोजन उकळून कसे लुबाडतात, हे दाखवून शिक्षणानेच ब्राह्मणी दास्याच्या बेड्या तुटू शकतील, असा कृतिशील आशय सुचवून नाटक संपवले आहे. नैतिक प्रेरणा जागृत करणारे या नाटकाचे कथानक भटशाहीला आव्हान देणारे आहे. म्हणून ब्राह्मण सभासदांचे वर्चस्व असलेल्या दक्षिणा प्राईस समितीने या नाटकाला बक्षीस दिले नाही. मूर्तिपूजेपेक्षा ज्ञानोपासना श्रेष्ठ आहे. अंधश्रद्धा ही माणूसपणाचा घात करते. शिक्षणाचा केंद्रबिंदू माणूस आहे. सुधारणा आणि कलेच्या पातळीवर ते कृतिवीर होते. श्रेष्ठ दर्जाची कला उच्च दर्जाचा आनंद देते. त्याचप्रमाणे नैतिक कृतिकार्यक्रमांचा प्रचार करते. ‘तृतीयरत्न’ नाटक लिहून त्यांनी मराठीतील स्वतंत्र, सामाजिक, कृतिप्रवण नाटकांचा प्रारंभ केला.

‘शिक्षणाचा सामाजिक आशय, मानवी जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करणारा असला पाहिजे. शिक्षणाची ही सामाजिक जबाबदारी आहे’, हा सत्यशोधकी दृष्टिकोन जोतिराव फुले यांनी त्यांच्या सर्वच साहित्यातून मांडला, म्हणून त्यांचे साहित्य हे सत्यशोधकी साहित्य ठरते. या साहित्याला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. विशिष्ट उद्दिष्टे आहेत. त्याचा अनेक अंगांनी विकास झाला. स्त्री-पुरुषांचा सहभाग वाढला, समीक्षा निर्माण झाली; समकाळात आणि उत्तरकाळात या साहित्याला अनुकूल किंवा विरोधी प्रतिसाद मिळाला, म्हणजे सर्वांनी दखल घेतली. या साहित्याने वैचारिक जागृती घडवून आणली, म्हणून सत्यशोधकी साहित्य प्रवाह हा मराठी साहित्यातील मुख्य प्रवाह मानावा लागतो. आजचे ग्रामीण, उपेक्षित, स्त्री, जन, जनवादी, कामगार, भटके, आदिवासी इत्यादी सर्व आधुनिक परिवर्तनवादी साहित्यप्रवाह म्हणजे या मुख्य प्रवाहाची अनेकविध अपरिहार्य रूपे आहेत.

सत्यशोधक साहित्यिक समाजवास्तवाकडे पाठ करून बसू शकत नाही. सभोवतालच्या समकालीन वास्तवाकडे डोळेझाक करू शकत नाही. इ.स. १८६३ मध्ये ‘विधवांची भयानक अवस्था’ हे पुस्तक जोतिराव फुले यांनी लिहिले, अशी नोंद क्षत्रिय मराठेशास्त्री महाघट पाटील यांनी केली आहे. त्या काळात विधवाविवाह - ब्राह्मण विधवांचे केशवपन या समस्या ऐरणीवर आलेल्या होत्या.

साहित्य आणि समाज, साहित्यिक आणि सामाजिक बांधिलकी, साहित्यिकांची नैतिकता, प्रत्यक्षातले वास्तव आणि कलात्मक वास्तव या प्रश्नांची चर्चा सत्यशोधकांनी केली नाही. चर्चेचे गुऱ्हाळ चालवून सपक रसचर्चा करण्याचा उद्योग, ही उच्चभ्रू कलावाद्यांची गरज होती. सत्यशोधकी लेखक हे जीवनाच्या आणि समाजाच्या जीवन-मरणाच्या युद्धभूमीवर लढणारे शूर शिपाई होते. म्हणून त्यांच्या लेखणीत धग आणि आग होती. त्यामुळे विरोधकांना चटके बसले; पण शूद्रातिशूद्रांच्या जीवनबागा हिरव्या चैतन्याने बहरू लागल्या. जोतिराव फुले यांच्याबरोबर सावित्रीबाई फुले यांनीही साहित्यलेखन केले. सत्यशोधकी लेखक-लेखिकांची यादी खूप मोठी आहे. आधुनिक काळातील सत्यशोधकी साहित्यप्रवाहाचा प्रारंभ त्यांच्यापासून होतो.

(सदर लेख हा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या वतीने प्रकाशित केलेल्या लेखक श्रीराम गुंदेकर यांच्या ‘महाराष्ट्राचे शिल्पकार महात्मा जोतिबा फुले’ या पुस्तकातून घेण्यात आला आहे.)

२० नोव्हेंबर १९५९ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने बालहक्कांची सनद स्वीकारली. त्यामुळे '२० नोव्हेंबर' हा दिवस 'जागतिक बालदिन' म्हणून जगात साजरा केला जातो. २० नोव्हेंबर १९८९ रोजी बालकांच्या हक्क मसुद्यावर सदस्यदेशांनी सह्या केल्या. या सनदेवर आतापर्यंत १९१ राष्ट्रांनी सह्या केल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांचा बालकनिधी ही संस्था जागतिकस्तरावर बालकांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध उपक्रमांचे नियोजन करून अंमलबजावणी करत असते. बालदिन जागतिक स्तरावर विविध देशांत वेगवेगळ्या दिवशी साजरा केला जातो.

# बालदिन

जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटना जगातील मानव कल्याणासाठी विविध कृतिकार्यक्रम, विशेष दिन राबवून मानवामध्ये जाणीवजागृती करत असते. उदा. जागतिक महिला दिन, एड्स सप्ताह, मानवी हक्क दिन, बालदिन इत्यादी. यांमध्ये एक दिवसापासून ते एक आठवडा, पंधरवडा, पूर्ण वर्ष, दशक इतक्या कालावधीत नियोजित कार्यक्रम साजरे करून समाज परिवर्तनाचा प्रयत्न केला जातो. या कालावधीत निश्चित कृतिकार्यक्रम करून जाणीव-जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

भारतामध्ये थोर स्वातंत्र्यसेनानी व भारताचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल मोतीलाल नेहरू यांच्या १४ नोव्हेंबर या जन्मदिनी बालदिन साजरा केला जातो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात तुरुंगवास भोगत असताना त्यांनी त्यांची एकुलती एक लाडकी कन्या भारताच्या माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांना लिहिलेल्या पत्रांतून बालशिक्षणाबाबत आपले विचार मांडले आहेत. मुले काय शिकतात, यापेक्षा त्यांच्यावर कोणते संस्कार होतात, हे पालक व शिक्षक यांनी पाहिले पाहिजे. त्यांनी मुलांना 'देवाघरची फुले' मानले. ती बागेतल्या फुलांच्या कळीप्रमाणे असतात. त्यांना प्रेमाने व काळजीने हाताळले पाहिजेत; कारण बालकांमध्येच देशाचे भवितव्य दडलेले आहे; देशाची खरी शक्ती व समाजउभारणीचा पाया बालकेच असतात, असे ते म्हणत.

**उद्दिष्टे :** १) बालकांच्या गरजा व हक्क यांविषयी जाणीव-जागृती करणे. २) बाल कल्याणकारी योजना वाढीस लावणे. ३) बालकांमध्ये सांप्रदायिक व सांस्कृतिक देवाणघेवाण करणे. ४) बालकांमध्ये विविध पंथ वा धर्मांबाबत संहिष्णुता निर्माण करून सामंजस्याची भावना वाढीस लावणे. ५) जगभरातील मुलामुलींमध्ये बंधुभाव वाढीस लावणे. ६) बालकांचे बालपण अधिक समृद्ध बनवणे. ७) बालकांमध्ये 'विश्वकुटुंबाची' संकल्पना वाढीस लावणे.

**वैशिष्ट्य :** बालदिनानिमित्त विभूतिपूजा टाळून, बालकांच्या गरजा व हक्क यांबाबत राष्ट्रातील पालकांमध्ये जाणीव-जागृती निर्माण केली जाते. पंडित नेहरू यांचा धीरोदात्तपणा, वीरवृत्ती, असामान्य चरित्र व

**देश व बालदिन तक्ता**

| अ.क्र | देश | बालदिन |
|---|---|---|
| १. | भारत | १४ नोव्हेंबर |
| २. | ब्राझील | १२ ऑक्टोबर |
| ३. | चीन | १ जून |
| ४. | मेक्सिको | ३० एप्रिल |
| ५. | न्यूझीलंड | मार्चचा पहिला रविवार |
| ६. | पोलंड | १ जून |
| ७. | श्रीलंका | १ ऑक्टोबर |
| ८. | जपान | ५ मे |
| ९. | बांगला देश | १७ मार्च |
| १०. | आझरबैजान | १ जून |
| ११. | अल्बेनिया | १ जून |
| १२. | अर्जेंटिना | ऑगस्ट महिन्यातील तिसरा रविवार |
| १३. | आर्मेनिया | १ जून |
| १४. | बल्गेरिया | १ जून |
| १५. | मध्य आफ्रिका | २५ डिसेंबर |
| १६. | चिली | ऑक्टोबर महिन्यातील पहिला बुधवार |
| १७. | कोलंबिया | एप्रिल महिन्यातील शेवटचा शनिवार |
| १८. | कोस्टा रीका | ९ सप्टेंबर |
| १९. | हाँगकाँग | ४ एप्रिल |
| २०. | क्रोएशिया | ११ नोव्हेंबर |
| २१. | झेक प्रजासत्ताक | १ जून |
| २२. | एक्वादोर | १ जून |
| २३. | ईजिप्त | २० नोव्हेंबर |
| २४. | एरिट्रिया | ८ डिसेंबर |
| २५. | जर्मनी, पश्चिम | २० सप्टेंबर |
| २६. | जर्मनी, पूर्व | १ जून |
| २७. | फिनलंड | २० नोव्हेंबर |
| २८. | ग्वातेमाला | १ ऑक्टोबर |
| २९. | हाँडुरस | १० सप्टेंबर |
| ३०. | हंगेरी | मे महिन्यातील शेवटचा रविवार |
| ३१. | क्युबा | जुलै महिन्यातील तिसरा रविवार |
| ३२. | हैती | १२ जून |
| ३३. | आयर्लंड | २० नोव्हेंबर |
| ३४. | इंडोनेशिया | २३ जुलै |

| | | |
|---|---|---|
| ३५. | कोरिया, उत्तर | १ जून |
| ३६. | कोरिया, दक्षिण | ५ मे |
| ३७. | जपान | ५ मे |
| ३८. | कझाकस्तान | १ जून |
| ३९. | लाओस | १ जून |
| ४०. | मालदीव प्रजासत्ताक | १० मे |
| ४१. | मॅनमार | १३ फेब्रुवारी |
| ४२. | मलेशिया | २० नोव्हेंबर |
| ४३. | मंगोलिया | १ जून |
| ४४. | मोल्दोवा | १ जून |
| ४५. | मोझँबीक | १ जून |
| ४६. | व्हिएतनाम | १ जून |
| ४७. | व्हेनेझुएला | जुलै महिन्यातील तिसरा रविवार |
| ४८. | वॅन्यव्हॉतू | २४ जुलै |
| ४९. | यूरग्वाय | ऑगस्ट महिन्यातील दुसरा रविवार |
| ५०. | संयुक्त अरब अमीर राज्ये (युएई) | १५ मार्च |
| ५१. | युक्रेन | १ जून |
| ५२. | टूव्हालू | ऑगस्ट महिन्यातील पहिला सोमवार |
| ५३. | तुर्की | २३ एप्रिल |
| ५४. | ट्युनिशिया | ११ जानेवारी |
| ५५. | त्रिनिदाद व टोबॅगो | २० नोव्हेंबर |
| ५६. | थायलंड | जानेवारी महिन्यातील दुसरा शनिवार |
| ५७. | तैवान | ४ एप्रिल |
| ५८. | स्वीडन | ऑक्टोबर महिन्यातील पहिला सोमवार |
| ५९. | सुरिनाम | ५ डिसेंबर |
| ६०. | न्यूझीलंड | मार्च महिन्यातील पहिला रविवार |
| ६१. | नायजेरिया | २७ मे |
| ६२. | निकाराग्वा | १ जून |
| ६३. | नॉर्वे | १७ मे |
| ६४. | पॅलेस्टिनीअन टेरिटोरीज | ५ एप्रिल |
| ६५. | पॅराग्वाय | १६ ऑगस्ट |
| ६६. | पनामा | जुलै महिन्यातील तिसरा रविवार (जुना १ नोव्हेंबर) |
| ६७. | पेरू | एप्रिल महिन्यातील दुसरा रविवार |
| ६८. | सूदान | २३ डिसेंबर |
| ६९. | स्पेन | मे महिन्यातील दुसरा रविवार |
| ७०. | स्लोव्हाकिया | १ जून |
| ७१. | दक्षिण आफ्रिका प्रजासत्ताक | नोव्हेंबर महिन्यातील पहिला शनिवार |
| ७२. | सिंगापूर | १ ऑक्टोबर |
| ७३. | सर्बीया | २० नोव्हेंबर |
| ७४. | रशियन सोव्हिएट फेडरेशन | १ जून |
| ७५. | रूमानिया | १ जून |
| ७६. | पोर्तुगाल | १ जून |
| ७७. | गिनी बिसाऊ | १ जून |
| ७८. | मकाऊ | १ जून |
| ७९. | केप व्हर्द | १ जून |
| ८०. | साऊँ टोमे ई प्रीन्सिपे | १ जून |
| ८१. | तिमोर | १ जून |
| ८२. | अंगोला | १ जून |
| ८३. | फिलिपीन्स | २० नोव्हेंबर |

चारित्र्य, अथांग मानवता हे बालकांमध्ये संक्रमित करण्याचा प्रयत्न केला जातो. कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांनी म्हटल्याप्रमाणे ‘जवाहरलाल म्हणजे ऋतुराज’. हा ‘ऋतुराज’ मुलामुलींमध्ये खुलवून त्यांचे जीवन आनंदी बनवण्याचा प्रयत्न केला जातो. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यासाठी अशा दीपस्तंभाची गरज असते. ‘बाल आनंद मेळावा’, ‘बालमहोत्सव’, ‘बालदिन’ यांसारख्या दिवशी मनोरंजनात्मक कार्यक्रमांबरोबर त्यातून मुलामुलींमध्ये कुटुंब, समाज, देश इत्यादींबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली पाहिजे आणि त्यांप्रती उचित कार्य करण्याची प्रेरणात्मक शिकवण दिली पाहिजे. बालशिक्षणाच्या बाबतीत अनुताई वाघ, ताराबाई मोडक, साने गुरुजी, राजा मंगळवेढेकर, भा. रा. भागवत इत्यादींचे योगदान मोठे आहे.

**संदर्भ :** १) कविमंडळ, राजश्री, चाचा नेहरू. २) गोखले, शरदचंद्र, बालविकास परिचय. ३) मंगळवेढेकर, राजा, बिनभिंतीची उघडी शाळा, पुणे.
४) Sharma, Rajendra; Sharma, Rachana, Social psychology, New Delhi, २००७.

**समीक्षक – उमाजी नायकवडे**

(सदर लेख मराठी विश्वकोश यांच्या https://marathivishwakosh.org या संकेतस्थळावरून घेण्यात आला आहे.)



# शाहीर

## कृष्णराव गणपतराव साबळे

◆ विशेष लेख ◆

**पद्मश्री शाहीर साबळे यांचे जन्मशताब्दी वर्ष ३ सप्टेंबर २०२३ रोजी संपले. शाहीर साबळे आणि महाराष्ट्राच्या लोककला यांचे नाते दुधातील खडीसाखरेसारखे आहे. किमान तीन पिढ्यांचे सांस्कृतिक संचित हे पद्मश्री शाहीर साबळे यांच्या लोकगीते, प्रहसने आणि मुक्तनाट्यांमधून घडले आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांपासून थेट गाव-खेड्यांपर्यंत शाहीर साबळे यांची लोकगीते पाटाच्या पाण्यासारखी प्रवाही राहिली आहेत. पद्मश्री शाहीर साबळे यांच्या गात्या गळ्याने महाराष्ट्राच्या लोककलेचा मळा फुलविला आहे. शाहीर साबळे महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीशी इतके एकरूप झाले आहेत की, लोककला म्हटली की, एकच नाव डोळ्यांपुढे येते आणि ते म्हणजे शाहीर साबळे यांचे! गाण्यात लतादीदी, तमाशात विठाबाई आणि लोककलेमध्ये शाहीर साबळे हे अतूट नाते सांस्कृतिक महाराष्ट्राने कित्येक दशके अनुभले आहे.**

# लोककलेचा मानबिंदू

**प्रा. डॉ. प्रकाश खांडगे**

पद्मश्री शाहीर कृष्णराव गणपतराव साबळे यांची जन्मभूमी पसरणी. सातारा जिल्ह्यातील वाईजवळच्या या निसर्गरम्य गावाने शाहिरांना घडवले. बालपणीच जरंडेश्वराच्या यात्रेतील भजन, कीर्तन आणि भारुडांचे संस्कार त्यांच्यावर झाले. चिमुकला कृष्ण आई दळण दळताना तिच्या मांडीवर डोके टेकवून डुलक्या घ्यायचा, आईच्या जात्यावरच्या ओव्या ऐकून बालपणीच जानपद गीतांचे संस्कार शाहिरांवर झाले. श्रावणात आयाबाया नागपंचमीचे फेर धरीत, लोकगीते गात हे सर्व सांस्कृतिक संचित कृष्णाने एखाद्या टीपकागदासारखे अलगद टिपून घेतले.

पुढे शाहीर साबळे यांची पाठवणी मामाकडे अमळनेरला करण्यात आली. तिथे साने गुरुजींचे संस्कार शाहिरांवर झाले. राष्ट्रभक्तीपर गीते रचण्याची आणि ती सादर करण्याची प्रेरणा शाहिरांना साने गुरुजींकडूनच मिळाली. खानदेशचे शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे यांचा लौकिक स्वातंत्र्यपूर्व काळात खानदेशात होता. 'वीर झाशीची राणी, झाशीची राणी, हिनं पालथं पाडूनशान पाजलं इंग्रजा पाणी' हा शाहीर सिद्राम बसप्पा मुचाटे यांचा पोवाडा शाहिरांना अतिशय आवडला. त्यांच्या प्रभावातूनच पुढे शाहीर साबळे यांची शाहिरी फुलली.

मुंबईत पोटापाण्यासाठी आलेले शाहीर कुर्ल्याला वास्तव्याला होते. तेथील कापड गिरणीत काम करत असतानाच त्यांना भजनी भारुडाचा छंद लागला. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक मंडळी त्या काळात गिरणगावात स्थायिक झालेली होती. ती येताना गावातून आपल्यासोबत भजन आणि भारुडाची परंपरा घेऊन आली. या परंपरेचाही प्रभाव शाहीर साबळे यांच्यावर पडला. पुढे अभ्युदयनगर, काळाचौकी येथे शाहीर राहू लागले. त्याच काळात सुहास भालेकर, राजा मयेकर, माया जाधव, शहाजी काळे अशा मंडळींशी त्यांचे मैत्र झाले आणि शाहीर साबळे पार्टीची स्थापना झाली. १९४४ साली 'यमराज्यातील एक रात्र' या शाहीर साबळे आणि पार्टीच्या पहिल्या प्रहसनाचा शुभारंभ अमर हिंद मंडळ, दादर येथे झाला. या कार्यक्रमाला लता मंगेशकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. मंगेशकर कुटुंब त्यावेळी गवालिया टँक येथे राहायला होते. त्यावेळी त्यांच्या गणपतीला शाहीर साबळे आणि पार्टीचा कार्यक्रम हमखास सादर व्हायचा.

तमाशातील मुक्तपणा आणि नाटकातील संहिताप्रधान नेमकेपणा घेऊन शाहिरांनी प्रहसनांसोबतच मराठी रंगभूमीवर 'मुक्तनाट्य' हा नवीन प्रकार सादर केला. किंबहुना मुक्तनाट्याचे शाहीर साबळे हे जनक होत. मराठी रंगभूमीवर लोकनाट्य ही संकल्पना शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी रुजवली, ते तमाशाचे अंगभूत गुण घेऊन, तर शाहीर साबळे यांनी मुक्तनाट्याची रचना करताना समाजातील समकालीन प्रश्नांवर अतिशय मार्मिक भाष्य करणारे संवाद सादर केले. मार्मिकता हे मुक्तनाट्याचे बलस्थान आहे, हे शाहीर साबळे यांनी नेमकेपणी हेरले होते. शाहीर साबळे यांची प्रहसने आणि मुक्तनाट्ये म्हणजे मराठी रंगभूमीला प्राप्त झालेले



मौलिक योगदान होय!

'यमराज्यातील एक रात्र' नंतर 'नशीब फुटकं सांधून घ्या', 'कोड्याची करामत', 'माकडाला चढली भांग', 'मीच तो बादशहा' अशी अनेक प्रहसने शाहीर साबळे आणि पार्टीने मराठी रंगभूमीवर सादर केली. या प्रहसनांमधील तत्कालीन प्रश्न आणि या प्रश्नांवरील मार्मिक भाष्य रसिकांना हसवता-हसवता त्यांच्या डोळ्यात बोधाचे अंजन घालत असे. 'बापाचा बाप', 'कशी काय वाट चुकला', 'कोंडू हवालदार' 'आंधळं दळतंय' अशी त्यांची मुक्तनाट्येदेखील एकेकाळी खूपच गाजली. मुंबईसह 'संयुक्त महाराष्ट्र' झाला मात्र मुंबईवर परप्रांतीयांचाच वरचष्मा असल्याबद्दल शाहिरांना अनेक वेळा खंत वाटत असे. त्यामुळे 'आंधळं दळतंय' या मुक्तनाट्यातून त्यांनी भाजी विकणाऱ्या पाटीवाल्याच्या तोंडून मराठी माणसाची व्यथा आणि उपेक्षा मांडली होती. मराठी माणूस जिन्याखाली राहणार याची खंत ते 'आंधळं दळतंय'मधून व्यक्त करून गेले.

शाहीर साबळे, राजा मयेकर, सुहास भालेकर, माया जाधव, शहाजी काळे, संजीवनी बिडकर अशा शाहीर साबळे पार्टीच्या मंडळींनी गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव एकेकाळी गाजवले होते. साठ ते ऐंशीच्या दशकात, संपूर्ण महाराष्ट्रात क्वचितच असे एखादे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ असेल, जिथे शाहीर साबळे यांचे मुक्तनाट्य किंवा प्रहसन झाले नाही. ही दोन दशके लोकनाट्य आणि मुक्तनाट्याचा सुवर्णकाळ होती, असे म्हणायला हरकत नाही.

## शाहिरी फुलोरा

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या काळात साहित्य, कला, संस्कृतीचा विकास झाला. ती वैभवाच्या शिखरावर पोहोचली. त्यात साहित्यिक नाट्य, चित्रपट कलावंतांसोबतच शाहीर आणि लोककलावंतांचे योगदानदेखील मोठे आहे. शाहीर साबळे यांच्या काळातच 'शाहिरी फुलोरा' ही नवी संकल्पना शाहीर आत्माराम पाटील यांनी राबवली. त्याच काळात शाहीर साबळे,



शाहीर अमर शेख, शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर गव्हाणकर, शाहीर राजाभाऊ खामकर, शाहीर पुंडलिक फरांदे, शाहीर विठ्ठल उमप, शाहीर दादा कोंडके, शाहीर लीलाधर हेगडे अशी मंडळी एकत्र आली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि त्यानंतर मराठी माणसाची चळवळ या शाहिरांनी गाजवली. त्याचबरोबर शाहिरी फुलोऱ्याचे कार्यक्रम करून राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी मदत उभी केली. प्रभातफेऱ्या काढून मनोरंजनासोबत सामाजिक प्रबोधन केले. राष्ट्रप्रेम आणि सर्वधर्मसमभावाची प्रेरणा जनसामान्यांच्या मनात निर्माण केली. इतकेच नव्हे; तर मिथकांना नव्या आशयाचे कोंदण चढवण्याचे काम शाहिरांनी केले.

## बहुआयामी कलावंत

'सरकार झाले गवळण, अरे कॉलनीत गोकुळ' अशा स्वरूपाचे मार्मिक भाष्य त्या काळातील शाहिरांनी केले. 'पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नव्हे; तर श्रमिकांच्या तळहातांवर उभी आहे' असा पुरोगामी विचार त्याकाळी शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी मांडला. १९५२ साली साम्यवादी चळवळीवर भाष्य करणारा 'आधुनिक मानवाची कहाणी' हा पोवाडा शाहीर साबळे यांनी रचला. हा पोवाडा म्हणजे कार्ल मार्क्सच्या साम्यवादी चळवळीचा महामंत्रच आहे. शाहिरांचे मित्र बाविस्कर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विचारवंत होते. त्यांनी शाहीर साबळे यांना 'आधुनिक मानवाची कहाणी' या पोवाड्याच्या लेखनासाठी प्रवृत्त केले.

शाहीर साबळे हे बहुआयामी कलावंत होते. ते गीतकार, लोकनाट्याचे लेखक, विनोदवीर, नाट्यदिग्दर्शक, उत्तम गायक, उत्तम छायाचित्रकार आणि ढोलकी वादक अशा अनेक भूमिकांमधून महाराष्ट्राला भेटत राहिले. शाहीर साबळे आणि बाळासाहेब ठाकरे यांची तर घनिष्ठ मैत्री होती. शाहीर साबळे यांची मुक्तनाट्ये आणि प्रहसनांच्या शुभारंभाच्या कार्यक्रमांचे सुरुवातीचे छायाचित्रकार म्हणजे बाळासाहेब ठाकरे!

## मोबाइल थिएटरचे जनक

शाहीर साबळे यांनी मराठी रंगभूमीवर जशी मुक्तनाट्याची नवी देणगी दिली, तसेच एक म्हणजे मोबाइल थिएटरचे ते जनक ठरले आणि दुसरे म्हणजे 'महाराष्ट्राची लोकधारा' हा अतिशय प्रसिद्ध कार्यक्रम त्यांनी मराठी रंगमंचावर आणला. त्यातून महाराष्ट्राच्या लोककलेची दौलतच रंगभूमीवर उभी केली. शंभू मित्रा यांनी बोलविलेल्या एका महोत्सवात 'कलकत्ता युथ क्वायर' हा कार्यक्रम शाहिरांनी पाहिला. या कार्यक्रमाने शाहीर साबळे विलक्षण प्रभावित झाले. त्यातून 'महाराष्ट्राची लोकधारा' उभी राहिली. या कार्यक्रमामुळे जागरण-गोंधळासारखी विधीनाट्ये, वासुदेव, कोकेवाला, जोशी, पिंगळा यांसारखी विधीनाट्ये, कृषी संस्कृतीतील भलरी गीते, कोळी बांधवांची गीते व नृत्ये, तमाशातील लावणी-बतावणी, मर्दानी पोवाडे, भजने आणि भारुडे असे लोकप्रकार मुख्य धारेमध्ये आले.

आजही, त्यांचे 'अरे अरे वैराळा' हे कोकेवाल्याचे गीत लोकप्रिय आहे. कोळीगीत, 'मल्हारवारी मोत्यानं' हे खंडोबाचे गीत, 'अनादि निर्गुण प्रगटली भवानी' हे देवीचे गीत, 'शुभमंगल चरणी गण नाचला' हा तमाशातील पठ्ठे बापूराव यांचा गण आजही लोकांच्या मुखी आहे. 'महाराष्ट्राची लोकधारा'तील लोकगीते आणि लोकनृत्ये हे महाराष्ट्राचे लोकसंचित आहे. त्याची मोहिनी आजही मराठी लोकमानसावर आहे. त्यांची लोकप्रिय गीते आणि मुक्तनाट्ये पुढीलप्रमाणे :-

शाहीर साबळे यांनी लोकप्रिय केलेली

लोकगीते - 'आधी गणाला रणी आणला, शुभ मंगल चरणी गण नाचला', 'महाराज गौरी नंदना नमन पहिले नमन करितो वंदन', 'अरे कान्हा अरे कृष्णा मनरंजन मोहना', 'अरे अरे वैराळा', 'नेसते नेसते पैठणी चोळी गं आज होळी गं', 'जेजुरीच्या खंडेराया जागराला या या, 'पसरणीच्या भैरी देवा जागराला या या', 'अनादि निर्गुण प्रगटली भवानी', 'झाला कृतार्थ पांडुरंग', 'विंचू चावला'...

शाहीर साबळे यांची प्रहसने आणि मुक्तनाट्ये - 'यमराज्यात एक रात्र', 'कोड्याची करामत', 'नशीब फुटकं सांधून सांधून घ्या', 'माकडाला चढली भांग', 'फुटपायरीचा सम्राट', 'एक तमाशा सुंदरसा', 'कशी काय वाट चुकला', 'आबूरावाचं लगीन', 'मीच तो बादशहा'...

## स्वतंत्र अस्मितेचे शाहीर

महाराष्ट्र शाहीर साबळे यांचे लोकरंगभूमीला आणि लोकसंस्कृतीला जे मोठे योगदान लाभलेले आहे, ते म्हणजे त्यांनी लोकसाहित्याच्या ज्येष्ठ विदुषी डॉक्टर सरोजिनी बाबर यांनी जसे खेडोपाडीचे लोकसाहित्य, लोकगीते, लोककथा, जानपद गीते यांचे संकलन केले आणि ती सामग्री ग्रंथबद्ध केली; असाच लोकगीतांचा खजिना शाहीर साबळे यांनी आपल्या गोड गळ्यातून मुखर केला. शाहीर साबळे यांनी जात्यावरची गीते, लग्नगीते, गोंधळ-जागरणासारखी विधीगीते, कोळीगीते, पट्ठे बापूराव, प्रभाकर आदी शाहिरांचे गण-पोवाडे आदी सामग्री संकलित केली आणि ती ध्वनिमुद्रिकांच्या माध्यमातून जनतेमध्ये लोकप्रिय केली. पोवाडे केवळ सांप्रदायिक अथवा राष्ट्रीय असतात या संकल्पनेला छेद देत त्यांनी सामाजिक विषयांवरचे पोवाडेदेखील रचले आणि सादर केले. तसेच रंगभूमीवर प्रहसने आणि मुक्तनाट्य यांची स्वतंत्र परंपरा निर्माण केली. त्यांनी लोकसंस्कृतीला केवळ गाते केले नाही, तर तिला एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. इतकेच नव्हे तर केवळ राज्याच्या पातळीवर नव्हे, तर देशाच्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीची-लोककलांची वेगळी ओळख निर्माण करून दिली. शाहीर साबळे यांची बांधिलकी केवळ रसिकांशी होती, ते कोणाचेही स्तुतिपाठक झाले नाहीत. त्यामुळेच ते 'स्वतंत्र अस्मितेचे शाहीर' म्हणून ओळखले जाऊ लागले.



## महाराष्ट्राची लोककला आणि अस्मिता

एके दिवशी, एका कार्यक्रमामध्ये संगीत दिग्दर्शक सलील चौधरी आणि शाहीर साबळे यांना एकत्र रंगमंचावर बोलवण्यात आले. तेव्हा निवेदक अमीन सयानी म्हणाले, 'देखो बंगाल महाराष्ट्र के गले लग रहा है।' म्हणूनच शाहीर साबळे, महाराष्ट्राच्या लोककला आणि महाराष्ट्राची अस्मिता या तिन्ही गोष्टी एकच आहेत असे केवळ मराठीजनांनाच नाही; तर संपूर्ण भारताला वाटत होते. शाहीर साबळे म्हणजे साक्षात लोककला विद्यापीठच होते. प्रशांत दामले, किशोरी शहाणे, भरत जाधव, अंकुश चौधरी, सिद्धार्थ जाधव, आदेश बांदेकर, चारुशीला साबळे, प्रदीप पटवर्धन, देवदत्त साबळे, यशोधरा साबळे, वसुंधरा साबळे, मंगेश दत्त, केदार शिंदे, विवेक ताम्हणकर असे अनेक कलावंत या विद्यापीठामध्ये घडले.

शाहीर साबळे यांचे पसरणी या त्यांच्या गावाशी शेवटच्या श्वासापर्यंत अतूट संबंध होते. या पसरणीच्या परिसरातच शाहीर साबळे यांनी वृद्ध कलावंतांसाठी 'तपस्या आश्रम' उभा केला होता. शाहीर साबळे यांच्या 'तपस्या आश्रमा'ला महाराष्ट्र शासनाने आर्थिक अनुदान दिले होते.

शाहीर साबळे यांच्यावर अमळनेरच्या वास्तव्यात साने गुरुजी यांचे संस्कार झाले होतेच, त्यानंतर खानदेशी शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे यांचेही संस्कार झाले होते. शाहीर साबळे हे सामाजिक भान असणारे शाहीर होते. शाहीर अमर शेख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शाहीर अमरशेख पुरस्कार शाहीर मधुकर नेराळे, रमेश कदम, आत्माराम पाटील आणि शाहीर साबळे यांनी सुरू केला. या पहिल्याच पुरस्काराचे मानकरी शाहीर पिराजीराव सरनाईक ठरले. शाहीर साबळे यांनी आपल्या जन्मगावी बहुजनांसाठी पहिला हरिजन मंदिर प्रवेश घडवला. त्या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार महाराष्ट्रातील थोर विभूती होत्या. पसरणीच्या भैरवनाथ मंदिरात त्यांनी एका हरिजन बालकातर्फे हा मंदिर प्रवेश घडवला. यावेळी सेनापती बापट, कर्मवीर भाऊराव पाटील, साने गुरुजी, क्रांतिसिंह नाना पाटील, संत गाडगे महाराज अशा विभूती हजर होत्या. शाहीर साबळे यांना असलेले हे सामजिक भान अतिशय महत्त्वाचे होते आणि तेच त्यांच्या यशाचे गमकही होते. परंपरा जपतानाच त्यांनी काळाबरोबर चालण्याचे भानही दाखवले. परंपरेचे गुणगान गाताना त्यांनी वेळप्रसंगी परंपरा तोडल्याही. त्यांनी आयुष्यभर आपल्या शाहिरी कलेत विवेकाचे अवधान राखले. आपल्या कार्यक्रमांतून अंधश्रद्धा वाढीस लागणार नाहीत, याचे त्यांनी कायम भान राखले. त्यामुळेच शाहीर साबळे हे खऱ्या अर्थाने समाजाला दिशा दाखवणारे, समाजात आत्मभान-विवेकभान निर्माण करणारे महाराष्ट्र शाहीर होते. त्यांनी शाहिराची जागल्याची भूमिका शेवटपर्यंत निभावली.

(लेखक हे लोकसाहित्याचे अभ्यासक आहेत.)

**मराठी भाषेच्या आणि मराठी लोकपरंपरेच्या लोकसंस्कृतीला महाराष्ट्र शाहीर कृष्णराव साबळे यांनी लोककलेच्या सादरीकरणातून नवसंजीवनी दिली. तत्कालीन भांडवलशाहीविरोधी लढा पुकारून आपल्या कवनांच्या माध्यमातून सर्व बहुजनांचे मनोरंजनाबरोबरच प्रबोधन, उद्बोधन केले. महाराष्ट्रातील लोककलेच्या क्षेत्रातील शाहीर कृष्णराव साबळे हे एक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व. महाराष्ट्राच्या लोककलेचा मानबिंदू. लोककलेतील मानाचे पान म्हणजे शाहीर साबळे. शाहीर साबळे यांनी लोकरंजनातून लोकशिक्षणाचा वसा हयातभर सांभाळला.**

# लोकरंजनातून लोकशिक्षण

**प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे**

*'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा'* हे गीत ऐकल्यानंतर महाराष्ट्राच्या मातीतील एक बुलंद आणि कणखर व्यक्तिमत्त्व शाहिरी परंपरेतील आपल्या नजरेसमोर उभे राहते, ते म्हणजे महाराष्ट्र शाहीर कृष्णराव साबळे. महाराष्ट्राला शाहिरांची परंपरा अति प्राचीन आहे. जो स्वतः लिहितो गातो आणि सादर करतो तो म्हणजे शाहीर. शिवकाळापासून अज्ञानदास, अगीनदास, कवी नागेश इथपासून सुरू झालेली परंपरा पुढे पेशवाईत शाहीर राम जोशी, प्रभाकर, अनंत फंदी, होनाजी बाळा, सगनभाऊ, परसराम ते पुढे शाहीर सातू-हिरू कवलापूरकर, उमा बाबू सावळजकर, भाऊबापू मांग-नारायणगावकर, हैबती घाटगे-पुसेसावळीकर, पठ्ठे बापूराव, भाऊ पक्कड उर्फ भाऊ मालोजी भंडारे, शंकरराव वाघोलीकर ते शाहीर किसान फागोजी बनसोडे, हरीहरराव सोनुले, पतितपावन दास, केरुबा गायकवाड, केरुबा घेगडे, अमरशेख, अण्णा भाऊ साठे, द.ना.घावानकर, चंदू भरडकर, प्रल्हाद शिंदे, विठ्ठल उमप या आणि अशा ज्ञात-अज्ञात कित्येक प्रतिभासंपन्न शाहिरांनी या भूमीवर जेव्हा-जेव्हा स्थित्यंतरे आली, तेव्हा-तेव्हा या लोककलावंतांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून समाजात जनजागृती, प्रबोधन, उद्बोधन आणि मनोरंजनाबरोबरच समाजाला लोकशिक्षणही दिले. त्याच शाहिरी परंपरेतील एक प्रतिभासंपन्न शाहीर म्हणजेच महाराष्ट्र शाहीर कृष्णराव साबळे होय.

## भजन, कीर्तन, अभंगाचा प्रभाव

सातारा जिल्ह्यातील वाईजवळच्या पसरणीसारख्या घाटमाथ्याच्या डोंगरदऱ्यामध्ये वसलेले एक दुर्गम गाव. याच पसरणीत गणपतराव साबळे आणि लक्ष्मीबाईंच्या उदरी एका ओजस्वी मुलाने ३ सप्टेंबर १९२३ रोजी जन्म घेतला. पसरणी गावात वारकरी; तसेच तमाशाची परंपरा लाभली होती. वडील गणपतराव हे पंढरपूरच्या विठोबाचे निस्सीम भक्त होते. घराण्यालाच वारकऱ्यांची परंपरा लाभलेली असल्यामुळे भजन, कीर्तन, अभंगाचा प्रभाव कृष्णराव साबळे यांच्यावर पडला होता. पसरणीला भैरवनाथाचे भव्य दिव्य अधिष्ठान असल्याने कुळधर्म कुळाचारानुसार जागरण, गोंधळाचे कार्यक्रमही या परिसरात पाहायला मिळायचे. पसरणी गावाचे सांस्कृतिक वैभव काही वेगळेच होते. त्याकाळी रामहरी पथक गावात पौराणिक धार्मिक आणि सामाजिक विषयांवरचे कार्यक्रम भजनाच्या रूपाने सादर करायचे. मंदिर गाभाऱ्याच्या परिसरात एकतारीवरची भजने चालायची. पंढरपूरचे बाबा सर्वगौड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे शिष्यगण रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप आदी ग्रंथांचे पारायण ओवीरूपात खणखणीत आणि रसाळ व ओघवत्या भाषेत सादर करायचे. यात बाबांचा सक्रिय सहभाग असायचा, बाबा संस्कृत पारायणाचा अर्थ मराठी भाषेत लोकांना समजावून सांगायचे. यातूनच निरक्षर वडिलांच्या प्रतिभेला प्रेरित होऊन तीन वर्षांच्या कृष्णाने आईकडे शिकण्याची इच्छा व्यक्त केली. आई लक्ष्मीबाईसुद्धा जात्यावरच्या ओव्या, निंदणी खुरपणीची गाणी भराभर गात असायच्या. वडील गणपतराव आणि आई लक्ष्मीबाई हे निरक्षर असूनही यांचे इतके पाठांतर आहे, तर शिकलेल्या व्यक्तीचे किती असू शकते. म्हणून कृष्णाने शिक्षणाची कास धरण्याची मनोमन गाठ बांधली. आईच्या सांगण्यावरून अंमळनेरच्या आजीकडे शाळा शिकण्यासाठी पुढील वाटचाल सुरू झाली. म्युनिसिपल शाळा क्र.३ मध्ये कृष्णाचे शिक्षण सुरू झाले, तिथे पूज्यनीय साने गुरुजींचा सहवास कृष्णाला मिळाला. साने गुरुजींचे निर्मळ रूप, मध्यम उंची, किरकोळ अंगकाठी, अंगावर साधे खादीचे कपडे, गांधी टोपी, आईसारखे मायाळू आणि मूर्तिमंत कारुण्य हे कृष्णावर संस्कार करत होते. स्वातंत्र्याची चळवळ त्यावेळेला जोरात चालू होती. या चळवळीमध्ये साने गुरुजींनी मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या



सभेसमोर लहान मुलांना गाण्याची संधी दिली. त्यात देशभक्तीपर गीते, पोवाडे, कविता हे गाण्याचा मान कृष्णाला लाभला. त्यातून कृष्णावर सगळीकडून कौतुकाचा वर्षाव होऊ लागला. साने गुरुजींनी धर्माची संकल्पना सांगितलेले गीत त्या वयात गाऊ लागले.

## प्रतिभासंपन्न शाहीर

अंमळनेरमध्ये कृष्णाच्या प्रतिभेत भर पडत होती. गाण्याकडे त्याचा ओढा जरा जास्त दिसत होता, हे आजीच्या लक्षात आल्यानंतर आजीने त्याला गाण्यास विरोध केला. शाळा शिकून अभ्यास करण्याऐवजी कृष्णाने ही नको ती उठाठेव कशासाठी करावी म्हणून आजीने त्याला अगोदर प्रेमाने मायेने समजावून सांगितले; पण एकदा मात्र आजी जिद्दीला पेटली होती. तिने कृष्णाला दम दिला आणि घरात कोंडून टाकले.

एकदा सेनापती बापट यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या संमेलनात देशभक्तीपर गीत गाण्यासाठी कृष्णाने भाग घेतला होता; पण काही केल्या आजी काही ऐकेना. कृष्णावर तिने एक प्रकारचा खडा पहारा दिला होता. तिकडे साने गुरुजी कृष्णाची आतुरतेने वाट पाहत होते. अन् इकडे कृष्णा आजीच्या सक्त पहाऱ्यात. कार्यक्रमाला जायचे नाही ही सक्त ताकीद. वेळ निघून जायला लागला अन् कृष्णाची चुळबुळ वाढली. काय करावे कळेना. डोळा चुकवून पळावे, तर 'तंगडं मोडीन गेलास तर' अशी आजीने दिलेली तंबी. धीर धरवेना. आजी बाजूला झोपलेली रस्ता अडवून! चाचपणी केली. आजीचे डोळे मिटलेले. मांजराच्या पावलांनी दरवाजा गाठला. कडीला हात घातला. हळुवारपणाने दरवाजा उघडला मात्र अन् घात झाला. पत्र्याचा कर्र कर्र असा आवाज आला अन् आजीने डोळे उघडले. खवळलेल्या वाघिणीसारखी झेप घेतली तिने अन् गचांड पकडून आत ढकललं. अशा क्लुप्त्यासुद्धा शाहिरांनी लहानपणी केलेल्या आहेत. दिवसामागून दिवस जात होते, तसतसे शाहीर वयाने आणि बुद्धिमत्तेने प्रगल्भ होत चालले होते. सरकारदरबारी कुठे चाकरी करण्याऐवजी अखंडपणे त्यांनी मराठी मातीचे ऋण फेडण्यासाठी आपले योगदान दिले. आपल्या प्रतिभेच्या जोरावर त्यांनी अनेक रचना साकारल्या. कुठल्याही शुभ कार्याची सुरुवात करत असताना गणेशाला साकडं घालून गण गाण्याची प्रथा आहे. शाहिरांनी पठ्ठे बापूरावांच्या अनेक गणांना स्वतः चाली लावून लोकांना आवडेल, असा प्रयत्न केलेला आहे. उदा.

*आधी गणाला रणी आणला*
*नाही तर रंग पुन्हा सुना सुना हो*
*माझ्या मनाचा मी तू पनाचा*
*जाळून केला चुना चुना*
*पठ्ठे बापूराव कवी कवनाचा*
*हा एक टुकडा जुना जुना*

अशा पारंपरिक धाटणीतल्या प्रसिद्ध गणाला शाहिरांनी आपल्या गोड गळ्याने साज चढविला. शाहिरांची बोटे संवादिनीवर अशी थिरकायची की, जसे काही एखादा टाईपराईटर मशिनीवर टाईपिंग करतो. वाद्याच्या सुरावटीवर शाहिरांच्या कंठातून आपसूकच रांगडा पोवाडा मधाळ रूपाने श्रोत्यांसमोर जायचा. शाहिरांचे गाणे हे जसे दृश्यरूपात प्रेक्षकाच्या मनाला गवसणी घालायचे, तसेच श्राव्यरूपात ते गीत भुरळ ही पाडत असायचे. त्यांनी विविधांगी रचना गायल्या. कटाव, शिलकार, टाकण्या, पोवाडे हे नव्या रूपात आणले. त्यांच्या 'महाराष्ट्राची लोकधारा' या कार्यक्रमाची सुरुवात परंपरेप्रमाणे ते गणेशाला वंदन करून करायचे. उदा.

*महाराज गौरीनंदना अमरवंदना दैत्यकंदना*
*हे मंगलमूर्ती ठेव कृपा दृष्टी एकदंत*
*दिनावर पूर्ती*
*हे स्वयंभू शुभदायक हे गणनायका,*
*गीतगायका अढळ दे स्फूर्ती*
*भवसमुद्र जेणे करून सहज गती ते तरती.*

मराठी भाषेच्या आणि मराठी लोकपरंपरेच्या लोकसंस्कृतीला महाराष्ट्र शाहीर कृष्णराव साबळे यांनी लोककलेच्या सादरीकरणातून नवसंजीवनी दिली. तत्कालीन भांडवलशाहीविरोधी लढा पुकारून आपल्या कवनांच्या माध्यमातून सर्व बहुजनांचे मनोरंजनाबरोबरच प्रबोधन, उद्बोधन केले. महाराष्ट्रातील लोककलेच्या क्षेत्रातील शाहीर कृष्णराव साबळे हे एक प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व. महाराष्ट्राच्या लोककलेचा मानबिंदू! लोककलेतील मानाचे पान म्हणजे शाहीर साबळे. शाहीर साबळे यांनी लोकरंजनातून लोकशिक्षणाचा वसा हयातभर सांभाळला.

## दमदार सादरीकरण

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक चळवळींचा आणि शाहीर साबळे यांचा निकटचा संबंध होता. प्रासादिक गळ्याच्या या शाहिराने हातात डफ घेतला की, कामगार भागातील गणेशोत्सवात एकच थरार निर्माण व्हायचा. राजा मयेकर, सुहास भालेकर, संजीवनी बीडकर, माया जाधव या व अशा अनेक मान्यवर लोककलावंतांचा मेळा वगनाट्य प्रहसनांच्या रूपाने शाहिरांनी एकेकाळी जमवला होता.

सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील पसरणी गावातील शाहिरावर संस्कार होते ते साने गुरुजींचे. अंमळनेरला मामाकडे असताना शाहीर साबळे यांना साने

### मराठीतील मुक्तनाट्याचे जनक

तमाशा वगनाट्याची रंगबाजी अधिक गडद करून मुक्तनाट्य असे नवनामांतरित सादरीकरण केले. यामध्ये त्यांना जनतेने तर साथ दिलीच; पण चोखंदळ टीकाकार आणि चिकित्सक समीक्षक यांनीही शाहिरांची पाठ थोपटली. मराठी विश्वकोशासारख्या मान्यताप्राप्त ग्रंथात त्यांच्या नावाची नोंद झाली आणि मराठीतील मुक्तनाट्याचे जनक म्हणून शाहिरांचे नाव भारतभर प्रख्यात झाले. लोकगीत गायनाच्या क्षेत्रात तर त्यांनी इतिहास रचला. 'अरे अरे वैराळा' या कोकेवाल्याच्या गीतापासून अभंग, गवळणी, गण, कोळीगीते, लावणी, खंडोबाची गीते, देवीची गीते, जात्यावरच्या ओव्या, वासुदेवाचे गाणे असे असंख्य लोकगीतांचे प्रकार शाहिरांच्या गात्या गळ्यातून फुलले 'आधुनिक मानवाची कहाणी' हा साम्यवादावर आधारित दीर्घ पोवाडा म्हणजे शाहीर साबळे यांच्या शाहिरी कारकिर्दीतील शिरपेच होय.

गुरुजींचा सहवास लाभला होता. त्याच वेळी त्यांनी सिद्राम बसाप्पा मुचाटे यांची शाहिरी ऐकली होती. *‘वीर झाशीची राणी, हिनं पालथं पाडुनशान पाजलं इंग्रजां पाणी’* हा पोवाडा सिद्राम मुचाटे मोठ्या ऐटीत म्हणायचे. तेच संस्कार शाहिरांवर झाले. ढोलकी फडाच्या तमाशातील पठ्ठे बापूरावांचे गण वेगळ्या चाली लावून त्यात रंजकता आणली ती शाहीर साबळे यांनी. कंठाच्या शिरा ताणू न देता *‘आधी गणाला रणी आणला, नाहीतर रंग पुन्हा सुना- सुना’ तसेच ‘शुभमंगल चरणी गण नाचला’, ‘महाराज गौरी नंदना’* अशा शाहीर साबळेंनी गायलेल्या विविध गणांची खुमारी काही औरच होती. शाहीर साबळे पार्टीने अवघ्या महाराष्ट्रात दमदार सादरीकरणामुळे अधिराज्य गाजवले होते.

तमाशातील मुक्तपणा आणि नाटकातील अंकांचा चाकोरीबद्ध आराखडा अंगीकारून मराठी लोकरंगभूमीवर प्रहसने आणि वगनाट्य हा नवा प्रकार शाहीर साबळे यांनी आणला. इतकेच नव्हे, तर मराठी रंगभूमीच्या इतिहासात प्रथमच ‘मोबाईल थिएटर, ही संकल्पना त्यांनी रुजवली. ‘कोड्याची करामत’, ‘यमराज्यात एक रात्र’, ‘माकडाला चढली भांग’, ‘नशीब फुटकं सांधून घ्या’, ‘असूनी खास मालक घरचा’, ‘फुटपायरीचा सम्राट’, ‘कशी काय वाट चुकला?, ‘बापाचा बाप’, ‘आंधळं दळतंय’, ‘कोंडू हवालदार’ ही व अशी अनेक प्रहसने नि मुक्तनाट्ये सादर करून शाहीर साबळे यांनी अवघे लोकमानस रंजन आणि लोकशिक्षणाच्या दुहेरी झोपाळ्यावर हलते ठेवले. सन १९६० ते १९७५ अशी १५ वर्षे त्यांनी एकाहून एक सरस लोकनाट्ये बंदिस्त थिएटरमध्ये सादर केली.

शाहिरांच्या ‘आंधळं दळतंय’ या मुक्तनाट्याचा शुभारंभ १३ ऑगस्ट १९६६ रोजी रवींद्र नाट्यमंदिर येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते धूमधडाक्यात पार पडला. ‘आंधळं दळतंय’ या मुक्तनाट्याची बाळासाहेब ठाकरे यांनी भरभरून प्रशंसा केली, तेव्हा बाळासाहेब म्हणाले होते, ‘समाजाला गंज चढून जेव्हा मरगळ यायला लागते, तेव्हा शाहिराचा डफ प्रभावी ठरतो. साबळे यांनी लोकजागृतीचा फार मोठा वाटा उचलला आहे. ‘आंधळं दळतंय’ म्हणजे आंधळं कुठं अन् पीठ कुठे जातंय याचा आंधळ्यालाच पत्ता लागत नाही ते पीठ कुठेही जाऊ नये म्हणून शाहिरांनी ‘आंधळं दळतंय’ या रूपकात जनतेसमोर काय घडते अन् काय घडायला पाहिजे हे समर्थपणे मांडले आहे.’

## भजन– भारुडांचे संस्कार

लोकसंस्कृतीतील लोकगीते, लोकनृत्ये, लोककथा, लोकनाट्ये यांची मोहिनी शाहिरांना बालवयातच पडली. आई जात्यावर दळण दळीत असताना शाहीर तिच्या मांडीवर डोकं ठेवून झोपलेले असायचे. आईच्या जात्यावरच्या ओव्यांच्या संस्कारांतून शाहिरांनी ओव्या करायला सुरुवात केली. जरंडेश्वराच्या यात्रेत बालवयात दिंडी, पालखी आणि भजन-भारुडांचे संस्कार शाहिरांवर झाले. त्यातूनच पुढे या *‘विठूचा गजर, हरिनामाचा झेंडा रोविला’* यांसारखा अभंग शाहिरांच्या प्रासादिक गळ्यातून उतरला. जोतिबा, खंडोबा, भैरवनाथ आदी लोकदैवतांची ठाणी पसरणीपासून जवळच असलेल्या पाली खंडोबाचे देवस्थान, माहुली (सातारा) येथील संतसंप्रदायाची भूमी, वाईतील मांढरची काळूआई, औंधची यमाई आणि जगप्रसिद्ध असलेले बावधनचे बगाड या सगळ्या सांस्कृतिक आणि वैभवशाली परिसरातच आहेत. त्यामुळेच जोतिबा, खंडोबा, भैरोबाच्या यात्रांत वाघ्या-मुरळ्यांचे जागरण शाहिरांनी ऐकले होते आणि त्यातून ‘जेजुरीच्या खंडेराया जागराला या’ हे लोकगीतेसुद्धा त्यांनी गायिले.

## महाराष्ट्राची लोकधारा

शाहीर एकदा आपल्या साबळे पार्टीचा कार्यक्रम घेऊन कलकत्त्याला गेले होते. तेथील वाद्यवृंदाची परंपरा पाहून शाहीर प्रभावित झाले आणि आपणही असा वाद्यवृंद सुरू करावा, असे त्यांच्या मनात आले. त्यातूनच ‘महाराष्ट्राची लोकधारा’ या कार्मक्रमाचा उदय झाला. तत्कालीन मुख्यमंत्री वसतंदादा पाटील यांच्या हस्ते या ‘महाराष्ट्राची लोकधारा’चे उद्घाटन झाले होते. चारुशीला साबळे, प्रशांत दामले, विजय कदम, भरत जाधव, देवदत्त साबळे, मंगेश दत्त आदी कलावंतांनी प्रथमतः महाराष्ट्राच्या लोकधारेतच काम केले होते. महाराष्ट्राच्या लोकधारेची परंपरा पुढे शाहीर साबळे यांचे नातू केदार शिंदे यांनी चालवली आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतराव चव्हाण, पंडित नेहरू, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, कॉम्रेड डांगे अशा अनेक राजकीय नेत्यांसमोर; तसेच लता मंगेशकर, राज कपूर अशा ज्येष्ठ कलावंतांसमोर शाहीर साबळे यांनी अस्सल शाहिरी सादर केली होती. साम्यवादी लेखक, कलावंतांसोबत त्यांनी रशियाची वारीही केली होती. त्यांनी मॉरिशसला ‘महाराष्ट्राची लोकधारा’ कार्यक्रम सादर केला होता. दिल्लीला अनेक वगनाट्येही सादर केली होती.

## अनेक पुरस्कारांनी सन्मानित

शाहीर कृष्णराव साबळे यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्ताने त्यांना देशात, परदेशात मानसन्मानाने निमंत्रित करून पुरस्कार देऊनही गौरवण्यात आले. शाहीर साबळे यांनी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय ठिकाणी सहभाग नोंदवला. त्यांच्या पुरस्काराची संख्या खूप मोठी आहे. ती अशी...

पद्मश्री पुरस्कार भारत सरकार, संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार भारत सरकार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, राज्य सांस्कृतिक पुरस्कार, नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद, साताराभूषण पुरस्कार, संत नामदेव पुरस्कार, शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार, सर्वश्रेष्ठ गायक म्हणून महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार, कविश्रेष्ठ पी. सावळाराम पुरस्कार, ठाणे, ‘महाराष्ट्र टाइम्स’तर्फे महाराष्ट्रभूषण पुरस्कार, महाराष्ट्ररत्न पुरस्कार, मुंबई, शाहीर अमर शेख प्रथम पुरस्काराचा मानकरी होण्याचा सन्मान, अखिल भारतीय मराठी नाट्य शाहीर परिषदेचे अध्यक्षपद, असे विविध मानसन्मान प्राप्त झालेल्या शाहिरांची प्रतिभा नवनवोन्मेषशालिनी होती. अशा या प्रतिभासंपन्न शाहिराची प्राणज्योत २० मार्च २०१५ या दिवशी मावळली.


(लेखक हे मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीचे विभागप्रमुख आहेत.)

**शाहीर कृष्णराव गणपतराव साबळे यांची साध्या सोप्या शब्दरचनेत बांधलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. शाहीर आणि राजा मयेकर यांची भट्टी तर इतकी छान जुळून आली की, अल्पावधीतच कामगार विभागात राजा कृष्णाची जोडी म्हणून तिने यश संपादन केलं. कोयना स्वयंवर, कोड्याची करामत आदी प्रहसनांची लडीच त्यांनी लावली. यामुळे शाहिरांचे महिन्याच्या ३० दिवसांत ३५ प्रयोग व्हायला लागले. असा हा शाहिरांचा प्रेरणादायी जीवनप्रवास...**

# प्रेरणादायी जीवनप्रवास...

**वसुंधरा साबळे**

फलटणच्या मुधोजी हायस्कूलमधून शाहिरांना कार्यक्रमासाठी बोलावणं आलं... मुधोजी हायस्कूलमधल्या दहावीच्या वर्गात शिकणारी भानुमती बारसोडे ही विद्यार्थिनी त्या वर्षी तिथे सांस्कृतिक विभागप्रमुख होती आणि तिनेच हा कार्यक्रम ठरवला होता. आपला लवाजमा घेऊन शाहीर तिथे पोहोचले. त्यांनी कार्यक्रम सादर करायला सुरुवात केली आणि प्रेक्षकात बसलेली भानुमती भारावून गेली. त्यांच्या आवाजावर लुब्धच झाली. वास्तविक त्याकाळी शाहीर काही दिसायला देखणे नव्हते, शिवाय रंगानेही काळेसावळे, त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडणं अशक्यच! त्यात भानुमती उजळ वर्णाची, हुशार विद्यार्थिनी होती. त्यात ती ब्राह्मण कुटुंबातली. स्वतः उत्तम कविता करायची. तिचे वडील फलटणमधले प्रसिद्ध डॉक्टर होते. संपूर्ण कुटुंबच सुशिक्षित, त्यामुळे भानुमतीचं भारावलेपण क्षणिक ठरण्याचीच शक्यता जास्त होती.



कार्यक्रम संपला आणि भानुमती शाहिरांना जाऊन भेटली. त्यांचं कौतुक करून त्यांच्याकडून पत्ताही घेतला. इतर मागतात तसाच असेल असं मानून शाहिरांनी तो दिलाही आणि तिथून निघाल्यावर ते हे सगळं विसरूनही गेले. पण सात-आठ दिवसांतच भानुमतीचं त्यांना पत्र आलं. परत एकदा कार्यक्रमाचं आणि त्यांच्या आवाजाचं तिने कौतुक केलं आणि आपणसुद्धा कविता करतो तर तुम्हाला त्या पाठवत जाऊ का? हा प्रश्नही विचारला. शाहिरांनीही सहज होकारार्थी उत्तर पाठवून दिलं आणि नंतर भानुमतीने पत्रांची लयलूटच सुरू केली. आता मात्र मित्र शाहिरांना चिडवू लागले. 'पोरगी प्रेमात पडलीय' म्हणत; पण शाहिरांना आपली कुवत ठाऊक होती. शिक्षणापासून आर्थिक स्थैर्यापर्यंत ते कुठेच भानुमतीची बरोबरी करू शकत नव्हते. हा घास काही आपल्याला परवडणारा नाही हे जाणून ते तिच्या पत्रांना उत्तरं देणं टाळू लागले; पण भानुमती काही त्यांचा पिच्छा सोडेना. आता तिच्या पत्रांची भाषा बदलली. एखाद्या विरहिणीप्रमाणे ती पत्रातून शाहिरांची आर्जवे करू लागली आणि शाहिरही थोडे पाघळू लागले. मग दोघांचा निरंतर पत्रव्यवहार सुरू झाला. या काळात एकदाही दोघे एकमेकांना भेटले नाहीत, पण शाहिरांनी तिला आपली कौटुंबिक पार्श्वभूमी आणि आर्थिक परिस्थिती स्पष्टपणे सांगितली होती. भानुमती कोणत्याही परिस्थितीत शाहिरांची अर्धांगिनी बनायला तयार होती.


पत्रापत्री सुरू असणारी ही प्रेमकहाणी लवकर काही वेगळं वळण घेईल अशी अटकळ शाहिरांनी बांधली नव्हती. ते कार्यक्रम करण्यात व्यग्र होते; पण एके दिवशी 'मला तातडीने फलटणला भेटायला या' असं भानुमतीचं पत्र हातात पडताच ते चक्रावलेच. इतकं तातडीचं काय काम असेल? हा विचार करतच ते फलटणला जाऊन पोहोचले. ठरल्या ठिकाणी ते भानुमतीला भेटायला पोहोचले, तर भानुमती आपली मैत्रीण लीलासह तिथे उभी होती, हातात कपड्यांनी भरलेली पिशवी घेऊनच.

भेट होताच मला आत्ताच्या आत्ता इथून घेऊन जा असा लकडाच तिने लावला. अशी काही परिस्थिती ओढवेल अशी कल्पनाही शाहिरांनी केली नव्हती. ते गडबडूनच गेले. आता काय करावं? 'नाही' म्हणावं तर एका मुलीच्या नजरेत आपण पळपुटे ठरू आणि 'हो' म्हणायचं तर हे शिवधनुष्य पेलायचं कसं? अशा द्विधा मनःस्थितीत पोहोचलेल्या शाहिरांना त्यांच्यासोबत आलेल्या वसंत सोनार या मित्राने धीर दिला. धाडस बांधलं आणि यंत्रवत शाहीर भानुमतीला सोबत न्यायला तयार झाले. तिथून सुरू झालेला खडतर प्रवास वर्णनातीत होता. भानुमती सुखवस्तू आयुष्यातून एका वेगळ्याच जगात जायला

सज्ज झाली होती; पण शाहीर मात्र आपण तिची फसवणूक तर करत नाही ना या काळजीत पडले होते. पण फलटण ते पसरणी इतका प्रवास तरी सुखासुखी होणार होता का?

फलटणला प्रेमात पडल्यानंतर पहिल्यांदाच भेटलेल्या आणि पत्रव्यवहारापुरतीच ओळख असणाऱ्या एका तशा अनोळखी मुलीला डायरेक्ट पळवून नेणं शाहिरांसाठी जडच होतं. कारण ते भानुमतीच्या आवडी निवडी काहीच जाणत नव्हते. आपल्या घरची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती ते जाणून होते त्यामुळे हे प्रकरण आपण कसं हाताळणार हे काही त्यांच्या डोक्यात शिरत नव्हतं; पण आता उचललेलं पाऊल मागे घेणं शक्य नव्हतं. भानुमतीला घेऊन ते आपला मित्र वसंत सोनारसह एस.टी. स्टॅण्डवर आले. फलटण-वाई गाडी लागेपर्यंत ते आणि भानुमती अनोळखी बनून तिथे उभे राहिले. गाडी लागताच भानुमती पुढे जाऊन बसली आणि शाहीर आपल्या मित्रासहित मागे बसले. गाडी सुरू होऊन थोडीच पुढे गेली असेल तोच कंडक्टर तिकिटं फाडत भानुमतीजवळ आला. दुर्दैवाने तो फलटणचाच होता आणि त्याने डॉ. बारसोडेंच्या मुलीला पटकन ओळखलं. तिच्या हातातली कपड्यांची पिशवी पाहून आणि तिची भेदरलेली मुद्रा बघून त्याने उलटतपासणी करायला सुरुवात केली. भानुमती पूर्ण हादरून गेली. तिच्या उडवाउडवीच्या उत्तरांनी तर कंडक्टरचा संशय आणखीनच बळावला. आता काय करावं? मागे वळून शाहिरांकडे पाहावं तरी पंचाईत होती नव्हे ती वाढणारच होती. पटकन् आपल्या जागेवरून ती उठली आणि सरळ एस.टी.तून खाली उतरली. तिला उतरलेलं बघून थोड्या वेळाने शाहिरही मित्रासह खाली उतरले आणि चालत मागे भानुमतीजवळ आले. आता चांगलाच अंधार पडू लागला होता. पुढे काय करायचं? आता मागे वळणं भानुमतीला शक्यच नव्हतं. वडिलांचा रागीट स्वभाव तिला माहीत होता. वाईकडे जाणारा रस्ता पकडून तिघांनीही निमूट चालायला सुरुवात केली. पूर्वी इतक्या गाड्या रस्त्याने धावत नसत की कुणाकडे लिफ्ट मागावी. मग बरंच चालत आणि काही अंतरापर्यंत जाणारी एस.टी. पकडत त्यांचा प्रवास सुरू झाला.

वाई यायला थोडा वेळ होता आणि रस्त्याने चालताना मागून एक बैलगाडी येताना दिसली. शाहिरांनी अजिजी करून त्या गाडीवानाला वाईजवळ सोडायची विनंती केली. ती त्याने मान्य करताच तिघेही बैलगाडीत बसले आणि थोड्याच वेळात तिघांचाही खोकून खोकून जीव जायची पाळी आली. ती बैलगाडी सुक्या मिरच्यांची पोती पोहोच करून परतीच्या प्रवासाला निघाली होती. खाली अंथरलेल्या पोत्यांवर पडलेल्या मिरच्या अंधारात कुणालाच दिसल्या नव्हत्या. अंगाचीही आग आग होऊ लागली. प्रवास असा होताच तिघांनीही ती गाडी सोडली. जवळच्याच शेतात जाऊन पाटाच्या पाण्यात हातपाय तोंड धुऊन घेतलं. भानुमती फारच हवालदिल झाली होती. शाहिरांशी लग्न करण्याआधीच तिला पुढच्या खडतर प्रवासाचा मासला मिळाला होता. कसं बसं चालत ते वाईत येऊन थडकले. आता पुढे काय? लग्न करणं म्हणजे खाऊ नव्हता. त्यात आंतरजातीय विवाह, तो करणार कसा? त्यात दोन दिवसांवर आलेली पसरणीची जत्रा शाहिरांना आठवली. तिथे त्यांचा कार्यक्रमही होता. आता काय करावं? कुणाची मदत घ्यावी? अचानक शाहिरांना वाईतल्याच पुढारलेल्या जेजुरीकर नावाच्या समाजसुधारकांचं नाव आठवलं आणि त्यांची पावलं भल्या पहाटे जेजुरीकरांच्या घराकडे वळली. त्यांना झोपेतून उठवून शाहिरांनी आपली सगळी अडचण त्यांना सांगितली. जेजुरीकर पुढारलेले नक्कीच होते; पण हे सगळं झटपट होणं गरजेचं होतं. मुलीच्या घरी बातमी फुटण्याआधी लग्न होणं गरजेचं होतं, पण कसं? आणि अचानक त्यांना एक कल्पना सुचली. भर जत्रेतच शाहिरांचं भानुमतीबरोबर लग्न लावायची. तेच जास्त सोयीचं होणार होतं. जनतेसमोर लग्नही होईल आणि गावातच ते होत असल्यामुळे ऐन जत्रेत कुणी बाहेरचं येऊन गोंधळही घालणार नाही हा त्यांचा साधा फंडा होता. नाइलाज झालेल्या शाहिरांना सगळंच मान्य करावं लागत होतं. हात अगदी दगडाखालीच अडकले



होते आणि जेजुरीकर हाच एकमेव आधार दिसत होता. आता नवीन प्रश्न होता तोवर भानुमतीला कुठे ठेवायचं? ही जबाबदारी वसंत सोनारने आपल्या शिरावर घेतली. जत्रेला आलेली पाहुणी म्हणून तो भानुमतीला आपल्या घरी ठेवायला तयार झाला. एकेक प्रश्न मार्गी लावत तिघांनीही पसरणीत पाऊल टाकलं, तेव्हा चांगलंच उजाडलं होतं. एकमेकांशी काही काळासाठी फारकत घेऊन शाहीर आणि भानुमती वेगवेगळ्या मार्गाने पसरणीत शिरले होते. पुढे काय आणि कसं करायचं हे ठरवायलाही ते एकमेकांना भेटणार नव्हते. गाव जत्रेच्या तयारीला लागला होता आणि त्याच जत्रेत आपल्या भविष्याची गाठ बांधू इच्छिणारे दोन जीव मात्र द्विधा मन:स्थितीत होते.

भानुमती वसंत सोनार यांच्या घरी गेली. 'मित्राची भन हाय. जत्रा बघाय आलीय' म्हणत त्यांनी घरच्यांच्या प्रश्नांचे निरसन करायचा प्रयत्न केला. बया येवडी गोरीगोमटी, नाजूक पोरगी याच्या कंच्या मैतराची भन असंल? हा प्रश्न तरीही त्यांचा मेंदू कुरतडत असणारच; पण पाहुणीला त्यांनी घरात सामावून घेतलं. इकडे शाहीर घरी पोहोचल्यावर काही घडलंच नाही हा मुखवटा चेहऱ्यावर चढवून वावरत होते. मनात असंख्य विचार उसळून येत होते. आपण जे करतोय त्याचा परिणाम पुढे काय होईल ही धाकधूक त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. भानुमतीचा चेहरा सतत त्यांच्या नजरेसमोर येत होता. ती पुढे हे सगळं कसं झेपवू शकेल? जत्रा असल्यामुळे घरी पाहुण्यांचीही वर्दळ होती. दूरदूरचे नातलगही आले होते. उद्या जे होईल त्याचा डंका पंचक्रोशीत वाजणार आहे हे त्यांना पक्कं ठाऊक होतं. जत्रेचा दिवस उजाडला. ग्रामदैवत भैरवनाथाची जत्रा. नाथसाहेबाची जत्रा. भल्या पहाटे गावातल्या सगळ्या घरांसारखीच साबळ्यांच्या घरातही लगबग सुरू झाली होती. शक्य तितका निर्विकार चेहरा ठेवून शाहिरांनी सकाळची आन्हिकं उरकली. भानुमतीला आपल्या गावात शिरल्यापासून परिस्थितीशी मिळतेजुळते व्हायला किती तडजोड करावी लागत असेल या विचाराने ते अस्वस्थ होते. इकडे भानुमतीची अवस्थाही काही वेगळी नव्हती. ज्या माणसावर भरवसा ठेवून तिने सुखाचं घर सोडलं होतं, तो पुढे आपलं काय करेल? पुढे उभं आयुष्य याच गावात याच परिस्थितीत आपण घालवायचंय का? आपलं शिक्षण, आपली कवयित्री बनायची सगळी स्वप्नं पुढे याच मातीत दफन होतील का? अशा अनेक प्रश्नांनी ती क्षणाक्षणाला घायाळ होत होती.

दिवस चांगलाच उजळला आणि जत्रेला रंग भरू लागला. पुरुषमाणसं घराबाहेर पडून जत्रेत मिसळून गेली. बायाबापड्यांनी चुलीसमोर बैठक मारून पुरणाच्या पोळ्यांचा घाट घातला. शाहीर ठरलेल्या वेळेला आपल्या साथीदारांसह चावडीत जमले. इकडे वसंत सोनाराने भानुमतीसाठी त्या गडबडीतही वाईहून नवी साडी आणली होती. जत्रेला आलेल्या पाहुणीला नवी साडी आणल्याचं कुणाला फारसं नवल वाटलं नाही. ढोलाच्या तालावर छबीना निघाला. बगाड फिरवून झालं. अवघी पसरणी गुलालाच्या रंगात न्हाऊन निघाली. कुस्त्यांचे फड एकीकडे रंगू लागले. तिकडे पैलवानीच्या शौकिनांनी धाव घेतली आणि इकडे चावडीवर शाहिरांचा कार्यक्रम सुरू झाला. त्यांचे चाहते तिथे जमा झाले. एक टेन्शन डोक्यावर घेऊन यंत्रवत कार्यक्रम सुरू असतानाच जेजुरीकर लग्नासाठी आवश्यक सामान घेऊन तिथे येऊन पोहोचले आणि शाहिरांच्या जिवात जीव आला. जेजुरीकरांनाही सगळा गाव मानाने ओळखत होताच, वसंत सोनार अधूनमधून येऊन परिस्थिती बघून जात होतेच. जेजुरीकर येऊन पोहोचताच पाहुणीला जत्रा दावायला नेतो म्हणत त्यांनी भानुमतीला घराबाहेर काढलं. भानुमती चावडीवर येऊन पोचताच जेजुरीकरांनी शाहिरांचा कार्यक्रम थांबवून माईक ताब्यात घेतला.

आता हे काय तरी देशाच्या भक्तीचं सांगत्याल, असा मनाशी कयास बांधलेल्या गावकऱ्यांना ते म्हणाले, 'आता तुम्ही शाहीर किसन साबळ्यांचा कार्यक्रम ऐकताय; पण आज तुमच्या गावाच्या या गुणी शाहिराचं तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादाने आणि ग्रामदैवत भैरवनाथाच्या कृपेने इथेच लग्न लावण्यात येणार आहे.'

आपण काय ऐकलंय हे जमलेल्या लोकांच्या लक्षात येईपर्यंत जेजुरीकरांनी लग्नाची तयारी सुरू केलीसुद्धा. भानुमतीही तिथे येऊन पोहोचली आणि खरच शाहिरांचं लग्न लागतंय हे बघून लोक हैराण झाले. गावभर वाऱ्यासारखी बातमी पसरली.

शाहिरांचे वडील भैरवनाथाचं दर्शन घेऊन चावडीकडे यायला निघालेले, त्यांना अडवून एकजण म्हणाला, साबळे हीतं काय करताय? तिकडे चावडीत तुमच्या लेकाचं लगीन लागतंय... हादरलेल्या गणपतरावांनी चालण्याचा वेग वाढवला. इकडे चुलीपुढे बसून पोळ्या करण्यात रमलेल्या लक्ष्मीबाईंना एक बाई ओरडत सांगायला आली, 'लक्ष्मे, पोळ्या टाक तिथंच, तुझा किस्ना चावडीत लगीन करतोय म्हनं.' लक्ष्मीबाई पोळ्यांचा हात तसाच लुगड्याला पुसत तकाट पळत सुटली. चावडीवर नवरा नवरीला मुंडावळ्या बांधल्या होत्या. आंतरपाट धरायला शाहिरांचे साथीदार उभे होते. कुणीतरी अक्षता वाटत गर्दीतनं फिरत होतं. लक्ष्मीबाई तिथं पोहोचली, तेव्हा तिच्याही हातावर अक्षता ठेवल्या गेल्या. गणपतराव दुरून अविश्वासाने हे सगळं बघत होते. आपल्या लेकानं पोरगी पळवून आणलीय आणि ती बी बामनाची हे आजुबाजूच्या कुजबुजीतून त्यांना समजलं होतं. दैवाला दोष देत ते संयम पाळून उभे होते. त्यांच्या थोरल्या लेकाचं लग्न, वऱ्हाडी नाही, सगेसोयरे नाहीत, मानपान नाही, वाजंत्री नाहीत, रुसवे-फुगवे नाहीत अशा अवस्थेत समोर लागत होतं. जेजुरीकर मंगलाष्टका म्हणत होते आणि सावधान या शब्दावर लोक अक्षता उधळत होते. लक्ष्मीबाई आणि गणपतरावही त्या गर्दीचा एक भाग बनून तेच करत होते आणि एकदाचं लग्न संपन्न झालं. हार घालून, मंगळसूत्र बांधून भानुमती सर्वसाक्षीने शाहिरांची पत्नी झाली. पसरणीच्या ऐन जत्रेत आज समाजाच्या ठरलेल्या, ठरवलेल्या रीतीरिवाजांना ठोकर मारून पहिला आंतरजातीय विवाह झाला होता. लोक चर्चा करत घरोघरी पांगायला लागले होते. गर्दी ओसरताना शाहिरांसमोर त्यांचे आई, वडील येऊन उभे राहिले.

'सुनबाईला घेऊन घरला ये' इतकंच म्हणून गणपतराव माघारी वळले. वडिलांच्या त्या एका वाक्याने शाहिरांच्या

डोक्यावरचं मणाचं ओझं खाली उतरलं. आपली ही अवस्था आहे, तर आपल्या कुटुंबापासून कित्येक मैल दूर असलेल्या भानुमतीच्या मनाची काय अवस्था असेल याची ते कल्पना करू शकत होते. तिला आता कधीही पश्चाताप वाटेल अशी आपणच तिच्यावर पाळी येऊ द्यायची नाही असा त्यांनी मनोमन निश्चय केला आणि ते भानुमतीसह आपल्या घराकडे निघाले.

साबळ्यांच्या घराला आता जत्रेचं कमी आणि लग्नघराचं स्वरूप आलेलं. नवी सून ध्यानीमनी नसताना अचानक आज माप ओलांडून घरात येणार होती. गणपतरावांनी सर्व कुटुंबाला हासत सुनेचं स्वागत करायची तंबी देऊन ठेवली होती. लक्ष्मीबाईने मापटं भरून उंबऱ्याशी ठेवलेलं होतं. आपला लवाजमा घेऊन भानुमतीसह शाहीर घरी पोहोचले. फलटणच्या चौसोपी वाड्यातली भानुमती पसरणीच्या चंद्रमौळी घरासमोर येऊन उभी राहिली. तिने माप ओलांडून गृहप्रवेश केला आणि गणपतरावांनी तिच्यासमोर त्यांच्याजवळ असणारी ज्ञानेश्वरी धरली. 'माझ्यापाशी तुला देण्यासारखा येवढाच ऐवज हाय... हे आता तूच पुढे चालव' असं म्हणत त्यांनी ज्ञानेश्वरी भानुमतीच्या हातावर ठेवली. (कालांतराने बऱ्याच वर्षानंतर ती आईने माझ्या हातात दिली) आणि नवपरिणित जोडप्याने घरात पाय ठेवला.

भानुमतीचा गृहप्रवेश झाला खरा; पण आजुबाजूला एक शाहीर सोडून सगळेच अनोळखी चेहरे! बरं त्या गावरान बायकांचं साधं बोलणंही इतकं ठसक्यात होतं की त्यांच्याशी संवाद साधायचा कसा? बरं भानुमतीसोबत कुणी पाठराखीणही नाही की जिच्याजवळ मन मोकळं करावं. दिवसभर शाहीर काही स्वतंत्र भेटण्याची शक्यताच दिसेना. समोरासमोर आलेच तर नजरेने जितकं बोलणं होई तितकंच. ती भाषा समजण्याइतकी तरी दोघांची घनिष्ठ ओळख होतीच कुठे? शाहिरांना तिची ही घुसमट समजत होती. नाही म्हटलं तरी ते काही सुशिक्षित लोकांमध्ये वावरलेले होते. त्यांच्या कार्यक्रमामुळे झालेल्या काही ब्राह्मण मित्रांच्या घरातलं राहणीमान त्यांनी जवळून पाहिलं होतं. त्यामुळे त्या परिस्थितीत भानुमतीच्या मनातली घालमेल ते समजू शकत होते. अशा द्विधा मनःस्थितीतच रात्र झाली. त्या छोट्याशा घरात जत्रेमुळे पै पाहुण्यांची रेलचेल होती. त्यामुळे भानुमती महिलांच्या गराड्यात आणि शाहीर पुरुषांच्या गराड्यात अंथरुणावर पडले खरे; पण दोघांच्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं. भानुमती



मनातल्या मनात स्वतःला बजावत होती, आता इथेच राहायचंय. आपण आपलं शिक्षण, आपल्यावरचे उच्च संस्कार झटकून टाकायला शिकायला हवं आपल्याला. आपल्या कवितांना आता कधी वर येऊ द्यायचं नाही. जमेल तसं शिकू हळूहळू ती मनात असे विचार करून मनाला समजावत असतानाच शाहीर मात्र वेगळेच विचार करत होते. भानुमतीचं शिक्षण आपण अर्धवट ठेवायचं नाही. आपण शिकलो नाही; पण तिला मात्र शिकू द्यायचं. आता त्यासाठी इथे राहून चालणार नाही. तिला घेऊन घर सोडायचं. तिचे पंख छाटण्याचा आपल्याला काय अधिकार? घर सोडताना गोंधळ होईल, पण आपण कुटुंबाला वाऱ्यावर सोडायचं नाही. तसेही आपण घरी असतोच कितीसे? पण भानुमतीला पश्चाताप होईल अस कधी वागायचं नाही. आपल्या विश्वासावर ती घर सोडून आलीय. असे काहीबाही विचार करतच त्या दोघांचाही डोळा कधीतरी लागला.

दुसरा दिवस उजाडला तोच मुळी एक अघटित संकट घेऊनच. साबळ्यांच्या दारात सकाळीच वाईचे फौजदार आपल्या लव्याजम्यासोबत हजर झाले होते आणि सोबत होते भानुमतीचे वडील डॉक्टर बारसोडे. त्यांनी वाईत माझ्या तरुण मुलीला एका मराठा मुलानं फूस लावून पळवून आणलंय अशी फिर्याद दाखल केली होती. मुलीला पळवून आणणं हा फौजदारी गुन्हा होता. त्यामुळे शाहिरांना अटक करायलाच सगळा फौजफाटा जमला होता. सगळा गाव साबळ्यांच्या दारात जमला होता. अब्रुला डाग लागू नये म्हणून कायम नमतं घेत जगणारे गणपतराव हादरून गेले होते. शाहीर त्यांच्यावरचा आरोप ऐकून गलितगात्र झाले होते. या क्षणी भानुमतीने जर साथ दिली नाही, तर आपली अटक नक्की आहे हे त्यांनी ओळखलं होतं.

भानुमतीही या अवचित प्रकाराने गांगरून गेलेली. आपल्या वडिलांचा राग ती जाणून होती आणि डॉक्टर आपल्या लेकीला त्या अशिक्षितांच्या गराड्यात बघून चवताळले होते.

शाहिरांना शिव्याशाप देत त्यांच्या तोंडाचा पट्टा चालूच होता.

एका क्षणात त्यांनी आपल्या हातातली दोनळी बंदूक शाहिरांवर रोखली आणि इतका वेळ भीतीने थरथरत असणाऱ्या भानुमतीला कुठून अवसान आलं कोण जाणे, ती झपाट्याने शाहिरांच्या पुढ्यात येऊन उभी राहून कडाडली, 'खबरदार दादा त्यांना इजा केलीत तर! त्यांनी मला पळवलेलं नाही, तर मी स्वतः पळून आलेय आणि माझ्या मर्जीने त्यांच्याशी लग्न केलंय.' तिचे हे शब्द ऐकताच डॉक्टरांसहित फौजदारांचंही अवसान गळालं.

पोरगी स्वतः मर्जीने आलीय म्हणतेय तर आपण काहीच ॲक्शन घेऊ शकणार नाही, असं त्यांनी डॉक्टरांना स्पष्टच सांगितलं. इतका वेळ पोरगी पळवून आणली म्हणत भडकलेले भानुमतीचे वडील आता पोरगीच फिरल्याने आणखीनच संतापले. भानुमतीकडे तिरस्काराने पाहात तुझा संसार कधीच सुखाचा होणार नाही म्हणत ते तिथून निघून गेले. झाल्या प्रकाराने अवघं साबळे कुटुंब धास्तावून गेलेलं.

गणपतराव या धक्क्यातून थोडेफार सावरले आणि त्यांनी स्वतःच शाहिरांना आपल्या बायकोला घेऊन स्वतंत्र राहण्याचा सल्ला दिला. शाहिरांसाठी तर हे 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन' असंच झालं होतं. बायकोला साताऱ्यात नेऊन तिथेच राहण्याचा त्यांचा विचार चाललाच होता. पसरणीतल्या कुटुंबाकडेही लक्ष ठेवता येईल आणि बायकोचं पुढचं शिक्षणही पूर्ण करता येईल, हे दोन्ही उद्देश त्या मागे होते. सातारला मित्रांची फौजही होती. त्यात काही सुधारणावादी ब्राह्मणही होते आणि त्यांची मदतच होणार होती. वडिलांची आज्ञा प्रमाण मानून शाहीर दोन दिवसानंतर घरातले पै पाहुणे आपापल्या घरी गेल्यावर आधी एकटेच सातारला निघून गेले. तिथे राहण्याची व्यवस्था आणि भानुमतीच्या पुढील शिक्षणाची तजवीज त्यांना करायची होती, त्याशिवाय भानुमतीला सोबत फिरवण्यात काहीच अर्थ नव्हता.

काहीच दिवसात साताऱ्यात शाहिरांना भाड्याचंच; पण एक छानसं घर मिळालं आणि दोघांनी तिथे आपला संसार थाटला. भानुमतीला पुढचं शिक्षण देण्याचं त्यांनी पक्कं ठरवलं होतं. त्यामुळे भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेत भानुमतीने प्रवेश घेतला. साताराही तसं पुढारलेलं शहर. राजकीय दृष्टीने सतत तापलेलंच. नाना पाटलांसारखे खंदे वीर त्याकाळी इंग्रज राजवटीला धडका देत होते. शाहीर नाना पाटलांसहित तिथल्या वेगवेगळ्या स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या लोकांच्या जवळून संपर्कात येत होते. पाचगणीचे भिलारे गुरुजी, कराडचे यशवंतराव चव्हाण हे त्यात प्रामुख्याने होते. भानुमतीचं शिक्षण सुरू होतं आणि शाहीर कार्यक्रम करत भटकत होते. त्या एकटेपणात भानुमतीला साथ दिली ती साताऱ्यातल्या एका कुलकर्णी या ब्राह्मण कुटुंबाने.

ज्या घरात शाहीर राहत होते त्या घराला एक हवेशीर माडी होती आणि त्या काळात साताऱ्यात येणाऱ्या बऱ्याच गायक, वक्ते, लेखक, कवी वगैरेंचा राबता तिथे असायचा. भावनिक आणि वैचारिक दृष्टीने समृद्ध होण्याचा तो काळ होता. शाहिरांची बोलीभाषा बदलण्याचा भानुमती प्रयत्न करत होती आणि भानुमतीमध्ये असणाऱ्या काव्यप्रतिभेला चालना देण्याचं काम शाहीर करत होते. दोघेही एकमेकांमध्ये असणारे कंगोरे आताशी कुठे ओळखू लागले होते. जेवण अजिबात बनवता न येणं हा भानुमतीत असलेला दोष पुढे कायम टिकून राहिला. त्यामुळे नॉनव्हेजपासून कोसो दूर जाऊन शाहिरांची घरी असलेच तर नेहमीची गुजराण ही वरण, भात आणि बटाट्याची भाजी यावरच होऊ लागली.

खरं म्हणजे भानुमतीत एक उत्तम कवयित्री दडली होती आणि ती लोकांपर्यंत पोहोचावी हा तिचा अट्टाहास होता. शाहिरांच्या ओळखी भरपूर असल्या, तरी तिने आपल्या कर्तृत्त्वावर पुढे यावं असं त्यांना वाटत होतं. पुढे पुढे करून काम मागणं हे त्यांनी स्वतः कधी केलं नव्हतं त्यामुळे आपल्या बायकोसाठी ते करणं त्यांना शक्यच नव्हतं, तरीही तिथे होणाऱ्या कविसंमेलनांसाठी ते भानुमतीचं नाव सुचवू लागले.

एकंदरीत दोन वेगवेगळ्या गाड्यांसाठी बनवलेली चाके एका गाडीला लावली होती आणि त्यावर दोघांचाही संसार तसा डगमगतच सुरू झाला होता. साने गुरुजींच्या सान्निध्यात राहून शाहीर फारच भावुक

होते, तर भानुमती उपजतच व्यवहारी होती; पण आपल्यासारख्या येड्या गबाळ्या माणसाशी अशा सुंदर, बुद्धिमान मुलीने लग्न करण्याचं धाडस दाखवलंय या भावनेत शाहीर कायम गुंतून पडले. सातारा आता हळूहळू दोघांनाही मानवायला लागलं होतं. भानुमतीचं शिक्षण सुरू होतं. तिलाही डॉक्टर बनवण्याचा चंग शाहिरांनी बांधला होता. त्यासाठी पुढे तिला मुंबईलासुद्धा न्यायची त्यांची तयारी होती. ती खरंच खूप हुशार होती आणि त्यामुळेच त्या दोघांचाही भाऊराव पाटील आणि त्यांच्या कुटुंबाशीही घनिष्ठ संबंध आला. कालांतराने तर ते भाऊरावांचे शेजारीच झाले. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेचं काम कसं चालतं तेही त्यांना जवळून पाहता आलं. हा तोच काळ होता जेव्हा आपल्या संस्थेतील मुलांना जेवण मिळावं म्हणून भाऊरावांच्या पत्नीने आपलं मंगळसूत्र देऊन टाकलं होतं. या सगळ्या गोष्टी जवळून पाहिल्यामुळे प्रभावित होऊन भानुमतीने आपल्या आयुष्यातला पहिला पोवाडा भाऊरावांवर लिहिला आणि तो शाहिरांनी भाऊरावांसमक्ष गाऊन दाखवला. आपलं जीवनचरित्र प्रत्यक्ष ऐकताना त्यांना आपले अश्रू अनावर झाले. ही भानुमतीसाठी फार मोठी पोचपावती होती आणि इथेच शाहीर आणि भानुमती हे एकत्रितपणे कसं काम करू शकतील याची मुहूर्तमेढही रोवली गेली. भानुमतीलाही आता मार्ग सापडला होता; पण या मार्गात अचानक एक अडसर उभा राहिला. भानुमतीला आपण आई होणार आहोत याची चाहूल लागली. तिची मन:स्थिती द्विधा झाली. शिक्षण आणि संसार हीच तारेवरची कसरत तिला झेपत नव्हती. त्यात आता मूल होणार म्हटल्यावर आपण आता पूर्णच गुंतून पडणार याने तिचा नाही म्हटलं तरी हिरमोड झाला. शाहीर आणि भानुमतीचं लग्न, साताऱ्यातला संसार, भानुमतीचं शिक्षण, पहिल्या मुलाचा जन्म या सर्व कालावधीत देशाला स्वातंत्र्य मिळून दोन तीन वर्षे झालेली होती. इतके दिवस आपल्या कार्यक्रमातून जनजागृती करणाऱ्या सर्वच कलावंतांपुढे एकच प्रश्न होता तो म्हणजे पुढे करायचं काय? पोट भरण्यासाठी काहीतरी करणं गरजेचंच होतं आणि ते आता खेड्यात मिळणं अशक्य होतं. मग सातारा सोडून शाहीर भानुमतीसह परत पसरणीत आले. मोठ्या मुलाच्या जन्माला दोन वर्ष उलटली होती आणि भानुमती परत गरोदर होती आणि शाहीर मुंबईत कामानिमित्त जात येत असल्यामुळे त्या परिस्थितीत भानुमतीची काळजी कुणीतरी घ्यायला हवी म्हणून पसरणीत तिला ठेवून शाहीर मुंबईला रवाना झाले. इकडे शाहिरांचं कुटुंब आणि भानुमती यांचा ताळमेळ काही जुळता जुळेना. तोवर शाहिरांच्या वडिलांचंही निधन झालं होतं. कुटुंबातल्या सगळ्याच महिला कष्टकरी आणि भानुमतीचा आणि कष्टांचा दुरूनही संबंध नव्हता आणि तो नसणं स्वाभाविकच होतं; पण एवढे भावनाशील विचार त्या बायांच्या डोक्यात कुठून येणार? सतत त्यांचे आणि भानुमतीचे खटके उडू लागले. आपल्या या परिस्थितीत शाहिरांनी तरी इथे राहावं किंवा आपल्याला तरी मुंबईला न्यावं असा तिचा आग्रह होता, पण ते शक्य नव्हतं. मुंबईत शाहीर नव्याने आपलं बस्तान बसवण्यात गुंतले होते. त्याकाळी भारतीयांच्या हातात आलेल्या एच.एम.व्ही.या रेकॉर्डिंग कंपनीतर्फे प्रादेशिक गाण्यांचे रेकॉर्डिंग होत होतं आणि तिथे वर्णी लावायला शाहीर झटत होते कारण आता लोकांपर्यंत पोहोचण्याचं रेकॉर्ड आणि रेडिओ हेच प्रभावी माध्यम होतं. या सगळ्या खटपटींना यश येऊन शाहिरांची काही गाणी आणि पोवाडे रेकॉर्ड्सुद्धा झाले होते.



गावी भानुमतीचं जगणं असह्यच होतं. रोज वरण, भात, तूप खाणाऱ्या तिला आता भाकरी आणि असेल ते कोरड्यास खावंच लागत होतं. जेवणाचे अतिरिक्त लाड करणं त्यांनाही जमण्यासारखं नव्हतं आणि कुठेतरी आपल्या मनासारखी सून मिळाली नाही, वर मुलगाही तसा आपल्यापासून दुरावला, ही सल असणं स्वाभाविक होतं. पण दोन्हीकडून थोडी समजदारी त्यावेळी दाखवली जायला हवी होती. कारण या सगळ्या कुटुंबकलहाचे रट्टे पुढे जाऊन एकट्या शाहिरांना भोगावे लागले. जवळपास असे सात-आठ महिने शाहीर येऊन जाऊन असले तरी कुटुंबापासून दूरच होते आणि त्यातच भानुमतीने एका मुलीला जन्म दिला. लक्ष्मीची पावलं घरात पडली आणि शाहिरांच्या आयुष्याला वेगळं वळण मिळालं. थोरल्या देवदत्तच्या पाठीवर झालेल्या मुलीचं नाव यशोधरा ठेवल गेलं. जणू ती खरंच शाहिरांचं यश धरून ठेवण्यासाठी जन्मली होती. शाहिरांच्या रेकॉर्ड्सना, पर्यायी त्यांच्या आवाजाला पसंती मिळू लागली. पूर्वी एच.एम.व्ही.तर्फे दरवेळी कुठल्या गायकाच्या रेकॉर्ड्सचा खप किती झाला याची पुस्तिका निघत असे,



त्यात शाहिरांचाही सामावेश झाला आणि शाहिरांनी पुढच्या करिअरसाठी सहकुटुंब मुंबईत स्थायिक होण्याचा निर्णय घेतला.

त्याकाळी मुंबईत चाळीत सहज भाड्याने जागा मिळत असत. लालबाग, परळ हा कामगारांचा विभाग होता. घाटावरचे आणि कोकणातलेही कामगार डिलाईल रोड इथे एकत्र गुण्यागोविंदाने नांदत असत. डिलाईल रोड इथल्याच वाण्याच्या चाळीत शाहिरांनी एक खोली भाड्याने घेतली. आणि ते सहकुटुंब मुंबईत आले. भानुमतीसाठी तर हे फारच चांगलं झालं होतं. पुण्या-मुंबईतील कित्येक प्रतिभावान कवींची नावं ती ऐकून होती. त्यांच्या कवितांची पारायणं तिने केली होती. आता तिला वेध लागले होते त्या कवींच्या पंक्तीत बसण्याचे. इकडे शाहीर नव्याने परत आपलं कलापथक मुंबईतील कलाकार घेऊन बांधण्याच्या कामी लागले होते. वादक, कोरस असा सर्व गोतावळा त्यांना शोधायचा होता आणि काही हिरे त्यांच्या हाताला लागलेही होते. अण्णा जोशी हे तबला आणि ढोलकी वादक फारच तरबेज होते (पुढे ते हिंदी चित्रपटसंगीत वादकांमध्ये गेले. सरगम चित्रपटातल्या 'डफलीवाले डफली बजा' या गीतातला डफ त्यांनीच वाजवलाय.) बाळ चिटणीस हे हार्मोनिअम वादक मिळाले. (बाळ चिटणीस यांच्या वादनाचं कौतुक खुद्द पु. ल. देशपांडेंनी केलं होतं.) काही झीलकरीही मिळाले. शाहीर त्या काळी स्वतः गळ्यात ढोलकी अडकवून ती वाजवत गाणी म्हणत असत. गाण्याच्या कार्यक्रमांना मागणीही येत होती; पण वेगळं काहीतरी करण्याची जबरदस्त इच्छा त्यांना आतून अस्वस्थ करत होती आणि त्यासाठी ते अशा जोडीदाराच्या शोधात होते, जो त्यांच्या इच्छित कार्यक्रमात योग्य सहकार्य करेल आणि असा जोडीदार त्यांना लाभला ते राहत असलेल्या डिलाईलरोडच्या वाण्याच्या चाळीतच.

देशाला स्वातंत्र्य मिळालं होतं, त्यानंतर घडलेल्या सर्व घडामोडी शाहीर जवळून पाहात होते. हैद्राबाद मुक्तिसंग्रामात ते स्वतः सक्रिय होते. संस्थानं खालसा होऊन लोकशाहीप्रणित सरकार स्थापन झालं होतं. पण ते होताना सामान्य जनतेने आपल्यावर राज्य करायला परत खालसा झालेले संस्थानिकच परत आपले नेते म्हणून निवडून आणले होते. रक्तातली वर्षानुवर्ष रूजलेली गुलामी काही सोडायला जनता तयार नव्हती. या सर्व चित्रामुळे शाहीर कमालीचे कष्टी झाले होते. या सगळ्याला वाचा फोडायची असेल तर नुसते गाण्याचे कार्यक्रम करून भागणार नव्हतं. त्यासाठी हसत, हसवत जनतेच्या डोळ्यात चरचरीत अंजन घालणं गरजेचं

होतं आणि त्यासाठी त्यांना साथ देईल अशा जोडीदाराच्या शोधात शाहीर होते. लोकगीत गायक म्हणून एव्हाना ते सुपरिचित झाले होते. मान्यवर संगीतकारांनीही त्यांच्या आवाजाची दखल घेतली होती; पण आता आपला सादरीकरणाचा ढाचा बदलायला शाहीर आसुसले होते. आत मनात अनेक कल्पना रुंजी घालत होत्या आणि बाहेर पडण्यासाठी त्या धडपडतही होत्या. योग्य सवंगड्याचा त्यांचा शोध शेवटी ते राहत असलेल्या डिलाईल रोडच्या वाण्याच्या चाळीतच संपन्न झाला होता.

वाण्याच्या चाळीत त्या काळी कामगार रंगभूमीशी निगडित असणारे बरेच उभरते कलाकार राहत होते. त्यातल्याच एका किरकोळ शरीरयष्टीच्या हजरजबाबी, गोऱ्यागोमट्या तरुणाने शाहिरांचं लक्ष वेधून घेतलं. कोकणातला असूनही स्वच्छ भाषा आणि शीघ्र विनोदबुद्धी हे त्यांचे अंगभूत गुण होते. एकमेकांशी गप्पा मारताना शाहिरांना त्यांचे आणि आपले विचारही बरेचसे जुळतायत हे लक्षात आलं आणि शाहिरांनी त्यांच्या समोर एकत्र काम करण्याचा प्रस्ताव ठेवतानाच आपल्या पुढच्या योजनेची माहितीही त्याला देऊन टाकली. तोवर शाहीर साबळे हे नाव कामगार विभागात बरचसं लोकप्रिय झालं होतं. त्यामुळे त्या तरुणानेही शाहिरांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आणि पुढे जाऊन विनोदवीर म्हणून गौरव प्राप्त झालेल्या राजा मयेकर यांची साबळे पार्टीत प्रवेश झाला.

शाहिरांनी आपला सादरीकरणाचा ढाचा एकदम बदलून टाकला. ते साल असेल १९५३-५४. कार्यक्रमाची सुरुवात गाण्यांनी व्हायची आणि नंतर एक विनोदी प्रहसन सादर करायचं आणि त्यातून राजकीय, सामाजिक घडामोडींमधल्या दांभिकतेचे बुरखे फाडायचे असं ठरलं. सगळेच जोमाने कामाला लागले. संवादातून ज्या गोष्टी ठसवता येणार नाहीत त्या गाण्यातूनच सांगायच्या हेही ठरलं. गाणी हलकी फुलकी असायला हवी होती.

शाहिरांच्या या नव्या बदलामुळे भानुमतीही उत्साहित झाली होती. यात आपलाही सहभाग असायला हवा असं तिला वाटू लागलं; पण तोवर ती एक भाऊराव पाटलांवरचा पोवाडा सोडल्यास प्रेमकवितांमध्येच गुंतली होती. मध्यंतरी तिच्या हट्टाखातर शाहिरांनी तिने लिहिलेल्या गजानन वाटवे प्रकारातील दोन भावगीतांची रेकॉर्डही आपल्या आवाजात बनवली होती त्यामुळे त्या पठडीच्या बाहेर जाऊन सामाजिक, राजकीय विषमतेवर भाष्य



करण्यासाठी कशी काव्यरचना हवी यासाठी शाहिरांनी जवळपास शिकवणी घेऊन तिला प्रोत्साहित केलं. त्यासाठी त्यांनी तिला हिंदी सिनेमाच्या गाजलेल्या गाण्यांच्या चालीवर विडंबनात्मक गाणी बांधायला सांगितलं. भानुमती प्रतिभावान होतीच तिने ते शिवधनुष्यही लीलया पेललं. उदा. हिंदीतील देख तेरे संसारकी हालत क्या हो गयी भगवान कितना बदल गया इंसान या गीताचा मुखडा उचलून तिने पुढीलप्रमाणे गीतरचना केली..

*देख तेरे संसारकी हालत*
*क्या होगयी भगवान कितना बदल गया इन्सान*
*सूर्य, चंद्र, ग्रहगोल, बिजलीही केली बंदीवान*
*कितना बदल गया इन्सान*
*अणू हायड्रोजन शोध नवे हे*
*शोध कशाचे खेद नवे हे*
*मानव जीवन नष्ट कराया करतो कष्ट महान*
*कितना बदल गया इन्सान.*
*विश्वशांतीची मुखी तुतारी*
*शांतीला हा जीवेच मारी*
*त्या शांतीचे प्रेत उठवण्या आणी बळे अवसान*
*कितना बदल गया इन्सान....*

अशा पद्धतीच्या साध्या सोप्या शब्दरचनेत बांधलेली गाणी लवकरच लोकप्रिय होऊ लागली. शाहीर आणि राजा मयेकर यांची भट्टी तर इतकी छान जुळून आली की, अल्पावधीतच कामगार विभागात राजा कृष्णाची जोडी म्हणून तिने यश संपादन केलं. कोयना स्वयंवर, इंद्राच्या दरबारात दारुड्या, कोड्याची करामत, नशीब फुटके सांधून घ्या, बापाचा बाप अशा प्रहसनांची लडीच त्यांनी लावली. आता शाहिरांचे महिन्याच्या ३० दिवसांत ३५ प्रयोग व्हायला लागले. आर्थिक स्थैर्य येऊ लागलं. याच काळात मुंबईत वसुंधरा आणि चारुशीला या दोन मुलींचा जन्म झाला होता. शाहिरांच्या नावाचा डंका चांगलाच वाजू लागला होता. हिंदीत असलेले मराठी कलावंत शाहिरांचे कार्यक्रम आवर्जून बघू लागले होते. त्यावर चर्चा करू लागले होते. शाहिरांचं नाव सगळीकडेच दुमदुमू लागलं होतं.

(लेखिका शाहीर साबळे यांच्या कन्या आहेत.)

**राज्य मंत्रिमंडळाच्या १०, १९, ३१ ऑक्टोबर आणि ८, १७ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या बैठकीत महिला व बालविकास, जलसंपदा, विधि व न्याय, परिवहन, महसूल, उच्च व तंत्रशिक्षण, वित्त, ऊर्जा, सामाजिक न्याय, वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, कामगार, सामान्य प्रशासन विभाग (साविस), मदत व पुनर्वसन, कौशल्य विकास, इतर मागास बहुजन कल्याण, उद्योग, जलसंपदा, वैद्यकीय शिक्षण, सहकार, पर्यटन, गृह, सार्वजनिक बांधकाम, नियोजन, कृषी, ग्रामविकास आदी विभागांचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...**




# कल्याणकारी निर्णय

## लेक लाडकी योजना

राज्यात मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी योजना' राबवून गरीब कुटुंबातील मुलींना लखपती करण्याचा निर्णय घेण्यात आला. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये, सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये, ११ वीत गेल्यावर ८ हजार रुपये, १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये, अशा रितीने त्या मुलीस एकूण १ लाख १ हजार रुपये एवढा लाभ मिळेल. या संदर्भात अर्थसंकल्पीय भाषणात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती. 'माझी कन्या भाग्यश्री' ही योजना अधिक्रमित करून १ एप्रिल २०२३ पासून जन्मणाऱ्या मुलींसाठी ही योजना राबवण्यात येईल.

## उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी धोरण

सार्वजनिक खासगी भागिदारीतून उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी स्वतंत्र धोरण राबवून मोठ्या प्रमाणावर खासगी गुंतवणुकीला जलविद्युतमध्ये प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यात १० हजार ७५७ मेगावॅट अपारंपरिक ऊर्जा उत्पादन झाले आहे. २०२५ पर्यंत ही ऊर्जा क्षमता २५ हजार मेगावॅटपर्यंत गाठण्याचे उद्दिष्ट आहे. सौर तसेच वाऱ्याच्या वेगाद्वारे निर्माण होणारी ऊर्जा पुरेशी नाही. त्यामुळे अशाश्वत नवीकरणीय ऊर्जा क्षमतेमध्ये तफावत येऊन एकूणच ग्रीडला आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे एनर्जी स्टोरेज सिस्टिमला महत्त्व आहे. यामध्ये अन्य पारंपरिक ऊर्जा प्रकल्पांना एनर्जी स्टोरेज सिस्टिममधून ऊर्जा देऊन ग्रीडचे संतुलन ठेवता येऊ शकते. वीज निर्मितीत खंड पडल्यास अथवा तुडवडा पडल्यास या सिस्टिममधून ऊर्जा उपलब्ध होऊ शकते. केंद्रीय विद्युत मंत्रालयानेदेखील देशात उदंचन जलविद्युत प्रकल्पांना उत्तेजन देण्याचे ठरवले आहे.

## जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालये

सांगली, अहमदनगर जिल्ह्यात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. सांगली जिल्ह्यातील विटा येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करून १९ नियमित पदे व ५ मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली. या नव्या न्यायालयात पलूस, विटा, कडेगाव, आटपाडी या तालुक्यांतील १,९१३ प्रकरणे वर्ग होतील. सध्या विटा येथे २ दिवाणी न्यायालये (वरिष्ठ स्तर) व ३ दिवाणी न्यायालये (कनिष्ठ स्तर) कार्यरत आहेत.



अहमदनगर जिल्ह्यात राहाता येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय सुरू करण्यात येईल. १९ नियमित पदे व ६ मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली. कोपरगाव न्यायालयाकडून या न्यायालयात एकूण १३३६ प्रकरणे वर्ग होणार आहेत.

## नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग



फलटण ते पंढरपूर नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग आता महारेल ऐवजी रेल्वे मंत्रालयातर्फे पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. फलटण ते पंढरपूर हा रेल्वेमार्ग तयार करण्यासाठी महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनीने (महारेल) १८४२ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचा अहवाल तयार केला होता. यामध्ये राज्य शासनाचा सहभाग ९२१ कोटी इतका असून हा निधी टप्प्याटप्याने उपलब्ध करून देण्यात येत आहे. हा प्रकल्प महारेलऐवजी रेल्वे विभागातर्फे राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## भोसला मिलिटरी स्कूलला जमीन

नाशिक येथील भोसला मिलिटरी स्कूलला नागपूर येथे जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. नागपूर येथे मौजा चक्कीखापा

येथील स.क्र. ६४/१, आराजी २१.१९ हे. आर. ही जमीन ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात येईल. भोसला मिलिटरी स्कूल हे नाशिक येथील सेंट्रल हिंदू एज्युकेशन सोसायटीमार्फत चालवण्यात येत असून अतिविशिष्ट गुणवत्ताधारक आणि ख्यातनाम संस्था म्हणून या संस्थेस जागा देण्याचा निर्णय झाला आहे.

## विद्यापीठाच्या नावात बदल



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नावात औरंगाबादऐवजी छत्रपती संभाजीनगर असा बदल करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे या विद्यापीठाचे नाव आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर असे होईल. या विद्यापीठासमोर नमूद जिल्ह्यांच्या सूचीतदेखील औरंगाबादऐवजी छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादऐवजी धाराशिव असा बदल करण्यात येईल.

## पात्र माजी खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी

पात्र माजी खंडकरी शेतकऱ्यांना १ एकरापेक्षा कमी जमीनदेखील वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ सुधारणा अधिनियम २०१२ मधील मार्गदर्शक सूचना ९.३ मध्ये संदर्भ क्र.२ अन्वये खंडकरी शेतकऱ्यास १ एकरपेक्षा कमी क्षेत्र परत करावे लागत असल्यास असे क्षेत्र परत करण्यात येऊ नये, अशी सुधारणा करण्यात आली होती. मात्र माजी खंडकरी शेतकरी यांच्याकडून सातत्याने होणारी मागणी लक्षात घेता १ एकरपेक्षा कमी क्षेत्र देय असल्यासदेखील त्याचे वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ अन्वये निश्चित केलेले किमान प्रमाणभूत क्षेत्राचे उल्लंघन न करता शेतकऱ्यास देय क्षेत्र वाटप करावे असे ठरले.

## शासकीय बँकिंग व्यवहार



शासकीय कार्यालयांच्या बँकिंगविषयक व्यवहार आणि सार्वजनिक उपक्रम महामंडळे यांच्याकडील निधी गुंतवण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई या बँकेस पात्र ठरवण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य सहकारी बँक ही सहकार क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावते. या बँकेला अधिक सक्षम करणे; तसेच ग्रामीण पतपुरवठ्यात वाढ करणे आवश्यक असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

## वीज प्रकल्पास मान्यता



नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील कोराडी येथे २ x ६६० मेगावॅट क्षमतेच्या कोळशावर आधारित सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानावरील वीज प्रकल्पास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. महानिर्मिती कंपनीच्या जुन्या बंद होणाऱ्या १२५० मेगावॅट क्षमतेच्या संचाच्या बदल्यात हा १३२० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात येईल. यासाठी येणाऱ्या १०,६२५ कोटींच्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली. यापैकी ८० टक्के रक्कम म्हणजेच ८,५०० कोटी रुपये महानिर्मितीस विविध बँका आणि संस्थांकडून उपलब्ध करता येतील. तसेच २० टक्के म्हणजेच २,१२५ कोटी रुपये पुढील ५ वर्षांत टप्प्याटप्प्याने भागभांडवल म्हणून उपलब्ध करून देण्यात येतील. राज्यात वेगाने होणारे औद्योगिकरण तसेच पायाभूत सुविधांमुळे विजेच्या मागणीत होणारी वाढ लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे.

## महाप्रित उभारणार परवडणारी घरे

महाप्रितमार्फत ठाण्यात समूह गृहनिर्माण प्रकल्प राबवून त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर परवडणारी घरे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाला अधिक कार्यक्षम करण्यासाठी आणि नवीन योजना राबवण्यासाठी महात्मा फुले नवीनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्राद्योगिकी मर्यादित-महाप्रित या सहयोगी कंपनीची स्थापना करण्यात आली. या कंपनीमार्फत विविध शासकीय कामे उदा. परवडणारी घरे आणि शहरी नियोजन, अक्षय ऊर्जा, कृषीमूल्य साखळी, पायाभूत सुविधा प्रकल्प, पर्यावरण उद्योन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रे करण्यास १० जुलै २०२३ मध्ये मान्यता देण्यात आली आहे. यालाच अनुसरून ठाणे शहरातील टेकडी बंगला, हजुरी व किसन नगर येथे एकत्रित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समूह विकास प्रकल्प राबवण्यासाठी ठाणे महापालिकेसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा प्रकल्प राबवण्यास त्याचप्रमाणे महात्मा फुले मागासवर्ग महामंडळांकडील ठेवींवर मिळणाऱ्या व्याजाच्या रकमेतून २५ कोटी इतक्या रकमेची ३ वर्षांत व्याजासह परतफेड करण्याच्या तत्त्वावर या प्रकल्पास मान्यता देण्यात आली.



## शासन भरणार कर्जावरील व्याज

राज्यातील सूतगिरण्या सुरळीतपणे चालवण्यासाठी पुढील पाच वर्षे कर्जावरील व्याज शासनाने भरण्याची योजना सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. सहकारी सूतगिरण्यांसाठी वित्तीय संस्थांकडून व राष्ट्रीय सहकारी विकास मंहामंडळाकडून प्रति चाती ३ हजार रुपये प्रमाणे घेतलेल्या कर्जावरील व्याज शासनामार्फत देणारी योजना ११ जानेवारी २०१७ रोजी लागू करण्यात आली होती. या योजनेत काही आवश्यक सुधारणा करून ती पुढील पाच वर्षे सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.



शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून

पुढील एक वर्षापर्यंत ज्या सहकारी सूतगिरण्या ५ वर्ष मध्यम मुदतीच्या नवीन कर्जाची उचल करतील, त्याच सहकारी सूतगिरण्या या योजनेसाठी पात्र राहतील. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सहकारी सूतगिरण्यांनी ५ वर्षे कालावधीचे मध्यम मुदतीचे कर्ज वित्तीय संस्थेकडून, महामंडळाकडून घ्यावे. या योजनेचा लाभ केवळ या निर्णयानंतर पुढील एक वर्षापर्यंत कर्ज उचल करणाऱ्या सहकारी सूतगिरण्यांना लागू राहील.

## नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय

अहमदनगर जिल्ह्यात नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या देशात ५० टक्के पशुवैद्यकांची कमतरता असून वर्ष २०३५ पर्यंत १ लाख २५ हजार एवढ्या पशुवैद्यकांची आवश्यकता असेल. राज्यात पशुवैद्यक विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट करणे आवश्यक आहे. सध्या पदवी आणि पदव्युत्तर यामध्ये अनुक्रम ४०५ आणि २४० अशी प्रवेश क्षमता आहे. राज्याला सुमारे ६,६०० पशुवैद्यक पदवीधरांची गरज आहे. सध्या राज्य पशुसंवर्धन विभागाकडे २,५०० पशुधन विकास अधिकारी असून ३ कोटी ३३ लाख ७९ हजार ११८ पशुधनाची संख्या आहे.



अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील शिर्डी येथील मौ. सावळी विहीर खुर्द येथे सुमारे ७५ एकर जमिनीवर हे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यात येईल. यासाठी एकूण २३४ पदे नियमित आणि शिक्षकेतर ४२ अशी बाह्यस्रोताने पदे भरण्यास मान्यता देण्यात आली.

## धर्मादाय सहआयुक्त पदांची निर्मिती

राज्यात चार धर्मादाय सहआयुक्त पदांची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला. धर्मादाय संघटनेतील नाशिक, पुणे, नागपूर, व नांदेड येथील कार्यालयांत प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण ४ धर्मादाय सह आयुक्त व ४ लघुलेखक (उच्च श्रेणी) अशी एकूण ८ नियमित पदे निर्माण करण्यास व ४ मनुष्यबळाच्या (बहुद्देशीय गट-ड कुशल कर्मचारी) सेवा बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करून घेण्यात येतील. सध्या छत्रपती संभाजीनगर येथे ७४०, नाशिक येथे ७७९, पुणे येथे २,३९४ आणि नागपूर येथे १,०२९ अशी प्रलंबित प्रकरणे धर्मादाय सहआयुक्त कार्यालयात आहेत. त्यामुळे या ४ ठिकाणी ही पदे निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## लाभार्थी कामगारांसाठी नियमांत सुधारणा

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनेमध्ये सुधारणा करून त्यांचा लाभ गतीने मिळण्यासाठी कामगार नियमांत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या मंडळामार्फत लाभार्थीकरिता विविध कल्याणकारी योजना आहेत. मात्र त्यांच्या अटी, शर्ती, निकष आणि आर्थिक बाबी निश्चित करण्यात न आल्यामुळे त्यांची अंमलबजावणी करताना अडचणी येत होत्या. या अडचणी दूर करण्यासाठी सुधारणा आवश्यक होत्या. केंद्र शासन व राज्य शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनेचा लाभ एखाद्या लाभार्थीने घेतला असल्यास त्यास परत त्याच योजनेचा लाभ मिळू नये, यासाठी आता मंडळामार्फत सदर लाभार्थी कामगार अपात्र ठरवण्यात येईल, अशी सुधारणादेखील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) नियम २००७ मधील नियम ४५ मध्ये करण्यात येईल.

## संस्थांच्या कार्यक्रमांमध्ये एकसमानता

बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत या संस्थांच्या कार्यक्रम व योजनांमध्ये एकसमानता आणण्यासाठी कायमस्वरूपी समिती गठित करण्याचा, तसेच एक सर्वंकष धोरण आखण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत अधिछात्रवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती या योजनांकरिता लाभार्थींच्या संख्येस मान्यता देण्यात आली.



राज्यात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थांमार्फत समाजातील विविध घटकांसाठी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कार्यक्रम राबवण्यात येतात. त्याचप्रमाणे अधिछात्रवृत्ती, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा तयारी, पोलीस आणि सैन्यभरती प्रशिक्षण, कौशल्यविकास, वसतिगृह व वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता, स्वाधार, स्वयं अशा वेगवेगळ्या योजना राबवण्यात येतात. याबाबतीमध्ये एक सर्वंकष धोरण आणण्याचे मंत्रिमंडळाचे निर्देश होते. त्याला अनुसरून अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीस कायमस्वरूपी मान्यता देण्यात आली.

आता प्रत्येक संस्था त्यांचा वार्षिक कृतिआराखडा तयार करून तो वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समितीसमोर मान्यतेसाठी ठेवेल.

## न्या. शिंदे समितीचा अहवाल स्वीकारला



मराठवाड्यातील निझामकालीन व इतर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रांसंदर्भात कार्यवाही निश्चित करणाऱ्या निवृत्त न्या. संदीप शिंदे समितीचा पहिला अहवाल राज्य मंत्रिमंडळाने स्वीकृत केला.

या अहवालामध्ये निवृत्त न्या. संदीप शिंदे समितीने नमूद केल्याप्रमाणे मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील सुमारे पावणेदोन कोटी नोंदी तपासण्यात आल्या असून १३,४९८ जुन्या कुणबी नोंदी आढळल्या आहेत. या कुणबी नोंदी तपासण्याचे काम

दररोज सुरू असून अशा नोंदी असलेल्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्यास देखील मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या नोंदी तपासताना मोडी आणि ऊर्दू भाषेतील दस्तऐवज आढळून आला. या कागदपत्रांचे भाषांतर करून जतन करण्यासाठी ते डिजिटलाइज करून पब्लिक डोमेनवर आणून त्या आधारे कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासदेखील मान्यता देण्यात आली.

न्या. शिंदे यांच्या अहवालातील शिफारशींनुसार मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

याशिवाय मराठा समाजाचे सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी, तसेच सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय आणि इतर न्यायालयीन प्रकरणात मराठा समाजाचे आरक्षण टिकून कसे राहील, यासाठी शासनाला मार्गदर्शन करण्याकरिता न्या. दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली न्या. मारोती गायकवाड, न्या संदीप शिंदे यांचे सल्लागार मंडळ नियुक्त करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. मागासवर्ग आयोगाला नव्याने इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे निर्देश देण्यासदेखील मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

## ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर

राज्यात कमी पावसामुळे काही जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता या खरीप हंगामासाठी पहिल्या टप्प्यात ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यास मान्यता दिली. त्यानुसार दुष्काळी परिस्थितीत आवश्यक ती मदत करण्याबाबत तातडीने केंद्राला विनंती करण्यात येणार आहे.

राज्यातील उर्वरित तालुक्यांमधील ज्या मंडळांमध्ये कमी पाऊस झाला आहे त्याबाबतीत आवश्यक ते निकष निश्चित करून तिथे दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून या मंडळांकरिता योग्य त्या सवलती देण्यासाठी मदत व पुनर्वसन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे निर्देशही यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. त्यानुसार दुसऱ्या टप्प्यात देण्याच्या मदतीबाबत निर्णय घेण्यात येईल.

## दोन हेक्टरऐवजी तीन हेक्टर मर्यादेत मदत

नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार २ हेक्टर ऐवजी ३ हेक्टर मर्यादेत मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. जून ते ऑक्टोबर २०२३ या पावसाळ्यात अतिवृष्टी पुरासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे नुकसान झाले. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार २ हेक्टर मर्यादेऐवजी आता ३ हेक्टर मर्यादेत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने मदत देण्यात येईल. त्याचप्रमाणे शेतजमिनीच्या नुकसानीसाठी २ हेक्टर मर्यादेत मिळणारी केवळ अल्पभूधारक शेतकऱ्यांना मिळणारी मदत आता अल्पभूधारक शेतकरी नसलेल्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने २ हेक्टर मर्यादेत मिळेल.



## चिटफंड न्यायालयीन प्रकरणांना वेग

चिटफंड न्यायालयीन प्रकरणांना वेग देण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

चिटफंड कायदा १९८२ मधील कलम ७० नुसार चिटस् सहनिबंधक, राज्यकर विभाग यांनी दिलेल्या लवाद निर्णयाविरुद्ध दोन महिन्यांच्या मुदतीत वित्तमंत्र्यांकडे अपील करण्याची तरतूद आहे. सध्या प्रलंबित असलेल्या चिटफंड अपिलांची संख्या पाहता, न्यायदानास होणारा विलंब टाळण्याकरिता व अपिलकर्त्यांची सोय व्हावी, याकरिता राज्य शासनास असलेले अधिकार प्रशासकीय अधिकाऱ्यास प्रदान करण्यात येतील.



या विधेयकामध्ये चिटफंड कायदा १९८२ यामधील एकूण २ कलमे (कलम ७० व कलम ७१) यामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात येईल. त्यामुळे या सुधारणेमुळे कलम ७० अन्वये अपील सुनावणीचे या बदलामुळे प्रलंबित चिटफंड अपिलांचा निपटारा अधिक गतिमान पद्धतीने होऊन अपिलकर्त्यांना दिलासा मिळण्यास मदत होईल.

## चेंबूरला आयटीआय

मुंबई उपनगर जिल्ह्यातील चेंबूर येथे अनुसूचित जाती, नवबौद्धांच्या मुला मुलींसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. चेंबूर येथील आयटीआय सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग यांच्या सहकार्याने सुरू करण्यात येणार आहे.

अनुसूचित जाती, नवबौद्धांच्या मुला-मुलींसाठी मुंबई विभागात शासकीय उच्चस्तर आयटीआय कमी प्रमाणात आहेत. या मुलांना रोजगारक्षम करून उद्योगांना आवश्यक ते कुशल मनुष्यबळ पुरवण्यासाठी हे आयटीआय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये १० ट्रेड्सच्या (व्यवसाय अभ्यासक्रम) प्रत्येकी २ तुकड्या याप्रमाणे २० तुकड्या सुरू करण्यात येतील. यासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर अशी ३६ पदे आणि बाह्य यंत्रणेद्वारे ८ पदे अशा ४४ पदांना मान्यता देण्यात आली.



## मुद्रांक नोंदणी शुल्कात संपूर्ण सूट

अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ येथील पीएम मित्रा पार्क उभारणीसाठी मुद्रांक नोंदणी शुल्कात १०० टक्के सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला. १७ मार्च रोजी या ठिकाणी ब्राऊन फिल्ड पीएम मित्रा पार्क स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पार्ककरिता केंद्राकडून २००



कोटी रुपये साहाय्य मिळणार असून या ठिकाणी ४१० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. यासाठी १० कोटी भागभांडवल असलेली एसपीव्ही स्थापन करण्यात येत असून ही जमीन हस्तांतरित करण्यासाठी १०० टक्के मुद्रांक शुल्कात सूट देण्यात येईल.

## योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी समिती

धनगर समाजाच्या उन्नतीकरिता प्रभावीपणे योजना राबवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक शक्तीप्रदत्त समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री तथा तत्कालीन वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात धनगर समाजाच्या उन्नतीसाठी निधी उपलब्ध करून देण्याचे त्याचप्रमाणे शक्तीप्रदत्त समिती स्थापन करण्याबाबत नमूद केले होते. त्यानुसार मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री, आदिवासी विकासमंत्री, ग्रामविकासमंत्री, पशु दुग्ध व मत्स्यव्यवसाय विकासमंत्री, वस्त्रोद्योगमंत्री त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी निर्देशित केलेले धनगर व तत्सम समाजातील प्रत्येक महसूल विभागातून एक अशासकीय सदस्य, असे सदस्य असतील.



अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी विविध १३ योजना राबवण्याचा निर्णय ऑगस्ट २०१९ मध्ये घेण्यात आला होता. या योजनांसाठी १४० कोटी रुपयांची तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पासाठी करण्यात आली आहे. ही समिती आवश्यकता असल्यास नवीन योजना प्रस्तावित करून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता आवश्यक त्या उपाययोजना व संनियंत्रण करतील.

## निर्यात प्रोत्साहन धोरण मंजूर

राज्यातील निर्यात क्षेत्राला गती देऊन, थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्याच्या पहिल्या निर्यात प्रोत्साहन धोरणास मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यात अंदाजे रुपये २५,००० कोटी गुंतवणूक होईल.

हे धोरण कालावधीमध्ये सन २०२७-२८ पर्यंत राबवण्यात येईल. सध्या राज्याची निर्यात ७२ अब्ज डॉलर्स असून ती १५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवणे, राज्यामध्ये पुढील पाच वर्षांमध्ये ३० निर्यातीभिमुख पायाभूत सुविधा विकास प्रकल्प विकसित करणे, तसेच २०३० पर्यंत देशाच्या १ ट्रिलियन डॉलर निर्यातीच्या उद्दिष्टात राज्याचा २२ टक्के सहभाग साध्य करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. या प्रोत्साहनाचा लाभ राज्यातील सुमारे ५,००० एमएसएमई व मोठ्या उद्योग घटकांना होईल. तसेच ४०,००० रोजगार संधी निर्माण होऊन राज्याच्या निर्यातीमध्ये सध्याच्या ७ टक्के वरून १४ टक्के एवढी वाढ होण्यास मदत होईल.

## बॅरेजेसना मान्यता

वाशीम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील २ बॅरेजेसना मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे वाशीम जिल्ह्यातील गावांना मोठा फायदा होणार असून २,२०० हेक्टरपेक्षा जास्त जमीन सिंचित होणार आहे. मंगरुळपीर तालुक्यातील बोरव्हा गावाजवळ अडाण नदीवर हा बॅरेज बांधण्यात येत असून यामुळे बोरव्हा, पोटी, पारवा आणि लखमापूर या ४ गावांतील ९०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.



## अध्यापक पदे भरती

अनुदानित खासगी आयुर्वेद, युनानी महाविद्यालयांतील अध्यापकांची पदे राज्य निवड मंडळामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार वैद्यकीय शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव अध्यक्षस्थानी असतील तर आयुष संचालनालयाचे संचालक, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे निवृत्त कुलगुरू, सह सचिव दर्जापेक्षा कमी नसलेले सामाजिक न्याय व सामान्य प्रशासन विभागातील प्रतिनिधी, संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अनुदानित खासगी आयुर्वेद व युनानी संस्थांचे व्यवस्थापन किंवा महाविद्यालयाचे नामनिर्देशित व्यक्ती हे या निवड मंडळाचे सदस्य असतील.

## आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची पदे भरणार

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणित, विज्ञानात पारंगत करण्यासाठी शिक्षकांची २८२ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी येणाऱ्या ३० कोटी खर्चासदेखील आज मान्यता देण्यात आली. इतर मागास व बहुजन कल्याण विभागामार्फत १४१ कला व विज्ञान, तसेच ७ कला व वाणिज्य अशी १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळा आहेत. उच्चस्तरीय सचिव समितीने गणित आणि विज्ञान विषयांकरिता पदे निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार ही पदे निर्माण करण्यात येतील.



## आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्र

विदर्भात नागपूर येथे ३, तर अमरावती जिल्ह्यात २ अशा ५ ठिकाणी आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे संत्रा उत्पादकांना योग्य भाव मिळून योग्य प्रतीचा संत्रा देशात आणि परदेशात पाठवता येईल. उपमुख्यमंत्री तथा तत्कालीन वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात याची घोषणा केली होती. नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल व कळमेश्वर व अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व बुलडाणा या ठिकाणी ही केंद्रे उभारण्यात येतील. प्रकल्पाच्या ५० टक्के मर्यादेपर्यंतचे अनुदान हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लाभार्थीच्या बँकेत जमा करण्यात येईल. या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे हे नोडल असतील.

## मॉरिशस येथे पर्यटक केंद्र उभारणार

मॉरिशस येथे महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांची माहिती देणारे पर्यटक केंद्र व बहुउद्देशीय संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मॉरिशस दौऱ्यात मॉरिशसचे पंतप्रधान प्रवीणकुमार जगन्नाथ यांच्याशीदेखील चर्चा झाली होती. या पर्यटन केंद्रात पर्यटकांना माहितीशिवाय महाराष्ट्रातील आर्थिक गुंतवणुकीच्या संधीची माहिती मिळेल. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मॉरिशसचा वाणिज्य दूतावास आणि भारताचे मॉरिशसमधील उच्चायुक्त यांच्यात परस्पर समन्वय ठेवण्यासाठी पर्यटन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक संनियंत्रण समिती देखील गठित करण्यात येत आहे.



## महाराष्ट्र गोवंशीय प्रजनन अधिनियम लागू

राज्यात उच्च उत्पादन क्षमता असलेल्या दुधाळ जनावरांची संख्या वाढवण्यासाठी महाराष्ट्र गोवंशीय प्रजनन अधिनियम लागू करून यासाठी प्राधिकरण स्थापण्यास मान्यता देण्यात आली. सध्या जनावरांसाठी कृत्रिम रेतनावर भर देण्यात येत आहे. तथापि, कृत्रिम रेतनासाठी राज्य शासनाकडून उत्पादित केल्या जाणाऱ्या गोठित रेतमात्रांशिवाय सध्या बाजारात उपलब्ध इतर गोठित रेतमात्रांच्या गुणवत्तेची हमी देता येत नाही. या गुणवत्तेचे नियमन व तपासणी करण्यासाठी सध्या कोणतीही तरतूद नाही. गोठित रेतमात्रांच्या उत्पादन, साठवणूक, विक्री, वितरण यांचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र गोवंशीय प्रजनन अधिनियम २०२३ हे विधेयक विधानमंडळात मांडण्यासाठी मान्यता देण्यात आली. या अंतर्गत महाराष्ट्र गोवंशीय प्रजनन नियमन प्राधिकरणासाठी आवश्यक असलेली पदे उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने निर्माण करण्यात येतील.



## पोलीस श्वान प्रशिक्षण केंद्र

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात मौजे गोजुबावी येथे पोलीस श्वान प्रशिक्षण केंद्र उभारण्यास मान्यता देण्यात आली.

सध्या पुणे येथे श्वान प्रशिक्षण केंद्र असून त्याचे बांधकाम मोडकळीस आलेले आहे. तसेच या ठिकाणी प्रशिक्षणासाठी सुविधा नाही. सध्या श्वान पथकात १०२ गुन्हे शोधक, ७४ बॉम्ब शोधक, ४५ अंमली पदार्थ शोधक, ५ गार्ड ड्युटी, ४ पेट्रोलिंग आणि बीडीडीएस पथकातील १२० असे ३५० श्वान असून पुणे येथे केवळ २० श्वान व हस्तकांना प्रशिक्षण देण्यात येते. नवीन प्रस्तावित श्वान प्रशिक्षण केंद्रात एकाच वेळी ५० श्वानांना प्रशिक्षण देण्याची सुविधा आहे. हे केंद्र सुमारे ७ हेक्टर जागेवर उभारण्यात येणार असून भविष्यात वन विभाग, उत्पादन शुल्क, कारागृह, एसडीआरएफ अशा संस्थादेखील त्यांच्या श्वानांना प्रशिक्षण देऊ शकतात. या ठिकाणी श्वान ब्रीडिंग सेंटर सुरू होऊ शकते. या प्रशिक्षण केंद्राकरिता एक पशुवैद्यकीय अधिकारी आणि एक पशु वैद्यकीय अधिकारी मदतनीस अशी २ पदे देखील निर्माण करण्यात येतील.

## एअर इंडियाचे बुडीत उत्पन्न व दंड माफ

नरिमन पॉइंट येथील एअर इंडिया इमारत लवकर ताब्यात घेण्यासाठी पावले उचलण्यात येत असून एअर इंडियाचे सर्व बुडीत उत्पन्न व अन्य दंड माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

नरिमन पॉइंट येथील एअर इंडियाची ही इमारत मोक्याच्या ठिकाणी असून येथून विलोभनीय देखावा दिसतो. ही इमारत मंत्रालयापासून जवळ असून १,६०१ कोटी रुपयांस महाराष्ट्र शासन ही इमारत खरेदी करणार आहे. या २२ मजली इमारतीत ४६,४७० चौरस मीटर जागा शासकीय कार्यालयांसाठी उपलब्ध होऊ शकणार आहे. मंत्रालयाला लागलेल्या आगीनंतर अनेक विभाग मंत्रालयापासून दूर अंतरावर इतर ठिकाणी विखुरलेले असून त्यांच्या भाड्यापोटी २०० कोटींपेक्षा होणारा खर्च एअर इंडिया इमारत ताब्यात आल्यामुळे वाचेल. ही इमारत खरेदी करण्यापूर्वी राज्य शासनास देय असणारे अनर्जित (बुडीत) उत्पन्न आणि दंड माफ करण्यात येईल जेणेकरून ही इमारत लवकर रिकामी करून ताब्यात घेण्यात येईल.



## मेगा वस्त्रोद्योग प्रकल्पांना प्रोत्साहन योजना

राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणात सुधारणा करून मेगा वस्त्रोद्योग प्रकल्पांनादेखील उद्योग विभागाच्या सामूहिक प्रोत्साहन योजनेचा लाभ देण्याचा तसेच नंदुरबार जिल्ह्याचा समावेश झोन तीनमधून झोन दोनमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला. ३० मे २०२३ रोजी राज्याचे वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात आले असून, यामध्ये २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्यात येणार आहे. तसेच ५ लाखांपर्यंत रोजगार निर्मितीदेखील होणार आहे. हे धोरण जाहीर झाल्यावर वेगवेगळ्या वस्त्रोद्योग घटक व संघटनांनी शासनास दिलेल्या निवेदनानुसार या धोरणात सुधारणा करण्यात येऊन आकांक्षित जिल्हा असलेल्या नंदुरबारचा समावेश झोन तीनमधून झोन दोनमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला. उद्योग विभागाच्या सामूहिक प्रोत्साहन योजनेत वस्त्रोद्योग विशाल प्रकल्पांना दर्जा व प्रोत्साहन देण्यात येईल, अशी सुधारणादेखील करण्यात आली.

## मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता

राज्यातील शिक्षण संस्थांना समूह विद्यापीठ स्थापण्याकरिता मार्गदर्शक तत्त्वांना मान्यता देण्यात आली. यामुळे विद्यापीठांवरील भार कमी होऊन शैक्षणिक संस्थांचे एक शक्तिशाली जाळे तयार होऊन विद्यार्थ्यांना अधिक संधी प्राप्त होतील. राज्यपाल हे कुलपती या नात्याने या समूह विद्यापीठांच्या कुलगुरूंची नियुक्ती करतील. ही विद्यापीठे सार्वजनिक विद्यापीठे राहणार आहेत.

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानात अशा प्रकारे चांगल्या शैक्षणिक संस्थांचे समूह विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यास प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यानुसार

राज्यात डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई, हैद्राबाद सिंध नॅशनल कॉलिजिएट विद्यापीठ, मुंबई, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा अशी ३ समूह विद्यापीठे आहेत.

समूह विद्यापीठासाठी इच्छुक असणारे प्रमुख महाविद्यालय शैक्षणिकदृष्ट्या उच्च कामगिरी करणारे, आवश्यक ती पायाभूत सुविधा, प्रशिक्षित अध्यापक, तसेच समूह विद्यापीठाच्या दृष्टीने समन्वय करण्यासाठी सक्षम असणारे महाविद्यालय किंवा संस्था असावी. समूह विद्यापीठ तयार करण्यासाठी एकाच व्यवस्थापन किंवा शैक्षणिक संस्थेच्या किमान दोन व कमाल पाच अनुदानित किंवा विना अनुदानित महाविद्यालयांचे एकत्रिकरण करणे आवश्यक राहील. कृषी व आरोग्य विज्ञान वगळता इतर सर्व पारंपरिक व व्यावसायिक महाविद्यालये समूह विद्यापीठात समाविष्ट होऊ शकतील. पाचपेक्षा जास्त महाविद्यालये किंवा संस्था समूह विद्यापीठात समाविष्ट करण्यासाठी राज्य शासन मूल्यांकन करेल.

## अहवालाचे सादरीकरण

राज्य आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालाचे राज्य मंत्रिमंडळात सादरीकरण करण्यात आले. राज्याला १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध ३४१ शिफारशी या परिषदेने केल्या आहेत. हे सादरीकरण मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी केले.

राज्याचा जीडीपी (विकास दर) १७ टक्के साध्य करणे, फॅब आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादनाला गती देऊन १८ टक्के विकास साधणे, कृषी क्षेत्रात १३ टक्के वाढ करणे, राज्यातील सिंचन प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी अधिकचा निधी नाबार्ड, तसेच इतरांकडून मिळवणे, ४० टक्क्यांपेक्षा जास्त सिंचन पूर्ण झालेले ७५ प्रकल्प वेगाने पूर्ण करणे, मुंबई आणि एमएमआर परिसरात मोठ्या प्रमाणावर पायाभूत



सुविधा, तसेच आर्थिक विकासाचे उपक्रम राबवणे, कौशल्य विकासात २०२८ पर्यंत १५ दशलक्ष नोकऱ्या निर्माण करणे, तसेच आरोग्य, पर्यटन, ऊर्जा या विभागातदेखील महत्त्वपूर्ण आवश्यक बदल करून या क्षेत्राचा विकास करणे, जिल्ह्यांचा समतोल विकास करणे, यासाठी १५ जिल्ह्यांतील २७ तालुक्यांवर विशेष लक्ष देणे, शेतकरी उत्पादक संस्थांना बळकट करणे व शीतगृहांमध्ये वाढ करणे अशा स्वरूपाच्या शिफारशी यामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

## सत्तर सावंगा बॅरेजला मान्यता

वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातील सत्तर सावंगा बॅरेजच्या १७३ कोटी ९ लाख रुपये खर्चास प्रशासकीय खर्चास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे वाशिम जिल्ह्यातील सत्तर सावंगा, धामणी, खडी, पिंपळशेंडा, एकांबा आणि आमगव्हाण या ६ गावांतील १,३४५ हेक्टर क्षेत्र सिंचित होणार आहे. हे बॅरेज विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळातील गोदावरी खोऱ्यातील पैनगंगा उपखोऱ्यात धामणी गावाजवळ अडाण नदीवर बांधण्यात येणार असून या भागातील पाटबंधारे अनुशेष दूर होण्यास मदत होणार आहे. या ठिकाणी कालवे काढण्यात येणार नसून लाभधारक स्वत:च्या खर्चाने पाण्याचा उपसा करणार आहेत.



## अग्रीम रकमेचे वाटप

प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील विम्याच्या अग्रीम रकमेचे वाटप वेगाने सुरू असून आतापर्यंत ४७ लाख ६३ हजार नुकसानभरपाई अर्जांना मंजुरी मिळाली असून १,९५४ कोटी रुपये वाटप होणार आहेत. यापैकी ९६५ कोटी रक्कम वितरित करण्यात आली असून उर्वरित रक्कम वितरित करण्याचे काम प्रगतिपथावर



आहे अशी माहिती राज्य मंत्रिमंडळ बैठकीत कृषी विभागाच्या सादरीकरणात देण्यात आली.

## बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत योजनेला मुदतवाढ

राज्यातल्या ग्रामपंचायत इमारतीच्या कामांसाठी निधी वाढवण्याचा, तसेच बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत योजनेलाही मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. आता ही योजना २०२७-२८ या वर्षापर्यंत राबवण्यात येईल.

स्वतंत्र इमारत नसलेल्या २,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १५ लाखऐवजी २० लाख रुपये व २,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना १८ लाखऐवजी २५ लाख अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच यापूर्वी ग्रामपंचायत स्वनिधीची असलेली अटदेखील रद्द करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत बांधकामासाठी यापेक्षा अधिक निधीची आवश्यकता अतिरिक्त निधी केंद्र व राज्य शासनाच्या इतर योजना, वित्त आयोग निधी, जिल्हा ग्रामविकास निधी, स्थानिक विकास निधी (खासदार, आमदार निधी) इ. बाबींमधून देण्यात येईल. राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय नाही, अशा ४,२५२ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेस २०१८-१९ ते २०२१-२२ या ४ वर्षांसाठी मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार १७४८ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या ग्रामपंचायत इमारतींचे बांधकाम सुरू असून, याकरिता आतापर्यंत ३,८१३.५० लाख रुपये इतका निधी खर्च करण्यात आला आहे.



**– टीम लोकराज्य**



## नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

ग्रामस्तरावर गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पुरविण्यासाठी

# आयुष्मान भवः अभियान



## एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

**अभियानाचा कालावधी : दि. १७ सप्टेंबर २०२३ ते दि. ३१ डिसेंबर २०२३**

**सर्व नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा**

### अभियानाचे प्रमुख घटक

**आयुष्मान आपल्या दारी ३.०**

- अभियानांतर्गत पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड नोंदणी व वितरण
- लाभार्थ्यांची PMJAY पोर्टलवर नोंदणी
- आयुष्मान कार्ड तयार करणे

### आयुष्मान सभा

- समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत गाव पातळीवर आयुष्मान सभेचे आयोजन.
- आयुष्मान कार्डचे वितरण

### रक्तदान व अवयवदान जागृती मोहीम

- **देशात सर्वात जास्त रक्तदान व अवयवदान महाराष्ट्र राज्यात झाले आहे**

### आयुष्मान मेळावा

- संपूर्ण राज्यात आरोग्यवर्धिनी केंद्र स्तरावर आयुष्मान मेळाव्याचे आयोजन
- पहिला आठवडा - असंसर्गजन्य आजार सेवा (तपासणी, निदान, उपचार आणि संदर्भ सेवा)
- दुसरा आठवडा - क्षयरोग, कुष्ठरोग व इतर संसर्गजन्य आजार (तपासणी, निदान, उपचार आणि संदर्भ सेवा)
- तिसरा आठवडा - माता, बाल आरोग्य व पोषण आरोग्य सुविधा
- चौथा आठवडा - सिकलसेल तपासणी व नेत्र रोग चिकित्सा, कान, नाक व घसा तपासणी

### रक्तदान मोहीम

- जिल्ह्यातील सर्व रक्तपेढी यांचे e-Raktkosh Portal वर नोंदणी करून रक्तदान केलेल्यांची माहिती अद्ययावत करून रक्तदात्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

## सार्वजनिक आरोग्य विभागाने नुकतेच घेतलेले काही महत्त्वपूर्ण निर्णय

### कार्डियाक कॅथलॅब

- हृदयरुग्णांसाठी राज्यात लवकरच १९ कॅथलॅब कार्यान्वित केल्या जाणार आहेत.

### मिशन मेळघाट

- ४३ कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी
- १६ अतिरिक्त रुग्ण वाहिका तसेच २ नवजात रुग्णवाहिका नव्याने कार्यरत.
- धारणी उपजिल्हा रुग्णालयात सीटी स्कॅन मशीन कार्यान्वित करण्यात आले.
- गरोदर महिलांच्या सोनोग्राफीसाठी अतिरिक्त निधीस मान्यता

### निरोगी आरोग्य तरुणाईचे वैभव महाराष्ट्राचे

- १८ वर्षावरील सर्व पुरुषांची मोफत सर्वंकष आरोग्य तपासणी
- आजपर्यंत ६० लाखपेक्षा जास्त नागरिकांनी नोंदणी केली असून त्यापैकी ५० लाख पेक्षा जास्त लाभार्थ्यांची प्रयोगशाळा तपासणी करण्यात आली आहे

### संयुक्त कुष्ठरोग अभियान व सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम

- दि. २० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या दरम्यान ८.५ कोटी पेक्षा जास्त नागरिकांची कुष्ठरोग व क्षयरोग यासाठी तपासणी करण्यात येणार असून, याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

### 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत ५ लाख रुपये विमा संरक्षण

- महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील विमा संरक्षण दीड लाखावरून पाच लाख रुपये करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. यामुळे रुग्णांना आता पाच लाखांपर्यंतचे उपचार घेता येणार, या योजनेत नवीन २०० रुग्णालयांचा समावेश.
- मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियांचे लाभ अडीच लाखांहून चार लाखांपर्यंत करण्यात आले आहेत.

### महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण

- राज्यात औषधी व रुग्णालय साधनसामग्री खरेदीसाठी महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण-२०२३ ची स्थापना करण्याला मान्यता.
- यामुळे औषधांची उपलब्धता वेळेवर होणे, गुणवत्ता, दर्जेदार औषधी कमी भावात उपलब्ध होण्यासाठी राज्याला मदत होणार आहे.

### सर्व नागरिकांना मिळणार मोफत वैद्यकीय उपचार

- सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध

### माता सुरक्षित तर घर सुरक्षित

- १८ वर्षावरील सर्व महिलांची मोफत सर्वंकष आरोग्य तपासणी
- यामध्ये ४ कोटी पेक्षा जास्त लाभार्थींची तपासणी करण्यात आली

### जागरूक पालक सुदृढ बालक

- राज्यातील ० ते १८ वर्षापर्यंतच्या सुमारे २ कोटी बालके व किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणी केली



तानाजी सावंत
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण



देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री | एकनाथ शिंदे मुख्यमंत्री | अजित पवार उपमुख्यमंत्री

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month


# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ







### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR


प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह